# श्रद्धेचे विज्ञान



फ्रान्सिस आल्मेडा

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# श्रद्धेचे विज्ञान

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# श्रद्धेचे विज्ञान

लेखक

## फ्रान्सिस आल्मेडा

# श्रद्धेचे विज्ञान


## लेखक... फ्रान्सिस आल्मेडा

पत्ता- नंदनवन निर्मळ, वसई, विरार.
संपर्क ९२२४२९२७५२
ई मेल : francism.almeida@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २० जानेवारी २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी -साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# फ्रान्सिस आल्मेडा



लेखक सेवानिवृत्त विज्ञान शिक्षक असून, तहहयात विज्ञान विद्यार्थी आहेत. विज्ञान शिक्षक म्हणून काम करीत असताना केवळ विज्ञान न शिकवता, विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टी कशी प्राप्त होईल यासाठी सतत प्रयत्नरत होते. सेवेत असताना विद्यार्थ्यांबरोबरच पालक प्रशिक्षण आणि परिसरातील सामाजिक संस्थांमध्ये काम केले. निवृत्तीनंतरही वाचन लेखन आणि विवेकी विचारांचा प्रसार यावर भर. विवेक मंच हा क्रियाशील  ग्रुप आणि मुक्त विचार मंच  हा व्हाट्सअप वरील ग्रुप यामध्ये सक्रिय. प्रसिद्ध लेखक लिओ टॉलस्टॉय यांच्या 'गॉस्पेल इन ब्रिफ' या क्रांतिकारी ग्रंथाचा 'संक्षिप्त शुभवर्तमान' म्हणून मराठीमध्ये अनुवाद. विवेकाने जगण्यासाठी विनामूल्य मार्गदर्शन करण्यासाठी सदैव उपलब्ध.

# प्रस्तावना

'सॅपियन' या मानवाचा इतिहास सांगणाऱ्या वाचकप्रिय पुस्तकात युवाल नोवा हरारी या लेखकांनी मानवी संस्कृतीच्या विकासात श्रद्धांच्या उपयोगाची चर्चा केली आहे. ती वाचत असताना वेगवेगळ्या श्रद्धां मागील वैज्ञानिक पाया काय असावा असा प्रश्न माझ्या मनात आला.त्यातूनच वेगवेगळ्या कोणत्या श्रद्धा मानव समाज आपल्या उपयोगासाठी वापरतो आणि त्या योग्य पद्धतीने कशा वापराव्यात यावर चिंतन करावेसे वाटले.

आईन्स्टाईन या प्रसिद्ध वैज्ञानिकांनी म्हटल्याप्रमाणे "विज्ञान हे धर्माशिवाय पांगळे आणि धर्म हा विज्ञानाशिवाय आंधळा आहे" या विधानाचा श्रद्धा आणि विज्ञान यांना जोडण्यासाठी कसा उपयोग होऊ शकेल हे समजून घेण्याचा प्रयत्न केला तर, धर्म श्रद्धेशी आणि विज्ञान विवेकाशी जोडता येईल.त्यावरून श्रद्धेशिवाय माणूस पांगळा आहे तर विवेकाशिवाय आंधळा आहे असे म्हणता येईल.विवेकी श्रद्धांच्या मदतीने माणसाला आपले जीवन सुखी व समृद्ध करता येईल.त्यासाठी आपल्या श्रद्धांची चिकित्सा करून त्या अविवेकी असतील तर त्यांना विवेकी कसे बनवता येईल हे पाहिले पाहिजे.त्यातूनच या

पुस्तकाची निर्मिती झाली. लिहीत असताना काही मुद्द्यांची पुनरावृत्ती झाली असणे शक्य आहे,वाचक ती समजून घेतील अशी अपेक्षा आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने आपल्या जीवनातील श्रद्धांचे स्थान आणि त्या श्रद्धांचा योग्य प्रकारे उपयोग कसा करावा यावर अधिक विचार मंथन होऊन मानवी जीवन अधिक सुखी व समृद्ध व्हावे हीच सदिच्छा!

फ्रान्सिस आल्मेडा, नंदनवन निर्मळ, वसई, विरार.

संपर्क ९२२४२९२७५२

# श्रद्धेचे विज्ञान

श्रद्धा म्हणजे काय?

श्रद्धा आणि अंधश्रद्धा वेगळी असते का?

श्रद्धेचा आपल्या जीवनात काही उपयोग असतो का?

संस्कृतीच्या विकासात काही श्रद्धा उपयोगी ठरल्या आहेत का?

नेहमीच्या जगण्यात..

श्रद्धा उपयोगी किंवा निरुपयोगी असतात का?

श्रद्धा उपद्रवी किंवा निरूपद्रवी असतात का?

श्रद्धांचा संबंध विवेकाशी असतो का?

विवेकाने श्रद्धा बदलता येतात का?

श्रद्धाच्या मागे काय विज्ञान आहे?

हे सगळे श्रद्धेचे विज्ञान वाचल्यावरच कळेल!

# श्रद्धेचे विज्ञान

## श्रद्धा म्हणजे काय?

श्रद्धा म्हणजे पूर्ण समर्पण. विश्वासाला अनुभवाचा आधार असतो. श्रद्धा ही अनुभव येईल असे गृहीत धरते. परंतु विश्वासाची पुढची पायरी श्रद्धा ही आहे. कारण ज्या गोष्टीचा अनुभव नाही परंतु त्या माणसाला हव्या असतात त्या गोष्टी श्रद्धा काल्पनिकरीत्या पुरवते. आजार बरा करण्यासाठी आपण डॉक्टरांवर विश्वास ठेवतो कारण त्यांचा तसा अनुभव आपल्याला आलेला असतो. परंतु असाध्य रोग बरा करण्यासाठी डॉक्टर असमर्थ असेल तर आपण ते सामर्थ्य असलेला देव निर्माण करतो. त्यामुळेच असाध्य रोगाला किंवा असाध्य वाटणाऱ्या संकटाला तोंड देण्याएवजी लोक बाबा-बुवा स्वामी यांच्या भजनी लागतात. त्यामुळे काही काळ आपल्याला बरे वाटते. असाध्य रोगातून बरे झालो नाही तरीही आपल्याला या काल्पनिक देवाचा आधार वाटतो. यालाच श्रद्धा म्हणतात. श्रद्धेमध्ये शंकेला जागा नसते. शंका घेतली तर आपली श्रद्धा सफल होत नाही असे अगोदरच मनावर ठसवलेले असते. त्यामुळे शंका निर्माण करणारी माणसे ही श्रद्धवंतांना धोकादायक वाटतात. आपली श्रद्धा डळमळीत होणे त्यांना सहन होत नाही. शंका घेण्याची त्यांना विलक्षण भीती वाटते. म्हणूनच श्रद्धाळू

माणसे शंका निर्माण करणाऱ्यांना मारून टाकतात. म्हणजेच श्रद्धाळू लोकांची क्रूरता त्यांच्या मानसिक भीती मधून आलेली असते!

सर्व माणसे विश्वासाच्या आधाराने जगत असल्यामुळे त्यांच्या मध्ये श्रद्धा निर्माण होणे अपरिहार्य आहे. कारण काही गोष्टी विश्वासाच्या पलीकडे आहेत. कष्ट करून पैसे मिळवता येतात हा विश्वास आहे परंतु लक्ष्मीची पूजा करून धनदौलत मिळते ही श्रद्धा आहे. तेथे कष्ट करण्याचा मार्ग न वापरता लक्ष्मीच्या वरदानाने सहज संपत्ती मिळेल ही श्रद्धा माणसाला खूप मोठा आधार देते. विशेष करून ज्याला संपत्तीचा लोभ आहे परंतु ती मिळवण्याची क्षमता नाही त्याची ही श्रद्धा खूप दृढ असते.

श्रद्धाही शंकेच्या पलीकडे असल्याने प्रत्येक माणसाला आपली श्रद्धा ही खरी व दुसऱ्याची ती अंधश्रद्धा वाटते. एका धर्माच्या लोकांना दुसऱ्या धर्माच्या लोकांची श्रद्धा किंवा देवता ह्या काल्पनिक वाटतात. हिंदू लोकांना आपले देव व त्यांच्या मूर्ती प्राणप्रिय असतात परंतु दुसऱ्या धर्माच्या लोकांना त्यांचे फारसे महत्त्व वाटत नाही किंबहुना ते त्या मूर्तींना दगड, लाकूड किंवा धातू यापलीकडे महत्त्व देत नाहीत. त्यामुळे एखादी देवाची मूर्ती दुसऱ्या धर्माच्या लोकांकडून सहज अपमानित झाली तर तिला मानणाऱ्या

लोकांच्या भावना दुखावतात. त्यातूनच त्या समाजाची संतापाची भावना तयार होते आणि दंगल पेटते.

सर्वसामान्य मानवी मन श्रद्धेच्या आधाराशिवाय जगू शकत नाही हे आपल्या अनुभवास येते. मनोवैज्ञानिक संशोधनातून देखील हीच गोष्ट प्रकर्षाने पुढे आली आहे. जणूकाही मानवाच्या मनात एक जागा तेवढ्यासाठी राखून ठेवलेली असते. त्यामुळे श्रद्धा न बदलता तिचा अन्वयार्थ बदलून ती अधिक मानव विकासाला पूरक करता येईल असा विचार बुद्ध, ख्रिस्त व विवेकानंद यांसारख्यांनी करून पाहिला. परंतु लोकांनी त्यांनाच देव बनवून त्यांची पूजा करायला सुरुवात केली.

सर्व धर्मांचे अस्तित्व मानवातील श्रद्धेवर आधारलेले असते. परंतु प्रत्येक धर्माची श्रद्धा वेगळी असल्यामुळे आणि त्यांच्यामध्ये संगती नसल्यामुळे संघर्ष निर्माण होतात. हे संघर्ष टाळण्यासाठी सगळया श्रद्धांचा अन्वयार्थ सुसंगत करता येईल का हे पाहावे लागेल. अर्थात हे काम धर्मिक नेत्यांनाच करावे लागेल. त्यासाठी विचारवंतांनी त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी एखादे श्रद्धाविश्वविद्यालय स्थापन करता येईल.

धर्माने दिलेल्या अनेक श्रद्धा विज्ञानाने बदलल्या. पृथ्वी सपाट आहे. असे लोकांना वाटत होते. वैज्ञानिकांच्या निरीक्षणाने तो समज बदलला. पृथ्वी स्थीर आहे असे लोकांना वाटत होते. परंतु ती स्वतः भोवती व सूर्याभोवती फिरते हे सिद्ध झाले. ती कोणत्या तरी आधारावर आहे असे सर्व धर्म मानत होते. गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताने त्या श्रद्धेला छेद दिला. या श्रद्धा माणसाच्या जीवनात हस्तक्षेप करणाऱ्या नव्हत्या. तरीही बायबलला चुकीचे ठरवले म्हणून गॅलिलिओ या शास्त्रज्ञाला शिक्षा भोगावी लागली. अजूनही माणसाला हजारो वर्षांपूर्वीच्या ग्रंथात लिहिलेल्या गोष्टी कोणत्याही पुराव्याशिवाय सत्य वाटतात.

अल्बर्ट एलिस या मनोवैज्ञानिकाच्या REBT या थिअरी प्रमाणे एखाद्या घटनेमुळे घडणारी मानवी कृती ही आपल्या मनातील श्रद्धांमुळे निर्माण होणाऱ्या भावनांवर अवलंबून असते. या श्रद्धा अविवेकी असतील तर भावनांचा भडका उडतो आणि अविवेकी कृती घडून येते. या श्रद्धांना शह देऊन त्या बदलता येतात. श्रद्धा विवेकाच्या आधारावर असेल तर तयार होणाऱ्या भावना समतोल असतात आणि त्यांच्यामुळे विवेकी कृती घडून येते. एकदा एका ठिकाणी देवाच्या मूर्तीवर कोणीतरी घाण फेकली. ही बातमी पसरताच त्या देवाला मानणाऱ्या भक्तांचा भडका उडाला. सावध असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने मूर्ती धुऊन

काढली व लोकांचा जमाव येण्याअगोदरच तेथे पूजा अर्चना करायला सुरुवात केली. संतापलेले लोक तिथे आल्यावर पूजेत सहभागी होऊन शांत झाले. त्या पोलिस अधिकाऱ्यांने देवाचा उपयोग करून शांतता निर्माण केली. अविवेकी श्रद्धेने निर्माण झालेली संतापाची भावना बदलून शांतीची व सहजीवनाची भावना निर्माण केली.

अल्बर्ट एलिस ची थिअरी वापरून व्यक्तिगत पातळीवरील अविवेकी श्रद्धा बदलता येतात. एखाद्याच्या जीवनातील अविवेकी भावनांचा प्रक्षोभ शांत करता येतो. परंतु समाजात मुळावलेल्या अविवेकी श्रद्धा बदलणे कठीण असते. दगड, लाकूड किंवा धातूची मूर्ती करून तिची पूजा करणे ही श्रद्धा बघा. त्या मूर्तीमध्ये देव आहे असे समजणे अविवेकी आहे हे पुजा करणाऱ्यांना ठाऊक नसते असे नाही. तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की "देवमूर्ती आणि पायरी पाषाणाची असते. पण एकाची पूजा करतो. तर दुसऱ्या वर पाय ठेवत वर चढतो. देव नाही असे जाणावे. परंतु आहे असे म्हणावे. "आता अशा मूर्तीचा कोणी अपमान केला तर विवेकी श्रद्धा असणाऱ्यांना संताप येणार नाही.

## श्रद्धांचे स्वरूप

इथून पुढे श्रद्धा ही एकच असून ती डोळे मिटूनच अनुसरली जाते म्हणजे अंध असते. फक्त ती विवेकी की अविवेकी एवढेच पहावे लागेल. ज्या श्रद्धा मानवाला उन्नत करणाऱ्या, आपल्यात प्रेमासारख्या उपयुक्त भावना जागवणाऱ्या असतील त्या विवेकी श्रद्धा होत. ज्या श्रद्धा मानवाला विनाशाकडे ढकलणाऱ्या, आपल्यात रागा सारख्या विनाशक भावना उद्दीपित करणाऱ्या असतील त्या अविवेकी होत. अविवेकी श्रद्धा या आपल्या रुढी-परंपरा व कल्पनांतून येतात. विवेकी श्रद्धा या वैज्ञानिक दृष्टिकोन आणि स्वतंत्र विचार यातूनच निर्माण होतात. श्रद्धा विवेकी की अविवेकी हे ती कोणत्या पायावर आधारलेली आहे यावरून ठरते.

देवाच्या मूर्ती मानवाच्या आकारात असतात. कारण देव हा माणसाच्या कल्पनेतून आलेला आहे. आकाशातील किंवा स्वर्गातील देवाची पूजा करण्यासाठी त्याचे रूप मानवा सारखेच असावे लागते. मानवासारखी देवाची मूर्ती तयार करून त्याची पूजा करण्या ऐवजी प्रत्यक्ष माणसालाच देव समजून त्याच्यावर प्रेम का करू नये? साने गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे "खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे!" तुकाराम महाराजांच्या शब्दात "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोची साधू ओळखावा देव तेथेचि

जाणावा!"येशू ख्रिस्ताने देखील मानवाच्या पुत्राला उंचावण्याची शिकवण दिली होती.

या सृष्टीचा निर्माण कर्ता म्हणून तरी देव मानला पाहिजे असे अनेक वेळेला म्हटले जाते. विज्ञानाने सर्व गोष्टीचे स्पष्टीकरण दिले तरीही कोणीतरी निर्माणकर्ता असल्याशिवाय हे विश्व निर्माण कसे होऊ शकेल?म्हणजे ही आदिशक्ती असलीच पाहिजे!काही वर्षांपूर्वी पृथ्वी कशाच्या आधारावर आहे हा प्रश्नही असाच लोकांच्या डोक्यात होता. वेगवेगळया धर्मांनी त्यांना वेगवेगळी उत्तरे दिलेली आहेत. कोणी तिला हर्क्युलसच्या पाठीवर तर कोणी हत्तीच्या पाठीवर, कोणी कासवाच्या पाठीवर बसवलेले आढळते. कोणतीही वस्तू दुसऱ्या वस्तूच्या आधाराने स्थिर राहते हा आपला अनुभव आहे. त्यामुळे धर्मग्रंथ लिहिणाऱ्यांनी या अनुभवाच्या आधारे असे काल्पनिक आधार निर्माण केले. लोकांनाही ते मानण्याशिवाय पर्याय नव्हता. परंतु जेव्हा पृथ्वी सूर्याभोवती गुरुत्वाकर्षणाच्या बळाने फिरते हे सर्वमान्य झाले तेव्हा या उत्तराचे स्वरूपच बदलून गेले. त्यापूर्वी कुणालाही कल्पना नव्हती की असे काही असू शकेल! विज्ञानाने हा दृष्टिकोनातील बदल घडवून आणला. कोणतीही गोष्ट निर्मात्याशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही हा आपला विश्वास आपल्या नेहमीच्या अनुभवावर आधारित आहे. त्यामुळे विश्वनिर्मिती देखील तशाच प्रकारे झाली असे आपण

गृहीत धरतो. परंतु ज्याप्रमाणे पृथ्वीचा आधार नाहीसा झाला तसाच विश्वाचा निर्माता नाहीसा होऊ शकेल. त्यासाठी विज्ञानात अधिक पुढे जावे लागेल. स्टिवन हॉकिंग्ज या वैज्ञानिकांने आपल्या ग्रँड डिझाईन या पुस्तकात, विश्वाच्या निर्मितीसाठी निर्मात्याची आवश्यकता नाही असे म्हटले आहे!शून्यातून विश्वाची निर्मिती होऊ शकते. एकाच वेळी धन आणि ऋण ऊर्जा असलेली अशी दोन विश्वे शून्यातून निर्माण होऊ शकतात.

देव मूर्तीमध्ये नसून माणसांमध्ये आहे. जेथे माणूस नाही तेथे देव नाही. वाळवंट, समुद्र व निर्जन जंगलात देव आढळत नाही. आकाशस्थ ग्रह गोलावर जिथे माणूस पोहोचलेला आहे तेथेही देवाचा मागमूस नाही. इतर सजीव सृष्टीलाही देवाची काही पडलेली नाही. एवढेच नव्हे तर मतिमंद माणसानांही देव आणि त्याच्यावरील श्रद्धा याविषयी काहीच समजत नाही. याचा अर्थ देव आणि त्यावरील श्रद्धा की मानवी बुद्धीमत्तेची निर्मिती आहे. आपल्या आवश्यकते साठी त्याने जशी अर्थव्यवस्था, न्याय व्यवस्था व इतर संस्था तयार केल्या आहेत त्याचप्रमाणे देवाची निर्मिती केली आहे! हे सर्व मानवी विश्व अशा प्रकारच्या श्रद्धांवर आधारित आहे. देवावरील श्रद्धा आणि इतर श्रद्धामधील महत्त्वाचा फरक हा आहे की देवा वरील श्रद्धांची तो चिकित्सा करू देत नाही. त्यांची चिकित्सा केल्या मुळे त्याच्या भावना दुखावतात. त्यामुळे

देवनिंदे विरुद्ध कायदे केले जातात. लोकांना कडक शासन समाजाकडूनच केले जाते. त्यामुळे हजारो वर्ष जुन्या श्रद्धा तशाच टिकून राहतात.

# विज्ञान व श्रद्धा

विज्ञानाने काही श्रद्धा बदलायला भाग पाडले आहे. पृथ्वी फिरते असे सांगणाऱ्या गॅलिलिओला शिक्षा करणाऱ्या धर्मपिठाने साडेतीनशे वर्षानंतर दिलगिरी व्यक्त करून गॅलिलिओ बरोबर असल्याचे मान्य केले. देवाच्या कोपाने वेगवेगळे आजार होतात असे आपल्याकडे मानले जाई. देवीचा आजार आल्यास गावात देवीची पूजा सुरू होई. रोगाचे कारण असलेल्या जंतूचा शोध लागल्यावर या सर्व गोष्टी नाहीशा झाल्या. विजेच्या दिव्याचा शोध लागल्यानंतर भुताटकीच्या कथा एकदम कमी झाल्या. हळूहळू विज्ञानाची ताकद वाढत गेली तशा अविवेकी श्रद्धा कमी होऊ लागल्या. तरीही मानवी जीवनातील अनिश्चितता आणि मृत्यूची भीती यामुळे बऱ्याच अविवेकी श्रद्धा टिकून आहेत.

देवावरील श्रद्धेचे मूळ मानवी बालसंगोपनात आहे असे काही वैज्ञानिकांना वाटते. जन्मल्यापासून मुलांना आपण सतत काय करू नको याविषयी मार्गदर्शन करीत असतो. त्यांना आधार देत असतो. त्यामुळे त्यांच्या मनात आधार देणारा मदत करणारा प्रेम करणारा असा ठसा माता पित्याकडून उमटवला जात असतो. पुढे आई-वडिलांची जागा घेण्यासाठी देव-देवता आकार घेतात. अर्थात ही

थिअरी मुलांना वेगळ्या प्रकारे वाढवून पडताळून पाहता येईल! त्यापलीकडे प्रत्येक धर्माचे लोक आपल्या मुलांना बालपणीच संस्काराच्या नावाखाली कर्मकांड करायला भाग पडतात. पुढे त्यांच्या ते अंगवळणी पडते. मोठे झाल्यावर त्यांची चिकित्सक बुद्धी वाढली तरीही त्यांच्या मनावर ठसलेल्या गोष्टी नाहीशा होत नाहीत. त्यामुळे ते कर्मकांडांचे वेगळ्या पद्धतीने समर्थन करू लागतात. बालपणी धार्मिक संस्कार व विचार मुलांमध्ये ठसवण्या ऐवजी त्यांना वैज्ञानिक गोष्टींची ओळख करून दिली तर अंधश्रद्धांचा पगडा बराच कमी होऊ शकेल. त्यासाठी धार्मिक नेत्यांना आपली भूमिका बदलावी लागेल. बालपणी पृथ्वी सपाट आहे आणि हत्तिच्या पाठीवर आहे असे शिकवून मोठेपणी पृथ्वी गोल आहे व ती सूर्याभोवती फिरते असे शिकवणे परिणामकारक होणार नाही. धर्मांतील गोष्टी हजारो वर्षांपूर्वी पुराव्याशिवाय कल्पनेने मानलेल्या आहेत. विज्ञानाने शोधून काढलेल्या गोष्टी पुराव्यासह सत्य असून त्या आधुनिक काळात अनेक शास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी पडताळून पाहिलेल्या आहेत. दुसरे आपण नवीन शोध व तंत्रज्ञान वापरतो तसेच नवीन विचारही आत्मसात केले पाहिजेत. अन्यथा कृती आणि विचार यामध्ये विसंगती निर्माण होते. अवकाश यानाचे प्रक्षेपण करताना आपण शुभ वेळ शोधतो किंवा पूजाअर्चा करतो हा असाच प्रकार आहे.

# मानवी जीवनातील श्रद्धांचे स्थान व परिणाम

मानवी जीवनात श्रद्धांचे स्थान अटळ आहे. कोणत्यातरी स्वरूपात श्रद्धा बाळगल्या शिवाय त्याला जगता येत नाही. त्याच्या बुद्धिमत्तेने त्याला भूत-भविष्य आणि आपल्यातील एकटेपणा यांची जाणीव होते. खरा आधार उपलब्ध नसल्याने काल्पनिक आधार निर्माण करून तो खरा मानण्याची त्याची प्रवृत्ती झाली आहे. चलनी नोटा ही अशीच एक काल्पनिक गोष्ट आपण खरी मानतो. त्यांच्या आधारे मोठे व्यवहार करतो. ती एक श्रद्धा आहे हे आपल्या लक्षातही येत नाही. या श्रद्धेमध्ये भावनिक संबंध येत नसल्याने तिची चिकित्सा करता येते. देवावरील श्रद्धेच्या बाबतीत असे करता येत नाही कारण तिथे भावनांचा संबंध येतो.

धर्माच्या श्रद्धेसाठी अत्याचार व छळ करण्याचे प्रकार प्राचीन काळापासून जगभर घडत आलेले आहेत. रामाने शंबूकाचा केलेला वध, द्रोणाचार्यांनी एकलव्याचा मागितलेला अंगठा ही मोठी उदाहरणे आहेत. सर्वसामान्यांच्या बाबतीत काय घडत असेल याची त्यावरून कल्पना येते. धर्माच्या नावाने चाललेली जातीव्यवस्था, एक ठराविक प्रकारचे काम करण्यास भाग पाडते. युरोपात ख्रिस्ती लोकांनी आपल्याच लोकांचा अनाचरी व धर्मद्रोही

ठरवून छळ केला. त्यांना जिवंत जाळले. त्यातून मोठे विचारवंत व शास्त्रज्ञही सुटले नाहीत. आजही आपल्या देशात गोरक्षणाच्या नावाखाली लोकांना ठेचून मारले जात आहे. विल ड्यूरांट या इतिहासकाराच्या मताने "दृढश्रद्धे बरोबर असहिष्णुता नैसर्गिकपणे येते. " परंतु दृढश्रद्धा लोकांना प्राणप्रिय असते. श्रद्धांचा पगडा सैल करण्यासाठी वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांमध्ये अंतरक्रिया होणे आवश्यक आहे. एकाच धर्मावरील दृढ श्रद्धा दुसऱ्या धर्माविषयी आदर दाखवण्यास प्रतिबंध करते.

## श्रद्धांचे दृढीकरण

आपली श्रद्धा अधिक बळकट करण्यासाठी काही लोक काल्पनिक चमत्कार निर्माण करतात. त्यासाठी पुरावेही तयार करतात. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवणे, तुकाराम सदेह स्वर्गात जाणे, ख्रिस्ताचा जन्म व पुन्हा उठणे, तुरिनचे प्रेत वस्त्र हे सगळे चमत्कार श्रद्धा वाढवण्यासाठी तयार केलेले आहेत. आधुनिक विज्ञानाच्या साह्याने देखील नवीन खोटे पुरावे तयार केले जातात. काल्पनिक गोष्टी रचल्या जातात. व्हिडिओ तयार केले जातात. अशाप्रकारे काल्पनिक गोष्टी खऱ्या भासवून लोकांना शंका घेणाऱ्या लोकांविरुद्ध भडकावण्यात येते. यातूनच लोकांना जाळून मारणे, ठेचून मारणे वगैरे प्रकार घडतात.

सर्व धर्मांमध्ये धर्मसंस्थापक व स्वत: देव परधर्मीय तसेच अश्रद्ध लोकांविषयी फारच कठोर भूमिका घेतांना धर्म ग्रंथांतून दिसतात. आपल्या भक्तांना ते अशा लोकांचा नाश करण्याचे आदेश देतात. मीच सारे घडवितो म्हणणारे कृष्ण असो की माझ्या मधून आल्याशिवाय देवाकडे जाता येणार नाही असे म्हणणारे ख्रिस्त असो. महंमद पैगंबर तर म्हणतात, "माझ्याशिवाय देवाशी कोणीही संपर्क साधू शकत नाही. " फक्त गौतम बुद्ध असे काही

म्हणत नाहीत. त्यांच्या शिकवणीमध्ये कोणत्याही प्रकारच्या श्रद्धेला वाव नाही. तरी लोकांनी त्यांनाही देव बनवले!

श्रद्धा तर लोकांना हवी आहे. परंतु तिच्यामुळे लोक भक्त बनतात. देवावर किंवा एखाद्या थोर विभूतीवर श्रद्धा ठेवून मानव सेवा करण्याचा प्रयत्न सगळे धर्म करतात. परंतु त्यामुळे श्रद्धा मानव केंद्रित होत नाही. मदर तेरेसा आजारी लोकांमध्ये ख्रिस्त पाहतात असे म्हणायच्या, परंतु बाबा आमटे केवळ मानवावरील प्रेमापोटी काम करायचे! म्हणजे श्रद्धेची जागा प्रेम घेऊ शकते. ख्रिस्ताच्या शिकवण्याचे सार हेच आहे. एकमेकावर प्रेम केले तर आणखी कोणत्याही श्रद्धेची गरज नाही!बुद्धाच्या विचार करण्याच्या पद्धती अगोदर ख्रिस्ताची प्रेम करण्याची पद्धत वापरून नंतर बुद्धाची विवेकी पद्धत वापरणे अधिक श्रेयस्कर आहे. म्हणून श्रद्धेच्या जागी मानवप्रेम आणणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढच्या पायरीवर बुद्धांचा विवेक वापरणे सोपे होईल. म्हणजे प्रथम ख्रिस्त व नंतर बुद्ध असा इतिहासाच्या विरुद्ध क्रम वापरासाठी घ्यावा लागेल.

# श्रद्धांमध्ये परिवर्तन

धर्मातील कर्मकांडांचा समाचार गाडगे महाराजांनी स्वतः विठ्ठलाच्या वारीमध्ये सहभागी होऊन कीर्तनाच्या रुपाने घेतला आहे. देवाला अंघोळ घालणे, कपडे नेसवणे व जेवू घालणे या प्रकाराचे सडेतोड खंडन त्यांनी केले आहे. तरीही तो प्रकार थांबलेला नाही. तर्कशुद्ध खंडन करून लोकांना श्रद्धेतून बाहेर काढता येणार नाही. त्यांच्या श्रद्धा मध्ये डोळसपणे सहभागी होऊन त्यांच्या श्रद्धांचा अन्वयार्थ बदलून त्यांना अधिक मानव केंद्रित करावे लागेल. हळूहळू लोकांना काल्पनिक देवापेक्षा आपल्या मानव बांधवाविषयी अधिक खात्री वाटू लागेल. मोबाईल सारखी आधुनिक उपकरणे त्याला सहाय्यक होऊ शकतील!

लोक मोबाईलवर आता अधिकाधिक अवलंबून राहू लागले आहेत. देवाची प्रार्थना करून ज्या गोष्टी काल्पनिक रित्या मिळवण्याचा प्रयत्न केला जातो त्या पैकी अनेक गोष्टी मोबाईलच्या साहाय्याने सहज उपलब्ध होऊ शकतात. कोणत्याही प्रकारची माहिती, एखाद्या विषयाचे ज्ञान, एखाद्या कामाची कृती मोबाईल मधून सहज उपलब्ध होऊ शकते. बँकेचे व्यवहार कोणत्याही वेळी कोणत्याही स्थळी करता येतात. आजारात

प्रथमोपचाराची माहिती मिळू शकते. डॉक्टरांशी बोलता येते व त्यांना बोलावताही येते. वाहनाची व्यवस्था करता येते. प्रवासातील सर्व गोष्टींचे आरक्षण करता येते. फोटो व्हिडिओ काढता येतात. स्मरणशक्तीवर अवलंबून न राहता नोंदी ठेवता येतात. मनोरंजनासाठी खेळ खेळता येतात. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात सहज वावरता येते. अशा अनेक प्रकारे सध्या मोबाईलचा उपयोग करता येतो. भविष्यकाळात आणखीही त्याचे उपयोग वाढतील. म्हणजे ९९% टक्के देवाची जागा मोबाईल घेईल! त्यामुळे अनेक कर्मकांडे नाहीशी होऊन मोबाईल हे एकच उपकरण वैयक्तिक मदतनीस ठरेल!अर्थात मानवाने मृत्यूवर मात करीपर्यंत ते देवाची जागा घेऊ शकणार नाही.

## मृत्यू आणि श्रद्धा

अनेक अविवेकी श्रद्धा मानवाच्या मृत्यूशी निगडित आहेत. इतर प्राण्यांना आपल्या मृत्यूविषयी फारशी जाणीव नसते. मृत्यू नंतर काय होते याचा विचारही ते करू शकत नाहीत. कारण त्यांच्याजवळ एवढा विचार करण्याची क्षमता नाही. मानवाला मात्र वर्तमान काळा इतकेच भूतकाळाचे स्मरण आणि भविष्यकाळाची कल्पना करता येते. मृत्यूबरोबर आपले अस्तित्व नष्ट होण्याची कल्पना त्याला सहन होत नाही. त्यामुळे तो आत्म्याची कल्पना करतो. शरीर नष्ट झाले तरीही आत्मा कायम राहतो असे मानल्यामुळे त्याला खूप बरे वाटते. त्यातूनच पुनर्जन्म, स्वर्ग व नर्क इत्यादी कल्पना निर्माण केल्या जातात. बहुतेक सर्व धर्म आत्म्याची कल्पना मान्य करतात. गौतम बुद्धांनी मात्र याविषयी कोणतेही भाष्य केले नाही. मृत्यू हा अटळ आहे हे मान्य करून या भौतिक जगातच कसे सुखी होता येईल यावर बौद्ध धर्माचा भर आहे. तरीही मृत्यू म्हणजे शेवट ही गोष्ट माणसाला पचत नाही. त्यासाठीच त्याला देव तयार करून त्याचा आधार घ्यावासा वाटतो.

वेगवेगळ्या आजारांवर परिणामकारक औषधे शोधून मानवाने आपल्या आयुष्याची मर्यादा वाढवीत नेली आहे. शंभर

वर्षापूर्वी तीस चाळीस वर्षे जगणारा माणूस आज शंभर वर्षाच्या आसपास पोचू शकतो. विज्ञानाने घडवून आणलेली आरोग्य क्षेत्रातील क्रांती त्याला जबाबदार आहे. आहार आणि औषध उपचार यात अशीच सुधारणा होत राहिली तर माणूस दीडशे वर्षे सहज जगू शकेल! परंतु मानवाला अमरत्वाची आस आहे. आपले विचार, फोटो व आवाज त्याच्या मृत्यूनंतर राहू शकतात. परंतु शरीर नष्ट होते. शरीर टिकवून ठेवण्यासाठी शरीरातील इंद्रियांचे नूतनीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु त्याला मर्यादा आहेत. माणसाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व मेंदूमध्ये सामावलेले असते. केवळ मेंदूचे कार्य टिकवून ठेवले तरीही माणसाचे अस्तित्व टिकून राहू शकते. मेंदूमधील विचार विद्युत यंत्रणेद्वारा बाह्य जगाशी जोडता येतील. परंतु मेंदूत देखील पेशी असल्यामुळे ते अमर्याद काळ कार्यक्षम ठेवता येणार नाही. यावर उपाय म्हणून मेंदूमधील सर्व कार्यक्षमता, बुद्धिमत्ता व स्मरणशक्तीसह कम्प्युटर सारख्या यंत्रामध्ये विस्थापित करता आली तर मानवाला अमरत्व प्राप्त होऊ शकेल का? हा प्रयोग जिवंत माणसावर करून पाहता आलातर आपल्या नव्या अवतारात त्याला कसे वाटते हे कळू शकेल! अशा प्रकारच्या कल्पना चित्रपटांमधून वापरल्या गेल्या आहेत.

# कृत्रिम बुद्धिमत्ता, सुप्त मन आणि श्रद्धा

दुसऱ्या बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेवर संशोधन सुरू आहे. युरोपातील औद्योगिक क्रांतीनंतर माणसाने हाताने करायची कामे यंत्रांनी व्हायला लागली. कामाचा वेग प्रचंड वाढला. त्यानंतर आली कम्प्युटर क्रांती. आता माणसाच्या मेंदूचे कामही यंत्राच्या साह्याने करता येऊ लागले. त्यामुळे यंत्रे चालवणाऱ्या माणसाची जागा कम्प्युटर ने घेतली. त्याच कम्प्युटरला अधिका अधिक बुद्धिमान बनवून माणसांच्या बरोबरीस आणणे ही पुढील संशोधनाची दिशा आहे. कदाचित ही कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धीमत्तेच्या पलिकडेही जाऊ शकेल!त्यावेळी कदाचित मानव यंत्रांचा गुलाम होईल.

जोसेफ मर्फी यांचे पुस्तक 'द पॉवर ऑफ सबकॉन्शस माइंड' हे खूप मोठ्या प्रमाणावर खपले. या पुस्तकात श्रद्धेचा प्रभाव आपल्या सबकॉन्शस मनावर कसा कार्य करतो याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. सगळ्या धार्मिक श्रद्धांच्या मुळाशी या सबकॉन्शस मनाचे सामर्थ्य आहे असे लेखकाने मांडले आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या कर्मकांडाच्या आधारे माणूस आपली श्रद्धा बळकट करतो. म्हणजेच आपल्या सबकॉन्शस मनाला एखादी कृती

करण्यासाठी तयार करतो. ती कृती मानसिक शारीरिक किंवा भौतिक स्तरावर देखील प्रभावी ठरते. त्यामुळे धर्माचा पगडा वाढतो. कोणतीही धार्मिक कर्मकांडे न करता सबकॉन्शस मनाचा उपयोग करून श्रद्धेचे सामर्थ्य वापरता येते. या पुस्तकाचा सकारात्मक उपयोग अनेक लोकांना झाल्याचा अनुभव येतो. आपले सबकॉन्शस मन योग्य प्रकारे वापरले तर कोणत्याही धार्मिक श्रद्धेची मदत न घेता आपले जीवन प्रभावीपणे बदलता येऊ शकेल. एखादी गोष्ट खरी मानली आणि ती घडलेली आहे अशी कल्पना करीत राहिल्यास आणि आपली खात्री झाल्यास ती गोष्ट तशीच घडून येते असा लेखकाचा दावा आहे आणि अनेकांचा अनुभव आहे.

ब्रूस लिप्टन यांचे पुस्तक 'बायोलॉजी ऑफ बिलीफ' हे वेगळ्या स्तरावर श्रद्धेचा प्रभाव दाखवते. आधुनिक विज्ञानाप्रमाणे आपल्या शरीरातील अनेक गोष्टी आपल्या डी एन ए वरून ठरतात. आपल्या शरीराची ठेवण, रंग, वाढ व पुढे होणारे आजार या सर्व गोष्टी आपल्या डी एन ए मुळे निश्चित होतात. या लेखकाच्या मताने डी एन ए म्हणजे आपल्या शरीराची रचना कशी असावी याची ब्लूप्रिंट आहे. परंतु प्रत्यक्ष रचना होत असताना बाहेरच्या वातावरणाचा प्रभाव पडून रचना बदलू शकते. बाहेरचे वातावरण जसे बाहेरील गोष्टींशी निगडित आहे तसेच मानसिक श्रद्धांशी

निगडीत आहे. आपल्या शरीरातील पेशीला मिळणारे वातावरण हे जसे बाहेरून तसेच आतून आपल्या सबकॉन्शस मनातून मिळत असते. सबकॉन्शस मनातील श्रद्धा आपल्याला निरोगी किंवा रोगी ठेवू शकतात. म्हणूनच जगण्याची उमेद असलेला माणूस खडतर परिस्थितीमधे किंवा असाध्य रोगावर मात करून जिवंत राहू शकतो. तर निराश झालेला माणूस सहज साध्या संकटामध्येही खचून जातो व लहानशा आजारालाही बळी पडतो.

या दोन्ही पुस्तकाचा एकत्र विचार केला तर माणसाच्या मानसिक शारीरिक तसेच बाह्य गोष्टीवरही सबकॉन्शस मनाचा प्रभाव पडतो. आणि सबकॉन्शस मनाला नियंत्रित करण्याचे काम श्रद्धा करतात. त्यामुळे श्रद्धांचा वापर करण्याचे एक विज्ञान विकसित करता आले तर अनेक मानवी समस्या निकालात निघतील.

## श्रद्धेचे सामर्थ्य

श्रद्धेने अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात. श्रद्धा म्हणजे कोणत्याही देवावरील श्रद्धा नसून आपल्या मनात ती गोष्ट साध्य करण्याची असलेली खात्री होय. माणसाला उडता येईल या खात्री मुळेच राईट बंधू विमान तयार करू शकले. केवळ अहिंसेचे शस्त्र वापरून स्वातंत्र्य मिळवता येईल ही गांधीजींची श्रद्धा होती आणि ती इतकी अढळ होती की अनेक लोकांना पटत नसूनही गांधीजींनी आपल्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवून दाखवले. एखाद्या माणसाला आजारातून बरे होण्याची खात्री असेल तर तो निश्चितच बरा होतो. विक्टर फ्रेंकेल या मनो वैज्ञानिकाच्या मताने ज्यांना जगण्यासाठी कारण असते तेच जास्त जगतात. संकटात निराश झालेला माणूस टिकाव धरू शकत नाही हा आपला अनुभव आहे. आपल्यामधील सबकॉन्शस समर्थ्याची जाणीव होऊन जी श्रद्धा निर्माण होते तीच मोठे कार्य करू शकते. थोर पुरुष याच श्रद्धेमुळे कार्यप्रवृत्त होतात. त्यांना कोणत्याही कर्मकांडाची गरज लागत नाही.

शक्तीचा स्त्रोत आपल्या सबकॉन्शस मनामध्ये आहे. हा स्त्रोत वापरण्याचे प्रशिक्षण मानवी मनाला मिळाले तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. त्यासाठी सर्व कर्मकांडे बाजूला सारून विचाराच्या

आधारे लोकांमध्ये श्रद्धा निर्माण करता येईल आणि अविवेकी श्रद्धेला बळी पडणारा मनाचा कमकुवतपणा नाहीसा होईल!

मानवी मन आणि मेंदू याविषयी झालेले संशोधन आपल्याला या कामासाठी मदत करू शकेल. आपण विचारपूर्वक आपल्या सबकॉन्शस मनाला विशिष्ट दिशेने काम करायला लावू शकतो. आपण आनंदी आणि निरोगी राहणे आपल्या श्रद्धेवर अवलंबून आहे. ही श्रद्धा विचारपूर्वक आपल्याला तयार करता येऊ शकते. अशाप्रकारे विचाराच्या भक्कम पायावर उभारलेली श्रद्धा कोणतेही अशक्य वाटणारे काम करू शकते.

# विज्ञान आणि श्रद्धा

विज्ञान ही देखील विवेकाच्या भक्कम पायावर आधारलेली श्रद्धा आहे. कोणतीही गोष्ट घडण्यासाठी कारण असते आणि ते आपल्याला शोधून काढता येते ही विज्ञानाची पायाभूत श्रद्धा आहे. झाडावरून फळ खाली पडते कारण पृथ्वीच्या गुरुत्वीय बळाने ते ओढले जाते. या बळामुळे चंद्र पृथ्वी भोवती व पृथ्वी सूर्याभोवती फिरते. कोणताही संसर्गजन्य रोग जंतूमुळे होतो. त्यावर औषधाने मात करता येते. विज्ञानाने अशा अनेक कार्यकारण मालिकांचा शोध घेत मानवाला चंद्र-मंगळा पलीकडे पोहोचवले आहे! विज्ञानाच्या या यशामुळे लोकांची वैज्ञानिक पद्धती वरील श्रद्धा वाढत गेलेली आहे. परंतु ती सर्वसामान्य माणसांऐवजी फक्त काही व्यवसायिक लोका पर्यंतच मर्यादित राहिली आहे. त्यामुळे हे व्यवसायिक लोक सर्वसामान्यांच्या दृष्टीने अती सामर्थ्यवान देव होऊ पहात आहेत. उदाहरणार्थ, डॉक्टर सांगतील त्याप्रमाणे वागले तर आजार बरा होतो. या श्रद्धेमध्ये विज्ञानापेक्षा डॉक्टर महत्त्वाचा ठरतो आणि तो माणूसच असल्यामुळे कधी कधी चुकतो. त्यामुळे लोकांना विज्ञानच चुकीचे आहे असे वाटते. म्हणून वैज्ञानिक पद्धतीने विचार करण्यावरील श्रद्धा वाढवली पाहिजे. त्यासाठी

आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे.

# श्रद्धेवर नियंत्रण

श्रद्धेवर माणसाच्या भावना व भावनेवर कृती अवलंबून असल्यामुळे श्रद्धेला दिशा देण्याचे काम विचारांच्या मदतीने केले पाहिजे. श्रद्धा ही आंधळी असून ती सबकॉन्शस मनाच्या पातळीवर कार्य करते. तर विचार हे डोळस असून ते कॉन्शस मनाच्या पातळीवर कार्य करतात. एखाद्या वाहनाच्या इंजिना प्रमाणे श्रद्धेचे कार्य चालते. इंजिनाला पुढचे दिसत नाही त्याला फक्त गाडी हलवण्याचे सामर्थ्य असते. गाडीचे स्टेअरिंग गाडीला दिशा देते. परंतु त्यामध्ये हलवण्याचे सामर्थ्य नाही. विचार देखील दिशा दाखवतात परंतु श्रद्धेशिवाय भावना जागृत होऊन कृती होत नाही. म्हणून विचारपूर्वक आपल्या श्रद्धा निश्चित केल्या पाहिजेत तरच आपली कृती जीवन परिपूर्ण करणारी होईल. श्रद्धा आणि विचारांची ही सांगड घालण्यासाठी शिक्षणाची नवी पद्धती विकसित करावी लागेल.

"धर्माशिवाय विज्ञान पांगळे आहे आणि विज्ञानाशिवाय धर्म आंधळा आहे" असे आईन्स्टाईन या प्रख्यात वैज्ञानिकांनी म्हटले आहे. यामध्ये धर्म म्हणजे श्रद्धा आणि विज्ञान म्हणजे विवेक!सर्व धर्म श्रद्धांच्या आधारे जगतात तर विज्ञान विचाराच्या आधारे पुढे

जाते. धर्माचा उगम अगोदर झालेला आहे तर विज्ञानाचा विकास अलीकडचा आहे. मानवी मेंदूचा विकास ही असाच झालेला आहे. प्रथम सबकॉन्शस मन आणि नंतर कॉन्शस मनाचा विकास झालेला आहे. मानवाचे मानवत्व हे कॉन्शस मनाशी संबंधित आहे. त्यामुळे शिक्षणाची सुरुवात देखील सबकॉन्शस मनापासून होते. माणूस जसा मोठा होत जातो तसे त्याचे कॉन्शस मन त्याच्या कृतीचे नियंत्रण करू लागते. परंतु ते नियंत्रण सबकॉन्शस मनाच्या मार्फतच होते. विचाराने ठरवलेल्या श्रद्धा निश्चित झाल्यावर त्यांच्या आधाराने कृती घडत जाते. निरोगी राहण्यासाठी स्वच्छता पाळणे तसेच जंतूंची वाढ होऊ नये म्हणून काळजी घेणे ही आधुनिक श्रद्धा विज्ञानाच्या विचारातून आलेली आहे.

# विवेकी श्रद्धा निर्मिती

विवेकी श्रद्धा निर्माण करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची गरज आहे त्याच्यावर संशोधन आवश्यक आहे. आर इ बी टी (rational emotive behaviour therapy)या अल्बर्ट एलिस च्या थेअरी प्रमाणे प्रक्षोभ निर्माण करणाऱ्या अविवेकी श्रद्धा नाहीशा करण्यासाठी त्यांना आव्हान देऊन पराभूत करणे आवश्यक असते. ज्या श्रद्धा भावनांचा प्रक्षोभ निर्माण करून भांडणाला प्रवृत्त करतात त्या अविवेकी श्रद्धा होत. आपल्या देवाच्या मूर्तीवर घाण टाकली म्हणून दंगल पेटवणारी श्रद्धा ही अविवेकी आहे. या श्रद्धेचा एक भाग देव आपल्या मालकीचा आहे आणि दुसरा भाग तो मूर्तीमध्ये असतो त्या दोन्ही श्रद्धा अविवेकी आहेत. त्यामुळे त्यांना आव्हान देणे आवश्यक आहे. प्रश्न विचारून हे आव्हान देता येऊ शकेल. एखादा देव एखाद्या समाजाचा कसा असू शकतो?तो मूर्ती मध्येच का राहतो? यासाठी प्रश्न विचारण्याची संस्कृती विकसित करावी लागेल. प्रश्न विचारणे हे शिक्षकांचे काम आहे असे सध्या आपल्या शाळांतून समजले जाते. विद्यार्थ्यांनी फक्त ज्ञान ग्रहण करावे त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही. परंतु ज्ञान

मिळविण्यासाठी प्रश्न विचारणे आवश्यक आहे हे आपण विसरून गेलो आहोत.

पाठ्यपुस्तकातून किंवा पुराण ग्रंथात दिलेले ज्ञान आत्मसात करणे म्हणजे शिक्षण असे आपण समजतो. त्यामुळे अविवेकी श्रद्धा ही सवय होते. प्रत्येक व्यक्तीने आपली श्रद्धा तपासून घ्यावी असे न होता समाजाने लादलेली श्रद्धा ती व्यक्ती स्वीकारते. त्यामुळे स्वतंत्र विचार नाहीसा होऊन झुंडशाही निर्माण होते.

## श्रद्धा व स्वतंत्र विचार

स्वतंत्र विचारांसाठी आणि नवीन ज्ञानाच्या निर्मितीसाठी स्वतःला प्रश्न विचारणे अत्यावश्यक आहे. झाडावरून फळ खाली का पडले हा न्यूटनला पडलेला प्रश्न व त्याचे स्वतः शोधून काढलेले उत्तर यातून गुरुत्वाकर्षणाच्या नव्या ज्ञानाची निर्मिती झाली. देवाच्या करणीमुळे हे घडते असे त्याने मानले असते तर त्या अविवेकी श्रद्धेने न्यूटनचे ज्ञान पुढे सरकले नसते आणि मानवताही नव्या शोधाला वंचित राहिली असती. म्हणूनच शिक्षणामध्ये प्रश्न विचारणे हा भाग वाढवला पाहिजे. मुलांची परीक्षा शिक्षकांनी घेण्याऐवजी मुलांनी शिक्षकांची परीक्षा प्रश्न विचारुन घेतली पाहिजे. हळूहळू त्यांना स्वतःच आपले प्रश्न सोडवायची सवय झाली पाहिजे म्हणजे स्वतंत्र विचार आणि विवेकी श्रद्धेचा पाया घातला जाईल!

धर्मातील श्रद्धा या त्या धर्माच्या संस्थापकाच्या किंवा संतांच्या माध्यमातून तयार झालेल्या असतात. त्यांचे जीवन व शिकवण लोकांना आदर्श वाटते आणि त्याचे अनुकरण केल्यास आपल्याला इहलोकी सुख शांती मिळेल तसेच परलोकात स्वर्गवास मिळेल असे त्यांना वाटते. त्या थोर पुरुषाच्या हयातीतच

त्यांच्या शिकवण्यापेक्षा त्यांच्या थोर पणाचे कौतुक सुरू होते. पुढे त्याचे भक्तीत रूपांतर होते. त्यातून पूजा अर्चेची कर्मकांडे तयार होतात. मूळ शिकवण बाजूलाच राहते. महापुरुषांना लोकांमध्ये विवेकी श्रद्धा निर्माण करायची असते परंतु होते मात्र उलट. यासाठी प्रस्थापित पुजारी, धर्मगुरू हातभार लावतात कारण त्यातून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटतो. कर्तव्यबुद्धीने कर्म करा असे म्हणणारा कृष्ण, स्वतः जागृत होऊन विवेकाने जगा असे म्हणणारा बुद्ध आणि शत्रूवरही प्रेम करा असे म्हणणारा ख्रिस्त लोकांना नको असतो. त्यांना या थोर पुरुषांच्या मूर्ती तयार करून त्याची भक्ती करण्याने सर्व मिळेल असे वाटते. लोकांचा असा समज दृढ व्हावा म्हणून थोर पुरुषांच्या शिकवणीचा अर्थ बदलून सांगण्याचे काम धार्मिक पुढारी करतात. त्यामुळे विवेकी श्रद्धा मागे पडते. म्हणूनच सर्व थोर पुरुषांच्या विचारातील समाज उपयोगी शिकवण वेगळी काढून त्या आधारे श्रद्धा बांधणी केली पाहिजे.

शाळेत धार्मिक शिक्षण हे सगळ्या धर्मातील शिकवणीच्या आधारे चिकित्सकपणे दिले गेले पाहिजे. त्याबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन वापरून आवश्यक असलेल्या श्रद्धा मजबूत केल्या पाहिजेत. केवळ प्रार्थना भजन-कीर्तन या गोष्टी करून भक्तीच्या माध्यमातून सर्व साध्य होईल असे मानण्याऐवजी या गोष्टी केवळ मानसिक आनंदासाठी केल्या आणि धार्मिक ग्रंथांतील चमत्कार

टाळून, प्रत्यक्ष कृती साठी विवेकी श्रद्धा वापरली तर आपला विकास जलदगतीने होऊ शकेल.

# विवेकी श्रद्धेचा जीवनावरील परिणाम

व्यक्तिगत पातळीवर एखादी श्रद्धा माणसाचे जीवन घडविण्यासाठी कारणीभूत ठरू शकते. विवेकी श्रद्धेने समृद्ध जीवन घडवता येते. तर अविवेकी श्रद्धेने संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होते. त्याचे समाजावरही सुपरिणाम किंवा दुष्परिणाम होऊ शकतात. आशावादी सकारात्मक विचार विवेकी श्रद्धेतून निर्माण होतात. ते जीवन समृद्ध करतात तर नकारात्मक निराशावादी विचार अविवेकी श्रद्धेतून निर्माण होतात आणि जीवनाचा विनाश घडवून आणतात. सतत दुःखी निराश जीवन जगून आत्महत्येसाठी प्रवृत्त होणे आणि दुसऱ्या बाजूला सुखी समृद्ध जीवन जगून यशस्वी होणे सर्वांना मदतीचा हात देणे या गोष्टी श्रद्धेमुळेच घडून येतात. व्यक्तीप्रमाणे समाजाच्या जीवनातही श्रद्धा मोठे कार्य घडवून आणतात. सतीची चाल, देवदासीची प्रथा, चेटकीण ठरवून जाळणे व ऑनर किलिंग यासारख्या सामाजिक अत्याचारामागे अविवेकी श्रद्धा असतात. स्वच्छ राहणे, आरोग्यदायक आहार, विहार व विचार त्यातून सुखी दीर्घायुष्याची निर्मिती हे विवेकी श्रद्धेमुळे घडून येते.

व्यक्तिगत पातळीवरील आणि सामाजिक पातळी वरील अविवेकी श्रद्धा नाहिशा करून त्याजागी विवेकी श्रद्धा स्थापन

करणे हे शिक्षणानेच साध्य होऊ शकेल. शिक्षणामध्ये स्वतंत्र विचारांना वाव देणे आवश्यक आहे एवढेच नव्हे तर चिकित्सकपणे विचार कसा करावा हे शिकवण्याची आवश्यकता आहे. विचार करण्यामध्ये कोणते अडथळे येऊ शकतात आणि त्यामुळे कसे चुकीचे निष्कर्ष निघू शकतात हे देखील शिकवणे आवश्यक आहे. विचार करण्याच्या क्षेत्रात अनेक मनोवैज्ञानिकांनी काम केले आहे. विचार करण्याची आपली नेहमीची पद्धत तर्काधिष्ठित असते परंतु त्या पद्धतीने सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतातच असे नाही. त्यासाठी एडवर्ड डी बोनो या मनोवैज्ञानिकांनी सर्जनशील विचार करण्याची पद्धत तयार केली आहे. तर्काधिष्ठित पद्धत आपल्याला पुढे पुढे नेते परंतु आजूबाजूला वेगळ्या गोष्टी असतात त्या दाखवीत नाही. त्यामुळे कला-साहित्य आणि विज्ञानाच्या क्षेत्रात नवीन शोध लागण्याची प्रक्रिया सर्जनशील असते. चित्रकार नवीन चित्र काढताना, संगीतकार नवे संगीत तयार करताना आणि साहित्यिक नवे साहित्य निर्माण करताना तर्काधिष्ठित विचाराने पुढे जात नाहीत. ज्यावेळी वेगळी गोष्ट पुढे येते त्यावेळी कला निर्माण होते. बोनोच्या मताने आपल्याला सर्जनशील विचार करण्याची पद्धत शिकवता येते. त्यासाठी आपण नेहमी जी होय-नाही पद्धत वापरतो ती न वापरता वेगळी पद्धत वापरावी लागते.

# विवेकी श्रद्धा व संत-महात्मे

लोकांची श्रद्धा विवेकाधिष्टीत करण्यासाठी संत महात्म्यांनी लोकांबरोबर राहून त्यांच्या श्रद्धांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला. बुद्ध ख्रिस्त यापासून संत तुकाराम व गाडगे महाराज यांचे प्रयत्न प्रस्थापितांनी यशस्वी होऊ दिले नाहीत. विवेकानंदांचा तर असा विचार होता की साधू संन्याशी यांचा उपयोग करून लोकांना विज्ञान शिकवायचे. परंतु त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने ते त्यांना साध्य करता आले नाही. श्रद्धाळू लोकांबरोबर राहून त्यांच्या श्रद्धा कशा विवेकी करता येतील यावर विवेकानंदांनी विचार केला होता. परंतु प्रस्थापितांनी त्यांनाही यशस्वी होऊ दिले असते असे वाटत नाही.

लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी त्यांच्या श्रद्धा बदलल्या पाहिजेत. श्रद्धा बदलण्यासाठी त्यांना विवेकाने विचार करायला शिकवले पाहिजे. स्वतंत्र विचाराची गुरुकिल्ली ही जिज्ञासा आहे. आणि जिज्ञासेचे समाधान करण्यासाठी प्रश्न विचारणे हा एकच मार्ग आहे. त्यासाठी आपल्याला ज्ञान ग्रहण संस्कृती सोडून ज्ञान निर्माण करणारी संस्कृती जोडावी लागेल!

## श्रद्धा आणि समाज

अविवेकी श्रद्धा मध्ये अडकलेले समाज किंवा देश मागासलेलेच राहतात. तेथील लोकांना असे वाटते की भौतिक प्रगती पेक्षा अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची आहे. त्यांचे अध्यात्म पूजा-अर्चा व विविध कर्मकांडे यातच सामावलेले असते. आपल्या देशात हजारो वर्षे हाच प्रकार चालू असल्यामुळे भौतिक विज्ञानात प्रगती झाली नाही. वर्षानुवर्षे दुष्काळ रोगराई यांना तोंड देत लोक तथाकथित आध्यात्मिक अनुभव घेत राहिले. त्या उलट सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेला युरोप भराभर पुढे गेला. युरोपातील पोर्तुगाल सारखे काही देश धर्मवेडा पायी मागे राहिले. आपल्या देशात अजूनही आरोग्य शिक्षण व भौतिक सुख सुविधा यापेक्षा मंदिरे पुतळे तीर्थक्षेत्र याला अधिक महत्व दिले जात आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून अनेक लोक शिक्षणाशिवाय जगतात आणि औषधाशिवाय मरतात! सर्व नैसर्गिक व मानव निर्मित आपदा या देव किंवा दैव यांच्या माथी मारल्या जातात.

आणखी एक अविवेकी श्रद्धा म्हणजे पूर्वीच्या जन्माचे पाप या जन्मी भोगावे लागते. त्यामुळे स्वकर्तृत्वावर परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी लोक असे समजतात की

पूर्वजन्मीच्या पापातून सुटका नसते. बहुसंख्य लोकांची निरक्षरता त्यांना या अविवेकी श्रद्धेला जखडून ठेवते. बरेच असे साक्षर लोकही बालपणी बिंबवलेल्या अविवेकी श्रद्धा मुळे कर्मकांडात गुंतून पडतात.

आपले पूर्वज खूप प्रगत होते आणि त्यांनी सगळे शोध लावलेले आहेत ही आणखी एक अविवेकी श्रद्धा होय. सगळेच अगोदर शोधलेले आहे तर आता संशोधन करण्याची गरजच काय अशी स्थिती निर्माण होते. त्याचप्रमाणे पूर्वजांनी लिहून ठेवलेले ग्रंथ अचूक व पूजनीय समजले जातात. त्यातूनच अविवेकी ग्रंथप्रामाण्याची शक्यता वाढीस लागते. त्यामुळे आमचे पूर्वज कसे श्रेष्ठ होते याचे गुणगान करण्यातच समाधान मानले जाते. विज्ञान परिषदांमध्ये पुराणातील विमाने, शस्त्रास्त्रे आणि शल्यचिकित्सांचा कोणत्याही पुराव्याशिवाय गौरव केला जातो. शास्त्रीय संशोधन संस्थांमध्ये सत्यनारायणाची पूजा केली जाते. इस्रो सारख्या अवकाश संशोधन संस्थेचे प्रमुख तिरुपतीच्या मंदिरात जाऊन अवकाश यानाची प्रतिकृती बालाजीच्या चरणी अर्पण करतात. म्हणजे आपल्या अवकाश मोहिमेचे यश देवाच्या आशीर्वादावरच अवलंबून आहे असे दाखवले जाते. यात वाईट काही दिसत नसले तरी ते वैज्ञानिक दृष्टिकोनाला घातक आहे हे निश्चित!

या दृष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन केवळ संविधानात असून चालणार नाही. तो व्यवहारात यावा लागेल. त्यासाठी अंनिस सारख्या संस्था करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. लोकांची मनोवृत्ती बदलल्याशिवाय शिक्षणात बदल होणार नाही आणि शिक्षणात बदल झाल्याशिवाय लोकांची मनोवृत्ती बदलणे कठीण आहे. हे दृष्टचक्र भेदण्यासाठी डॉक्टर दाभोळकरांसारखे अनेक विवेकी लोकांना बलिदान द्यावे लागेल असे वाटते.

## श्रद्धा विवेकी कशा आणता येतील?

श्रद्धा विवेकी करण्यासाठी वेगवेगळ्या श्रद्धांचा लोकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. एकत्र राहिल्याने एकमेकांच्या श्रद्धांची तुलना करता येते. जर आंतर जातीय व धार्मिक विवाह झाले तर ही प्रक्रिया अधिक जलद होऊ शकते. आता नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने वेगवेगळ्या श्रद्धा असलेल्या तरुण-तरुणी एकत्र येतात. आणि नैसर्गिक आकर्षणामुळे प्रेम संबंध जुळून विवाहबद्ध होतात. या प्रक्रियेतून एकाच कुटुंबात वेगवेगळ्या श्रद्धांचे लोक एकत्र राहिल्याने अविवेकी श्रद्धांचा अतिरेक कमी होतो. जपानमध्ये हे मोठ्या प्रमाणावर दिसून येते. एकाच कुटुंबात तेथे अनेक श्रद्धांचे लोक एकत्र राहतात त्यामुळे प्रत्येकाची श्रद्धा ही त्याची खाजगी गोष्ट असते. भारतात जसे एका श्रद्धेच्या लोकांचे एकत्रित समूह तयार होतात तसे तेथे होत नाहीत. त्यामुळे जपानमध्ये धार्मिक उन्माद आढळत नाही. आपल्या देशात वरच्या वर्गात ही प्रक्रिया सुरू झाली आहे. परंतु खालच्या वर्गाला एकत्र ठेवून त्यांच्यावर सत्ता गाजवण्यासाठी आपले धार्मिक व राजकीय नेते सामाजिक अभिसरणाच्या क्रियेला रोखून धरण्याचे काम करतात. त्यामुळे वेगवेगळ्या गटांची एकमेकांना भीती दाखवून एक गठ्ठा मते

मिळवता येतात. अशा प्रकारचे सामाजिक अभिसरण घडवून आणण्यासाठी सामाजिक माध्यमे प्रभावीपणे कार्य करू शकतात. अनेक विवाह संबंध या माध्यमांच्या मदतीने घडून येत आहेत.

# आधुनिक तंत्रज्ञान आणि अविवेकी श्रद्धा

मोबाईल सारख्या साधनांचा उपयोग करून इंटरनेटवर फेक न्यूज च्या माध्यमातून अविवेकी श्रद्धा वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा फेक न्यूजचा खोटेपणा सिद्ध करण्याचे काम काही लोक करीत असतात. त्यांची संख्या वाढणे आवश्यक आहे. या माध्यमांचा उपयोग करून लोकांना चिकित्सकपणे व विवेकी विचार करायची सवय लावता येईल.

विज्ञानातील नवनवीन शोध व संकल्पना लोकांच्या पुढे आणीत राहिल्यास त्याचा परिणाम अविवेकी श्रद्धा कमी होण्यासाठी होऊ शकेल. वैज्ञानिक माहितीच्या अभावामुळे अनेक वेळेला अविवेकी श्रद्धा टिकून राहतात. जंतूमुळे रोग होतो हे नीट कळले तर घरात वास्तूदोष असल्यामुळे कुटुंबातील माणसे आजारी पडतात ही अविवेकी श्रद्धा नाहीशी होईल. सूर्यग्रहण व चंद्रग्रहण का होते हे कळले तर ग्रहणात अंघोळ करून पुण्य मिळवण्याची प्रथा थांबेल. हे सर्व प्राथमिक विज्ञान शाळेत शिकवले जात असले तरीही आपल्या शिक्षण पद्धतीच्या स्वरूपामुळे ते केवळ पाठ करून परीक्षेत लिहावे व नंतर विसरून जावे अशा पद्धतीने होते. शिक्षण हा जीवनाचा भाग आहे अशा पद्धतीने जोपर्यंत शिक्षण दिले जात

नाही तोपर्यंत शिक्षण हे परिवर्तनाचे साधन म्हणून काम करू शकणार नाही. त्यामुळेच उच्चशिक्षित असूनही लोक अविवेकी श्रद्धेचे बळी ठरत आहेत!

# शिक्षण व विवेकी श्रद्धा

शिक्षणाला जीवनाचा भाग बनवले तरच ते प्रभावीपणे विवेकी श्रद्धा निर्माण करू शकेल. शिक्षणाला जीवनाचा भाग बनवण्यासाठी ते केवळ शाब्दिक घोका आणि ओका अशा स्वरूपाचे न राहता कृतीयुक्त झाले पाहिजे. म्हणजे जंतूंमुळे रोग होतो हे दाखवण्यासाठी मुलांना रोगजंतू पाहण्याची संधी मिळाली पाहिजे. तसेच त्या रोगामुळे ग्रस्त असलेल्या लोकांना पाहून त्यांच्यावर उपचार कसे केले जातात हे समजून घेता आले पाहिजे. ग्रहणाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना सूर्य पृथ्वी आणि चंद्र यांच्या प्रतिकृतींचा उपयोग करून पृथ्वीची सावली चंद्रावर कशी पडते किंवा चंद्राची सावली पृथ्वीवर कशी पडते हे प्रत्यक्ष दाखवले पाहिजे आणि त्यामुळे आपल्या शरीरावर किंवा मनावर कोणताही परिणाम कसा होत नाही हे निदर्शनास आणले पाहिजे. पृथ्वीचा गोल पणा, तिचे स्वतःभोवती फिरणे तसेच सूर्याभोवती फिरणे या गोष्टी सतत विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर ठेवल्या तर त्यांना विज्ञानाची दृष्टी यायला मदत होईल. बऱ्याच सुशिक्षीत लोकांना ह्या गोष्टी माहीत असतात. परंतु त्यांचा खरेपणा त्यांनी अनुभवलेला नसतो.

# अविवेकी श्रद्धेचे दुष्परिणाम

एखाद्या अविवेकी श्रद्धे पायी संपूर्ण समाजाला किंवा देशाला फार मोठी किंमत मोजावी लागते. जाती व्यवस्था ईश्वरदत्त आहे या श्रद्धेपायी आपला देश हजारो वर्षे अज्ञान व दारिद्र्यात राहिला. गाय ही माता आहे ह्या श्रद्धे पायी अजूनही अत्याचार होत आहेत. लहान मुले निष्पाप असतात त्यामुळे ईश्वर त्यांना युद्धात यश देईल या अविवेकी श्रद्धेने युरोपात क्रुसेड सारख्या युद्धात मुलांना लढण्यासाठी पाठवण्यात आले. चेटकिनी मुळे आजार होतात म्हणून युरोपात हजारो स्त्रियांना विविध प्रकारे मारण्यात आले. या सर्व श्रद्धा विज्ञानामुळे कमी होत गेल्या आहेत. तरीही अजूनही अपघात होऊ नये म्हणून गाडीला लिंबू-मिरची बांधणारे अनेक आहेत!नवीन गृह प्रवेशापूर्वी वास्तुशांती केली जाते, नवीन गाडी घेतल्या वर तिला आशीर्वाद दिला जातो. या श्रद्धा निरुपद्रवी असल्या तरीही निरुपयोगी आहेत. लोकांना तर अशा श्रद्धा हव्याच असतात. म्हणून या श्रद्धांच्या जागी दुसऱ्या उपयुक्त श्रद्धा कशा आणता येतील याचा विचार करायला हवा. वास्तुशांतीच्या निमित्ताने गरिबांना दानधर्म किंवा अडचणीत असलेल्यांना मदत

करता येईल. नवीन गाडी घेतल्यास लहान मुलांना किंवा आजारी वयोवृद्धांना मदतीसाठी ती वापरता येईल.

सगळ्या अविवेकी श्रद्धांतून तयार होणारी कर्मकांडे समाज उपयोगी बनवता येतील. देवाच्या मूर्तीला फुले वाहण्या ऐवजी मानवी देवमूर्तीला मदत करणे, देवाला दुधाचा अभिषेक करण्याऐवजी गरीब बालकांना ते दूध देणे यासारख्या प्रथा निर्माण करायला हव्यात. सर्व कर्मकांडे मानव केन्द्रित केली तरीही खूप फायदा होईल.

## श्रद्धा कशा तयार होतात?

आपल्या सबकॉन्शस मनाचे काम श्रद्धेच्या आधारे चालते. या श्रद्धा सबकॉन्शस मनाला पुरवण्याचे काम कॉन्शस मन करते. बऱ्याच श्रद्धा अनुभवातून आलेला विश्वास आणि कल्पना यांच्यामुळे तयार केल्या जातात. औषधांमुळे आजार बरे होतात या विश्वासामुळे लोक एखाद्या स्वामींने दिलेला प्रसाद किंवा विभुती श्रद्धेने आपल्या आजारासाठी वापरतो. काही वेळा प्लॅसिबो परिणामामुळे त्याला बरे वाटते. आणि आपोआपच त्या स्वामींना श्रेय मिळते. स्वामी आणि बुवा बाबांच्या भक्त मंडळीत अशा लोकांचा भरणा असतो की त्यांना काही अनुभव आलेला असतो. तसेच काही भाडोत्री भक्त असतात. ते केवळ आर्थिक फायद्यासाठी बाबांच्या आसपास वावरत असतात आणि बाबांनी केलेल्या खोट्या चमत्काराच्या गोष्टी पसरवित असतात.

निसर्गाच्या नियमा विरुद्ध काही घटना घडतात त्यांना चमत्कार म्हटले जाते. एखादा आजार आपोआप बरा होणे, पाण्यावरून वरून चालणे असे चमत्कार खरे मानणारे लोक आहेत. यज्ञ करून पूजाअर्चा करून किंवा प्रार्थना करून नैसर्गिक आपत्ती टाळता येतात, पाऊस पडता येतो या अशाच प्रकारच्या श्रद्धा आहेत. या सर्व अविवेकी श्रद्धा ब-याच वेळेला अज्ञान आणि

मानवी हतबलता यातून निर्माण होतात. रोग का होतात ह्याचे ज्ञान असणे आणि त्याच्यावर उपाय सहज उपलब्ध असणे या मुळे भूतबाधेवरील श्रद्धा नैसर्गिक प्रक्रिया कशी होते याचे ज्ञान असेल तर यज्ञ करून पाऊस पाडण्याच्या ऐवजी वैज्ञानिक पद्धतीने पाऊस कसा पाडता येईल यावर प्रयोग सुरू होतात.

लोकशाहीतील आपले निवडून आलेले नेते अविवेकी श्रद्धा बाळगणारे असतील तर वैज्ञानिक पद्धतीने एखादी समस्या सोडवण्याऐवजी ते कर्म कांडांचा उपयोग करू लागतात. शेजारी शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी संरक्षक बले मजबूत करण्याऐवजी महायज्ञ करणे हा तसलाच प्रकार आहे!

# श्रद्धा व संस्कार

बालपणी मुलावर केले जाणारे तथाकथित धार्मिक संस्कार अविवेकी श्रद्धेचा पाया घालतात. काही न समजता पूजा करणे, प्रार्थना व मंत्र म्हणणे व देवाच्या मूर्तीला नमस्कार करणे. एखादी गोष्ट करण्यासाठी असलेले कारण समजावून सांगितल्या शिवाय कृती करणे यावर भर असतो. बाल वयात मुलांना काही समजत नाही असे ठरवून या गोष्टी केल्या जातात. प्रत्यक्षात आपण समजतो त्यापेक्षा मुलांची समजून घेण्याची क्षमता जास्त असू शकते आणि तशी नसेल तर तिची वाढ होईपर्यंत थांबण्याची आपली तयारी नसते. समजून न घेता एखादी कृती करणे हे ती न करण्यासारखेच असते. त्यामुळे घरी आणि शाळेत केल्या जाणाऱ्या संस्काराचा भाग वगळला तर विवेकी श्रद्धा निर्माण व्हायला मदत होईल. आताच्या आपल्या शिक्षणात मुलांना घडवण्या ऐवजी अविवेकी श्रद्धा निर्माण करून बिघडविण्याची शक्यता जास्त असते. एखादी गोष्ट स्वतः शिकण्याची क्षमता निर्माण होईपर्यंत थांबल्यास मुले आपल्या आवडीची गोष्ट खूप वेगाने शिकतात असा सडबॅरी व्हेली येथील शैक्षणिक प्रयोगाचा निष्कर्ष आहे.

जगातील काही नामवंत लोक शाळेत न जाताच मोठे झाले आहेत. अमेरिकेचे माजी अध्यक्ष अब्राहम लिंकन आणि थोर शास्त्रज्ञ एडिसन यांची अशी उदाहरणे आहेत. शाळेत प्रगती न

दाखवलेले अल्बर्ट आईन्स्टाईन व बिल गेट्स ही देखील नामवंत माणसे आहेत. शाळेत न जाता त्यांचे शिक्षण घरीच झाले आहे असे रवींद्रनाथ टागोरां सारखे लोकही होऊन गेलेले आहेत. आता तर शाळेत मिळणारी सर्व माहिती घरबसल्या मिळू शकते. शाळेतल्या बंदिस्त वातावरणात मुक्त सामाजीकरणाची प्रक्रियाही नीट होत नाही. त्यामुळे शिक्षण पद्धती आणि शाळांची रचना यामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे.

## श्रद्धा, कर्मकांड व भावना

मानवी जीवन हे पूर्णपणे श्रद्धेने व्यापलेले आहे. त्यामुळेच धर्म आणि कर्मकांडे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. ज्या श्रद्धा मानवी मनाशीच जोडलेल्या आहेत. त्या मानवी मनावर नियंत्रण करतात. त्यामुळेच भावना दुखावण्याचे विचित्र प्रकार घडतात. त्यामधून अविवेकी कृती घडते. म्हणूनच भावनांनी जीवन व्यापलेले असले तरीही त्या श्रद्धेमुळे येतात व शक्तीचा उगम विचारांत असतो हे आपण विसरून जातो. या विचारांना योग्य दिशा देण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते.

संस्काराचे धडे देण्यासाठी आपण जी कृती करतो ती का करतो? असा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. केवळ धर्म ग्रंथात लिहिले आहे किंवा धर्म गुरूंनी सांगितले आहे म्हणून नव्हे तर मला समजले आहे. या कृतीचे बरेवाईट परिणाम मला माहित आहेत म्हणून मी ती कृती करीत असतो. असा विचार करीत राहिले तर हळूहळू अविवेकी कृतीवर नियंत्रण येत जाईल. परंतु त्यासाठी प्रश्न विचारण्याचे स्वागत केले गेले पाहिजे. कोणतीही प्रचलित धर्म संघटना या गोष्टीला अनुमती देत नाही. त्यामुळे संस्काराप्रमाणे संघटनादेखील स्वतंत्र विचाराला वाव देत नाहीत. विज्ञाना प्रमाणे

प्रत्येक श्रद्धेला आव्हान देण्याची क्षमता विकसित होणे आवश्यक आहे. समाज सुधारक आगरकरांप्रमाणे योग्य असेल ते बोलणार व शक्य असेल ती करणार ही भूमिका ठेवून विचारवंतांनी वावरले पाहिजे. अविवेकी श्रद्धा हा अंधार असून स्वतंत्र विचार प्रकाश आहे. तो जसा पसरत जाईल तशी अविवेकी श्रद्धा नाहीशी होईल.

## स्वतंत्र विचाराचे सामर्थ्य

स्वतंत्र विचाराची आपली अशी एक शक्ती असते. ते कोणत्याही जबरदस्ती शिवाय परिवर्तन घडवून आणतात. परंतु प्रकाश पसरवण्यासाठी जसा दिवा लावावा लागतो तसाच स्वतंत्र विचार पसरवण्यासाठी त्याचा उच्चार व प्रचार होणे आवश्यक असते. अविवेकी श्रद्धांचा पगडा असलेले लोक त्याला निकराचा विरोध करतात. कारण त्यांना आपली श्रद्धा हा जीवनाचा आधार वाटत असतो. स्वतंत्र विचारामुळे आपला हा आधार नाहीसा होईल या भीतीने ते स्वतंत्र विचारावर बंधने आणायचा प्रयत्न करतात. सनदशीर मार्गाने ते न जमल्यास शक्तीचा प्रयोग करून सामाजिक अत्याचाराने त्याला थांबवतात. अशावेळी आपल्या प्राणाचे बलिदान देऊनही विचारांचा प्रसार करणारे समाजाला विचार करायला भाग पाडतात. पुनरुज्जीवनाच्या काळात युरोपमध्ये असा प्रकार घडून आलेला आहे. विज्ञानाचा प्रचार करताना अनेक शास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यातूनच स्वतंत्र विचारांचा युरोप उदयास आला. पुढील काळात ज्ञान-विज्ञान व तंत्रज्ञान यावर प्रभुत्व मिळवून युरोपने जगावर राज्य केले. स्वतंत्र विचाराच्या अभावामुळे भारत मात्र

अज्ञान पारतंत्र्य व दारिद्र्य यात खितपत पडला. आपल्या देशात देव, देश आणि धर्म यासाठी बलिदान करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. परंतु स्वतंत्र विचारांसाठी बलिदान करणाऱ्यांची संख्या नगण्य म्हणावी लागेल. असे बलिदान करणारे या काळातले डॉक्टर दाभोळकर, कॉम्रेड पानसरे, डॉक्टर कलबुर्गी आणि पत्रकार गौरी लंकेश यांचा उल्लेख करावा लागेल. जसा विवेकी विचारांचा प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल तशी स्वतंत्र विचारासाठी लढणाऱ्यांची संख्या स्वतंत्र भारतात वाढत जाईल अशी अपेक्षा आहे.

# वैज्ञानिक विचार व श्रद्धा

या देशात मागील सत्तर वर्षात विज्ञानाधिष्ठित विचार करणाऱ्या लोकांमध्ये काही प्रमाणात वाढ झाली आहे. ते लोक एकूण लोकसंख्येच्या मानाने फार थोडे आहेत. परंतु त्यांच्या प्रभावामुळे अविवेकी लोकांची वक्तव्ये निष्प्रभ होताना दिसत आहेत. मोबाईल इंटरनेट सारख्या आधुनिक सुविधांमुळे या लोकांची संख्या वाढत जाण्याची शक्यता आहे. तसेच त्यांच्यामध्ये देवान-घेवान होऊन त्यांना बळ मिळण्याची देखील शक्यता आहे.

## अविवेकी श्रद्धा व मानवी वर्तन

अविवेकी श्रद्धा मानवाच्या पाशवी कृत्याला वैध ठरवतात. सतीच्या चालीला असलेली सामाजिक मान्यता, चेटकिणींना मारून टाकण्याची प्रथा किंवा व्यभिचार करणाऱ्या स्त्रीला दगडाने ठेचून मारण्याची प्रथा या सामाजिक अविवेकी श्रद्धा होत. एका देशाच्या सैनिकांनी दुसऱ्या देशाच्या सैनिकांनी शत्रू ठरवून मारणे हादेखील देशभक्ती ह्या अविवेकी श्रद्धेचा परिणाम होय. सर्व मानवता एक आहे. सर्वांनी एकमेकांवर प्रेम केले पाहिजे ही विवेकी श्रद्धा आहे! परंतु अशा विवेकी श्रद्धा सर्वत्र पसरण्यासाठी आणि सर्व लोकांनी आचरणात आणण्यासाठी सर्वत्र स्वतंत्र विचारांचा प्रसार करणे आवश्यक आहे.

## स्वतंत्र विचार व समाज माध्यमे

स्वतंत्र विचारांचा प्रसार होण्यासाठी विचारांवर कोणत्याही प्रकारचे बंधन असता कामा नये. प्रथम लोकांना विवेकी विचार करायलाही स्वातंत्र्य असायला हवे. त्यामुळे हळूहळू त्यांना अविवेकी काय आहे याची जाणीव होत जाईल. हे काम सध्या सोशल मीडिया करीत आहे. बरेच लोक आपले विचार मोकळेपणाने मांडत आहेत. तेथे कोणत्याही प्रकारचे बंधन नसल्याने योग्य काय आणि अयोग्य काय हे हळूहळू स्पष्ट होत जाईल. विचाराच्या गोंधळांतून विचारांची स्पष्टता निर्माण होईल. कारण विज्ञानातील प्रगती विचारांच्या क्षेत्रात सतत भर घालत असते. त्यामुळे अनेक विचार पडताळून पाहता येऊ शकतात.

# श्रद्धांची कालसापेक्षता

धर्मातील अविवेकी श्रद्धा स्थापनेच्या वेळी विवेकी असू शकतील परंतु कालांतराने झालेल्या समाजिक बदलांमध्ये त्या अविवेकी ठरतात. जन्मोजन्मी तोच पती मिळावा म्हणून वटसावित्रीची पूजा हा प्रकार वृक्ष रक्षणासाठी आवश्यक असेल. आजच्या आधुनिक युगात तो कालबाह्य झालेला आहे. आकाशात देव राहतो. तो आपल्यावर लक्ष ठेवतो. आपल्या ब-यावाईट कृत्याची फळे देतो. विज्ञानपूर्व खरे वाटत असेल. परंतु आता हे सर्वमान्य झाले आहे की आकाश हे केवळ वातावरणाचे रूप आहे. त्याच्या पलीकडे अमृत, स्वर्ग, नर्क वगैरे काही नाही. जे धर्म अजूनही अशा श्रद्धा बाळगतात ते देवादिकांच्या मूर्ती आणि मंदिरे बांधण्यात व्यस्त असतात. काही धर्म असे आहेत की त्यांच्या श्रद्धा कमी अविवेकी आहेत. उदाहरणार्थ पारशी लोकांचा झरतृष्टाचा धर्म हा अग्नीला पवित्र मानतो. अग्नि, प्रकाश, पाणी या वस्तूंना त्यांच्या पुजा प्रार्थनेत महत्त्व दिले जाते. मानवता व सजीवसृष्टीच्या कल्याणासाठी काम करणे पवित्र मानले जाते. वैयक्तिक पावित्र्यामध्ये प्रामाणिक पणा सारख्या सद्धगुणांना महत्व दिले जाते. या त्यांच्या श्रद्धांमुळे पारसी समाज संख्येने कमी असूनही

सगळ्या क्षेत्रात वरच्या पातळीवर पोहोचला आहे. त्या उलट मुस्लिम समाज आपल्या अविवेकी श्रद्धांमुळे मागासलेला राहिला आहे. अजूनही त्यांचा आधुनिक शिक्षणाला, स्त्री स्वातंत्र्याला विरोध आहे. त्याच पारंपरिक रूढी परंपरा व अविवेकी श्रद्धांचे ते बळी ठरले आहेत!

धर्मश्रद्धा कोणत्याही असल्या तरी त्या कालांतराने अविवेकी होत असतात. म्हणून त्यांची सतत चिकित्सा करत राहणे आवश्यक गोष्ट आहे. परंतु सर्वसामान्य मनुष्य अशी चिकित्सा करायला विरोध करतो कारण त्याला ती श्रद्धा नाहीशी होईल असे वाटते. त्यामुळे बहुतेक सर्व संत-महात्मे देवाचे खरे स्वरूप जाणत असूनही देवाचे नाव घेत श्रद्धा मध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. गौतम बुद्धांनी मात्र देवाचे नाव घेण्या ऐवजी चिकित्सेवर भर दिला. कोणत्याही पारलौकिक कल्पना न वापरता भौतिक जीवनात सुख व समाधान मिळवण्यासाठी काय करता येईल यावर त्यांनी विचार केला. त्यामुळेच जगभरातील विचारवंतांना बौद्धधर्म हा अधिक वैज्ञानिक व प्रगल्भ वाटतो! तरीपण कोणत्याही धर्माची संस्थात्मक चौकट भक्कम होत जाते तशी स्वतंत्र विचारांवर बंधने येतात. ग्रंथ प्रामाण्य वाढते. मूळ विचार कितीही प्रगल्भ असले तरीही बदलत्या काळानुरूप त्यात प्रवाहीपणा आवश्यक असतो. प्रवाहीपणा मुक्त स्वातंत्र्यामधूनच येऊ शकतो. म्हणूनच सर्व

संस्थात्मक धर्मांचा शेवट हीच मानवतेची पहाट असू शकते. परंतु मानवाला श्रद्धे बरोबर संस्थाही हव्या असतात. त्यामुळे सर्वांना सामावून घेणारी लोकशाही हीच संस्था एक पर्याय उरते!

## लोकशाही आणि श्रद्धा

लोकशाहीवरील श्रद्धा म्हणजेच लोकांच्या भलेपणावरील श्रद्धा आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या लोकांना समजून घेणे हा लोकशाहीचा आत्मा ठरतो. प्रत्येक माणसाबद्दल आदर ठेवून त्याच्या भल्यासाठी काम करण्याची प्रवृत्ती ठेवल्यास लोकशाही यशस्वी होऊ शकते. प्रत्येक मानवा बद्दल आदर वाढवण्यासंबंधीचा प्रथम उच्चार ख्रिस्ताच्या शिकवणीत आढळतो. आपल्या शत्रुवर देखील प्रेम करा असे म्हणणाऱ्या ख्रिस्ताला आपल्यापेक्षा वेगळे मत असणाऱ्या विषयी आदर दाखवणे अपेक्षित होते. जर सगळी माणसे एकमेकांशी प्रेमाने राहायला लागली तर कोणत्याही संस्थेची गरज राहणार नाही किंवा संस्थांचे रूपांतर प्रेमळ परिवारामध्ये होईल!

लोकशाहीचा आत्मा म्हणजे मानवतेवर श्रद्धा होय. सर्व मानवता एक असून त्यांच्यामध्ये असलेले भेद हे निसर्गनिर्मित असोत किंवा मानवनिर्मित वरवरचे आहेत. वेगळे वर्ण व शरीरांची ठेवण, वेगवेगळे धर्म वेगवेगळ्या भाषा हे भेद असूनही सर्वांची समजून घेण्याची क्षमता आणि विवेक शक्ती सारखीच आहे. ही एकच श्रद्धा सर्वांनाच जोडणारी व लोकशाहीला घडवणारी आहे.

सर्व मानवाच्याच नव्हे तर सर्व सजीव सृष्टीच्या भल्याचा विचार करणे आणि त्यांचे एकमेकाशी असलेले संतुलन सांभाळणे हा मानवताधर्माचा आत्मा असला पाहिजे. स्वतंत्र विचाराला वाव देणारी लोकशाही आणि तिला सबळ करणारी प्रेमावर आधारित मानवता हे मानवाचे उज्ज्वल भविष्य असू शकते.

## जीवशास्त्र आणि श्रद्धा

सारी सजीव सृष्टी या एकाच प्रकारच्या रचनेने बांधलेली आहे. सुरुवातीला जन्मास आलेला एक पेशीय सजीव आणि त्यापासून निर्माण झालेली विविधता याच्या मुळाशी आहे एक जीन!हा जीन सर्व सजीव सृष्टीला टिकवून ठेवतो व वाढवतो. हा जीन आहे सजीव सृष्टीचा कर्ता. तोच सजीवांना पुनरुत्पादन करण्यासाठी जगवतो. पुनरुत्पादनाचे काम आटोपल्यावर मारून टाकतो. त्याच्या दृष्टीने सजीवाचे शरीर हे एक साधन आहे. सजीवांचे जगणे-मरणे हे त्याच्यासाठी आहे. उत्पादनाचे काम संपले की तो जीवांचा अंत घडवून आणतो. त्यासाठी तो सजीवांना आपल्या शरीराला अपायकारक असलेले अन्न खायच्या मोहात पडतो. जास्त साखर तेल हे पदार्थ खाऊन काम न केल्यास वजन वाढून मृत्यू लवकर येणे ही जीनची करामत असते. या जीनचे कार्य त्याला मिळणाऱ्या पर्यावरणावर अवलंबून असते. पर्यावरण माणसाच्या श्रद्धेच्या रुपाने त्याच्या पर्यंत पोहोचते. घटना आपल्या मनावरचा परिणाम करतात त्याचे मुळ आपल्या मनात असलेल्या श्रद्धा मध्ये असते. बाहेर घडलेली घटना धोकादायक आहे असे आपल्याला वाटते तेव्हा मनात भीती निर्माण होते. बाहेर घडणारी

घटना आनंददायक आहे असे वाटते तेव्हा मनात आनंद निर्माण होतो. या भावना निर्मितीसाठी कारण असणारे हार्मोन्स जीन्सना कृतिशील करतात. याचा अर्थ श्रद्धा बदलून भावना बदलता येतात त्यामुळे जीनचे कार्य बदलते.

अनेक लोकांच्या जीवनात आजार आणि अकाली मृत्यू येण्याचे कारण त्यांच्या अविवेकी श्रद्धा असू शकतात. आपण केलेले कृत्य पाप आहे, आपण खाल्लेले अन्न विषारी आहे अशी श्रद्धा असल्यास त्याप्रमाणे जीन्सची कृती घडून येते. आपल्या मनातील या श्रद्धा जोपासण्याचे काम आपली संस्कृती करते. पापपुण्य याविषयीच्या कल्पना आपल्याला आपल्या धर्माने किंवा संस्कृतीने दिलेल्या असतात. त्या विवेकाने आचरणात आणण्याची गरज असते. म्हणूनच सगळ्या श्रद्धांपासून मुक्त होणे हा सुखी जीवनाचा मंत्र आहे. ती अवस्था साध्य करण्यासाठी बुद्धांनी दाखवलेला ध्यानधारणा करण्याचा मार्ग सर्वात अधिक उपयुक्त आहे.

## श्रद्धा आणि ध्यानधारणा

ध्यान धारणेलालाच आधुनिक मनोवैज्ञानिक माइंडफुल मेडिटेशन म्हणतात. त्याचा उपयोग करून आपल्याला मनाच्या क्रियेपासून वेगळे होता येते. मनाला शरीरापासून मुक्त केले की ते स्वतंत्रपणे वर्तमान काळात जगू लागते. हाच खऱ्या आनंदाचा झरा असतो.

# धर्म आणि श्रद्धांचा अन्वयार्थ

सर्व धार्मिक साहित्यामध्ये भूतदया आणि मानव सेवा याविषयी सांगितले आहे. त्या धर्मग्रंथांचे पठण भक्तीभावाने केले जाते. ते ग्रंथ पवित्र आहेत असे समजून त्यांची पूजा केली जाते. परंतु त्या ग्रंथामध्ये केलेला उपदेश समजून घेऊन आचरणात आणला जात नाही. धर्म समजून घेण्याचा विषय नसून भक्तीभावाचा विषय बनवला गेला आहे. त्यामुळेच धर्म संस्थापक व संत यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचले नाहीत. त्यासाठी प्रत्येक मंदिराचे स्वरूप धर्माच्या अभ्यासाचे स्थान असे झाले पाहिजे. भावना बाजूला सारुन चिकित्सक बुद्धीने धार्मिक शिकवणीचा अभ्यास झाला पाहिजे. त्या शिकवणीचा अन्वयार्थ आधुनिक काळाशी सुसंगत कसा करता येईल हे पाहिले पाहिजे. असे करायला एका धर्माने सुरुवात केली तर त्याचा परिणाम दुसऱ्या धर्मावर होईल. विशेष म्हणजे त्या धर्माचे लोक अधिक चांगले जीवन जगू लागतील.

मागच्या काळात धर्मसुधारक संतांनी धार्मिक श्रद्धांचा वापर करूनच धर्म सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पण त्या सर्वांचा छळ झाला व त्यांनाही पूजनीय बनवून भक्तीचे नवे मळे उभे राहिले.

आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे त्यामध्ये कोणत्याही गोष्टीच्या अभ्यासाला महत्त्व दिले जाते. त्यालाच वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणतात. केवळ शाळा-कॉलेजांतूनच नव्हे तर मंदिरातून देखील धार्मिक साहित्यावर अभ्यास सत्रे आयोजित करायला हवी. समाजामध्ये सर्वत्र श्रद्धेचा भक्तीभाव पसरण्याऐवजी चिकित्सक अभ्यासाचे वातावरण तयार झाले पाहिजे. तरच मानवाची या मानसिक बंधनातून सुटका होईल. मानवी समाज खऱ्या अर्थाने होमो सेपियन म्हणजे शहाणा मानव होईल.

मंदिराचे स्वरुप बदलून त्यांना विद्यामंदिर बनवले पाहिजे. एरव्ही सगळे धर्म आपल्या धार्मिक स्थळांमध्ये धार्मिक शिक्षण देत असतात. प्रत्येक धर्म आपापल्या धर्मग्रंथाची शिकवण आपल्या धर्म स्थळांमध्ये देत असतो. ख्रिस्ती लोक चर्चमध्ये बायबलची शिकवण देतात, तर मुस्लिम लोक मदरशांमधे कुरान शिकवतात. धर्म स्थळांच्या रूपाने लोकांचा मानसिक आधार असलेल्या जागा उपलब्ध आहेत. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे अशा ठिकाणी आधुनिक ज्ञान विज्ञानाची माहिती असलेले स्वामी नियुक्त करता आले तर फार मोठे काम होऊ शकते. त्यासाठी सर्व धर्मीय धर्मगुरू होऊ पाहणा-या तरुणांना एखादी सर्वसामान्य पदवी देणारे विद्यापीठ स्थापण करता येईल किंवा अस्तित्वात असलेल्या विद्यापीठांना ही जबाबदारी उचलता येईल. या धर्मगुरूंना सर्व

धर्माचे ज्ञान असेल. तसेच ते आधुनिक ज्ञान विज्ञानाशी परिचित असतील. ते जेव्हा धर्मस्थळांचा ताबा घेतील तेव्हा तो सर्व परिसर बदलून जाईल. या गोष्टी सक्तीने घडवून आणता येणार नाहीत. त्यासाठी पुन्हा सार्वत्रिक प्रबोधनाची गरज आहे. प्रबोधनाची सुरुवात शाळेतून करावी लागेल. पुन्हा या प्रबोधनाचा पाया हा स्वतंत्र विचार आणि लोकशाही हा असेल. अगदी बालवाडीपासून संस्काराच्या नावाखाली कोणतेही विचार मुलावर लादले जाणार नाहीत हे पहावे लागेल. शाळेत हे शिक्षण घेण्यासाठी त्याची उपयुक्तता काय आहे हे पालकांना आणि शिक्षकांना तसेच शासकांना पटवून देणे आवश्यक आहे. सध्याच्या श्रद्धेवर आधारित शिक्षण पद्धतीमुळे देशाची फार मोठी हानी झाली आहे. स्वतंत्र विचाराच्या अभावामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन वाढू शकला नाही. त्याचा परिणाम म्हणून तंत्रज्ञानात प्रगती झाली परंतु मूलभूत विज्ञान मागे राहिले. देशाच्या प्रगती बरोबरच सामाजिक प्रगती वरही त्याचा परिणाम झाला. वैयक्तिक स्तरावर अविवेकी श्रद्धांमुळे लोकांची अपरिमित हानी झाली आहे. वेगवेगळे स्वामी, बुवा व बाबा यांच्या प्रभावाखाली स्त्री-पुरुष मुले यांचे शोषण सुरू आहे. त्यामध्ये गरीब श्रीमंत सुशिक्षित व अशिक्षित सर्व आहेत. स्वतंत्र विचाराचे प्रभावी शस्त्र जे मानवाचे खरे सामर्थ्य आहे, ते वापरले

गेले नाही तर मानव आणि इतर प्राण्यांमध्ये फारसा फरक राहत नाही.

## पूर्वजांची कृती आणि श्रद्धा

आपल्या पूर्वजांनी केलेल्या गोष्टी या चुकीच्या असतील तरीही त्या आपल्याला आपल्या संस्कृतीचा भाग वाटतात. त्यांचा अभिमान बाळगणे हे आपल्याला आपले कर्तव्य वाटते. त्यामुळेच संस्कृती टिकून राहते असा सार्वत्रिक समज आहे. प्रत्यक्षात संस्कृतीशी कर्मकांडांचा काही संबंध नाही. आपल्या भारतीय संस्कृतीत अग्नीला प्रदक्षिणा घालून लग्न लावले जाते. अग्नी हा पवित्र असून ते देवाचे रूप आहे. त्याच्या साक्षीने लग्न लावणे हे लाभदायक व टिकाऊ असते अशी श्रद्धा पूर्वीच्या काळी होती. आधुनिक काळात लग्न हा एक कायदेशीर व्यवहार झालेला आहे. तो टिकून राहण्यासाठी कायदेशीर बंधने आहेत. आजच्या काळात अशा प्रकारच्या विधीची आवश्यकता नाही तरीही तो संस्कृतीचा भाग म्हणून आपण त्याच प्रकारे लग्न लावतो. संस्कृती ही प्रवाही गोष्ट आहे. आपल्या पूर्वजांनी केलेली ज्ञान, विज्ञान, कला व साहित्य यामधील प्रगती हा आपल्या संस्कृतीचा भाग असला तरीही आपण खूप पुढे आलेलो आहोत हे मान्य करून नव्या युगाला अनुसरून वागले पाहिजे.

# वैज्ञानिक दृष्टिकोन आणि श्रद्धा मधील बदल

वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित स्वतंत्र विचार आपल्या श्रद्धा विवेकी ठेवण्यासाठी मदत करतात. विज्ञान पूर्वकाळातील आपल्या सर्व श्रद्धा आता बदलल्या आहेत. आपल्या शरीरातील रक्त स्थिर असते असे पूर्वी मानत असत परंतु रक्ताभिसरणाचा शोध लागल्यानंतर आता आपण मानतो की आपल्या शरीरातील रक्त सतत प्रवाही असते. विज्ञानातील निरीक्षणे प्रयोग व शोध सतत आपल्या विचारांना नवी दिशा देत असतात. त्यामुळे आपल्या श्रद्धा ही अधिकाधिक विवेकी होत जातात. यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची सांगड श्रद्धेशी घालणे अत्यंत आवश्यक आहे.

श्रद्धेची सांगड वैज्ञानिक दृष्टिकोनाशी घालण्यासाठी आपल्या दररोजच्या जीवनात वैज्ञानिक विचार रुजले पाहिजेत. आपल्या शाळा कॉलेजातून विज्ञान फक्त विषय म्हणून शिकवणे पुरेसे नाही. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी विज्ञानावर आधारित चर्चासत्रे आयोजित केली पाहिजेत. माध्यमांमधून वैज्ञानिक चर्चा घडवून आणल्या पाहिजेत. टीव्हीवर वैज्ञानिक मालिका आल्या पाहिजेत. वैज्ञानिक विषयावरील चित्रपट निघाले पाहिजेत. कुटुंबा कुटुंबांतून

देवादिकाच्या व भुताखेताच्या गोष्टींऐवजी वैज्ञानिक विषयांवर चर्चा व्हायला हवी!

# विज्ञानाचा विस्तार व त्याचे परिणाम

आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. पूर्वीच्या काळी धर्म शासनव्यवस्था यांनी लोकांचे सर्वाधिक जीवन व्यापले होते. आज ती जागा विज्ञान व तंत्रज्ञानाने घेतली आहे. लोक जरी विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात काम करीत असले तरीही वैज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्या मनात उतरलेला असेलच असे नाही. आपण वापरत असलेली साधने व उपकरणे आधुनिक वैज्ञानिक युगांतील असली तरी विचारसरणी मात्र हजारो वर्षांपूर्वीची वापरतो. म्हणजे शरीराने आपण विज्ञान युगात तर मनाने आपण पुराण युगात वावरतो!

## स्वतंत्र विचार व नवे जग

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर वाढवून सर्व जण स्वतंत्रपणे विचार करायला लागले तर जग कसे असेल? अविवेकी श्रद्धा मानवी जीवनातील सर्व दुःखाचे मूळ आहे. सगळ्या विध्वंसक भावना निर्माण करण्याचे काम अविवेकी श्रद्धा करतात. सर्व सृष्टीवर प्रेम करण्याची भावना फक्त विवेकी श्रद्धेतून येते. त्यामुळे सर्व मानव विवेकी श्रद्धेने वागू लागले तर सर्वत्र प्रेमाचे साम्राज्य निर्माण होईल. सर्व धर्म आणि मानवनिर्मित संस्था कालबाह्य होतील. कुणाला कुणावर सत्ता व अधिकार गाजवण्याची इच्छा राहणार नाही. विज्ञानाचा प्रयोग स्वार्थासाठी केला जाणार नाही तर लोकांच्या कल्याणासाठी केला जाईल. सुख शांती निर्माण होईल. थोर पुरुषांच्या स्वप्नातील मानवता साकार होईल! पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल!

पृथ्वीवर स्वर्ग साकारण्यासाठी स्वतंत्र विचाराची प्रतिष्ठापना करणारा माणसांचा झपाटलेला समूह निर्माण झाला पाहिजे. देव, देश आणि धर्मासाठी स्वतःला वाहून घेणारे अनेक होऊन गेले. आता वेळ आली आहे स्वतंत्र विचारांसाठी व प्रेमाचे साम्राज्य निर्माण होण्यासाठी वाहून घेण्याची!

स्वतंत्र विचार करणारे लोक एकत्र कसे आणता येतील हे पाहिले पाहिजे. कारण स्वतंत्र विचार करणाऱ्यांना एकत्र राहायची सवय नसते. अनेक लोकांना स्वतंत्र विचार करणे म्हणजे एकमेकांशी भांडणे असे वाटते. त्यामुळे विचारात सर्जनशीलता आणून तर्कसंगत विचार करण्यापेक्षा सर्जनशील विचार कसे उपयुक्त आहेत हे समोर आणावे लागेल. त्यासाठी एडवर्ड डी बोनो सारखे विचारवंत मनोवैज्ञानिक जो सर्जनशील विचार करण्याची प्रक्रिया पुढे आणीत आहेत त्याला बळ मिळाले पाहिजे.

## कामभावना आणि श्रद्धा

आपल्या अनेक अविवेकी श्रद्धा या लैंगिक संबंधाशी निगडित आहेत. इतर सर्व प्राणी किंबहुना सर्व सजीवसृष्टीचा लैंगिक संबंध हा एक नैसर्गिक भाग आहे. पुनरुत्पादनासाठी निसर्गाने ठरवून दिलेली ती प्रक्रिया आहे. मानवाने मात्र आपली बुद्धीमत्ता व कल्पनाशक्ती यांचा वापर करून त्यामध्ये नीतिमत्ता आणली आहे. जीवनातील ह्या मूलभूत गोष्टीविषयी अतिशय गुप्तता पाळणे व त्याविषयी चर्चा न करणे यामुळे पापपुण्य व पवित्र अपवित्र या अविवेकी श्रद्धा निर्माण झाल्या. त्याचा पहिला वाईट परिणाम स्त्रियांना भोगावा लागला. त्यांच्यामुळे पुरुष बिघडतात असे पुरुषप्रधान समाजाने ठरवले. त्यातूनच स्त्रियांना घराबाहेर पडू न देणे, शिक्षण न देणे, बुरख्यात ठेवणे एवढेच नव्हे तर पतीच्या मृत्यूनंतर सती जायला भाग पाडणे. या सर्व अत्याचारांना धार्मिक श्रद्धांचे रूप दिले गेले. सामाजिक मान्यतेमुळे स्त्रियांनी ती बंधने संस्कृतीचा भाग म्हणून स्वीकारली. स्त्रियांच्या या गुलामगिरीमुळे समाजावर त्याचे भयानक दुष्परिणाम झाले. धार्मिक अविवेकी श्रद्धांना बळी पडलेल्या स्त्रियांनीच त्या श्रद्धा टिकवून ठेवण्यासाठी अज्ञानामुळे प्रयत्न केले. अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे

स्त्रियांवरील ही बंधने आता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहेत. आणि त्याचे सुपरिणाम दिसायला लागले आहेत. अर्धा मानव समाज मुक्त झाल्यामुळे समाजाच्या प्रगतीचा वेग वाढला आहे. सगळ्या क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करायला लागलेल्या आहेत.

मानवी लैंगिक संबंध एक नैसर्गिक गोष्ट असून तिचा पाप-पुण्याशी कोणताही संबंध नाही हे समजून घेणे आवश्यक आहे. मनोवैज्ञानिक फ्राईडच्या मताने सगळ्या मानवी कृती आणि अविष्काराचा उगम त्याच्या काम वासनेतून होतो. त्यामुळे काम वासनेवरील बंधने मानवाला विकृत बनवतात. त्याची सृजनशीलता मारून टाकतात. कदाचित युरोपियन लोकांची ज्ञान विज्ञानातील प्रगती ही तेथील कमी लैंगिक बंधनामुळे असावी. आशियाई देश व विशेष करून भारत या बंधनांमुळे मागासलेला राहिला आहे! ऐतिहासिक काळात भारतात वात्स्ययानाने कामसूत्र लिहिले त्याकाळात भारताची प्रगती दैदिप्यमान होती असे इतिहास सांगतो.

लैंगिक संबंधांतील अंधश्रद्धा बहुदा कुटुंब व्यवस्था सुरू झाल्यानंतर आल्या असाव्यात. कुटुंबामध्ये स्त्री-पुरुष नात्याला महत्त्व आले. आपली मुले आणि दुसऱ्याची मुली हा भेदभाव आला. केवळ नर-मादी नव्हे तर आई-मुलगा, वडील-मुलगी,

भाऊ-बहीण अशा प्रकारचे स्त्री-पुरुषांतील वेगळे नाते संबंध अस्तित्वात आले. हे नातेसंबंध जपण्यासाठी काही यम नियम तयार झाले. रक्ताचे नाते असलेल्या लोकांमध्ये लैंगिक संबंध निषिद्ध मानले गेले. प्राणीसृष्टीत अशा प्रकारची कोणतीच बंधने नाहीत. माणसाच्या बुद्धीमुळे त्याला निसर्ग नियम मोडून स्वैराचारी वागता येते. प्राण्यांना तसे वागता येत नाही. म्हणूनच लैंगिक संबंधावर नियमांचे बंधन असणे आवश्यक आहे. परंतु त्याभोवती पापपुण्याचे वलय तयार करण्याची गरज नाही. त्यामुळे सगळेच लैंगिक संबंध हे अनैतिक आहेत अशी अविवेकी श्रद्धा तयार होत गेली. कामवासना ही नैसर्गिक गोष्ट असून तिच्यामुळे मिळणारा आनंद स्वर्गीय आहे. तो टाळण्याऐवजी संयमाने उपभोगता यावा म्हणून लग्न संस्था निर्माण झाली. परंतु लग्न संस्थेतील बंधनांमुळे अनेक विकृतींचा जन्म झाला.

लैंगिक संबंध व लैंगिक अंगांचे प्रदर्शन याबाबतीत जगभरातील लोक वेगवेगळ्या प्रकारे वागतात. अविवेकी श्रद्धा आणि रुढी यांमध्ये अडकलेले लोक हा विषय अतिशय गोपीनीय समजतात. आपले शरीर जास्तीत जास्त झाकणे, स्त्रियांना तर बुरख्यात ठेवणे आणि ह्या विषयावर मोकळेपणाने चर्चा न करणे हे सभ्य समजले जाते. परंतु पाश्चिमात्य देश या बंधनातून बरेच मुक्त

झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून तेथील लोकांच्या अविवेकी श्रद्धा खूपच कमी झाल्या आहेत.

मानवी प्रेमभावनेची मूळ त्याच्या कामवासनेत आहे. स्त्री व पुरुष लग्न करण्यासाठी एकत्र येतात ते केवळ लैंगिक आकर्षणामुळे होय. त्यांच्या एकत्र येण्याने मुलाचा जन्म होतो आणि प्रेमाचे दुसरे रूप वात्सल्य निर्माण होते. त्याच माता-पित्यांना दुसरे मुल होते आणि भावा बहिणीचे प्रेम साकार होते. अशाप्रकारे नात्यांची उतरंड तयार होत जाते. त्यात पुन्हा नात्यातील स्त्री-पुरुषांमध्ये लैंगिक भावनेचे उदात्तीकरण होते. त्यामुळेच मुलगी बाबाची लाडकी असते तर मुलगा आईच्या जवळ असतो. भावा भावा पेक्षा भाऊ-बहीण त्यांचे नाते अधिक घट्ट असते त्यातूनच रक्षाबंधना सारखे सण निर्माण होतात. काम वासनेतून उत्क्रांत झालेली प्रेमभावना हीच पुढे माणसामाणसांतील विश्वासाचे रूप घेते. विश्वासाच्या पायावर मानवांच्या सर्व संस्था उभ्या आहेत. विश्वासच पुढे श्रद्धेला जन्म देतो. म्हणजे सर्व श्रद्धांची मूळ लैगिक संबंधांपर्यंत जाते. म्हणूनच श्रद्धा सुधारण्यासाठी लैंगिक संबंधावर काम केले पाहिजे. त्यांचा शास्त्रीय अभ्यास केला पाहिजे. त्याचा शारीरिक आणि मानसिक भाग नीट समजून घेतला पाहिजे.

लैंगिक संबंध व कामवासना निरोगी करण्यासाठी बालसंगोपना पासून सुरुवात झाली पाहिजे. बालपणी मुला-मुलींना एकत्र मोकळेपणाने नग्न स्थितीमध्ये खेळू देण्याने त्यांना एक-मेकांच्या इंद्रियांची सहज ओळख होईल. त्यामुळे मोठेपणी निर्माण होणारी जिज्ञासा नाहीशी येईल. त्याचप्रमाणे पालकांनी मुलांशी या विषयावर मोकळेपणाने बोलले पाहिजे. शाळेत देखील मुलांना लैंगिक विषयाचे व त्यामधून होणाऱ्या गोष्टींचे शास्त्रीय ज्ञान मिळायला हवे.

## कुटुंब संस्था व श्रद्धा

कुटुंब संस्थेच्या उदयापासून आणखी एक नवी अविवेकी श्रद्धा तयार झाली आहे. प्रत्येक जोडप्याला मुलगा हवा असतो. मुलीला जन्म दिला, वाढवले व शिकवले तरीही वयात आल्यानंतर तिचे लग्न करून परक्याच्या घरी जाते. आपल्याला म्हातारपणीचा आधार आपला मुलगाच असतो या भावनेतून वंशाचा दिवा ही आणखी एक अविवेकी श्रद्धा निर्माण होते. आपला मुलगाच आपला वंश पुढे चालवतो मुलगी नव्हे. कारण मुलगा आपल्याबापाचे नाव लावतो तर मुलगी आपल्या नवऱ्याचे नाव लावते. लग्न लावून मुलीने नवऱ्याच्या घरी जाणे व त्याचे नाव लावणे तसेच मुलाने आपल्या वडिलांचे नाव लावणे या प्रथा आपणच निर्माण केलेल्या आहेत हे आपण विसरून जातो. प्रथा ह्या आपल्या सोयीसाठी असतात त्यांच्यामुळे गैरसोय होत असेल तर त्यांच्यात बदल करता आला पाहिजे. आधुनिक काळाच्या रेट्याने या प्रथांमध्ये काही प्रमाणात बदल होत आहेत. लग्न झालेल्या मुली देखील आपल्या आई-वडिलांची काळजी घेत आहेत. तसेच आपले नावही कायम ठेवीत आहेत. मुलगा होण्याविषयी आग्रह असला तरीही दोन मुलीनंतर नियोजन केले

जाते. कारण मुलांना वाढवणे, शिकवणे व मोठे करणे हे दिवसेंदिवस कठीण व महाग होत चालले आहे. पुढच्या काळात या प्रथा आमूलाग्र बदलून जातील यात शंका नसावी.

मुलाच्या जन्मासाठी नवस करणे आणि मुलीला नकोशी समजणे हा प्रकार देखील अजूनही सुरू आहे. त्यामुळे मुलगी जन्माला येण्या अगोदरच गर्भात मारली जाते. या प्रकारातून सामाजात गंभीर लैंगिक असंतुलन निर्माण होते. आपल्या मुलाचे लग्न लावण्यासाठी मुलगीच उपलब्ध नसेल तर वंश पुढे कसा जाईल? समाजाच्या पातळीवर जागृती व प्रबोधन तसेच शासकीय पातळीवर कायदेशीर बंधने आणून मुलींचा जन्मदर वाढवता येईल. तसे न केल्यास माणसाची लैंगिक भूक अतृप्त राहिल्याने बलात्कारासारखे अत्याचार वाढण्याची शक्यता आहे. उपाशी माणूस जसा अन्नाची चोरी करतो तसाच लैंगिक भूकेलेला माणूस बलात्कार करायला प्रवृत्त होतो. त्याला कोणतीही शिक्षा दिली तरीही हे गुन्हे नाहीसे होणार नाहीत!

## लैंगिक स्वातंत्र्य आणि बलात्कार

गडचिरोली भागात जेथे प्रकाश आमटे काम करतात तेथे आदिवासी समाजात कोणतेही बलात्कारासारखे लैंगिक गुन्हे होत नाहीत. तो समाज लैंगिक दृष्ट्या स्वतंत्र आहे. तरुण-तरुणींना आपल्या साथीदारांची निवड मोकळेपणाने करता येते. लग्न न करता त्यांच्यासोबत राहता येते. मुले झाल्यावर आई वडीलांचा औपचारिक लग्न समारंभ मुलांच्या सोबतच होतो. लैंगिक संबंधांना पापपुण्याची जोड दिली जात नाही. त्यामुळे एका स्त्रीने एकाच पुरुषाबरोबर राहणे, पातिव्रत्य पाळणे व आपल्या साथीदाराच्या मृत्युनंतर वैधव्य येणे हे प्रकार त्या समाजात आढळत नाहीत. त्यामुळे लैंगिक बंधनातून येणाऱ्या विकृती तेथे फारच कमी आहेत. सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजाने त्यांच्याकडून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. समाज लैंगिकदृष्ट्या बंधमुक्त असेल तर अनेक प्रकारची बंधने गळून पडतात. मानसिक आरोग्य सुधारले की त्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावरही चांगला होतो.

बहुतेक सगळे धर्म ब्रह्मचर्य महत्त्वाचे मानतात. स्त्री-पुरुषांनी लैंगिक संबंधां पासून दूर राहणे, एवढेच नव्हे तर कामवासनाही मनात न आणणे म्हणजे पवित्र जीवन जगणे अशा प्रकारची विलक्षण अविवेकी श्रद्धा सगळे धर्म जोपासत असतात. लैंगिक

भूक ही पोटाच्या भुके इतकीच नैसर्गिक असून ती टाळणे अशक्य आहे हे लोकांना समजत नाही. त्यामुळे स्वतः लैंगिक सुख उपभोगून बाहेर आपण ब्रह्मचर्य पळत असल्याचे दाखवण्याची ढोंगी प्रवृत्ती वाढीस लागते. अनेक बुवा बाबा आपल्या आश्रमांमध्ये स्त्रिया व मुलीवर अत्याचार करताना सापडतात. ते अशा लैंगिक गोष्टीला देवादिकांच्या रासक्रीडांचे स्वरूप देऊन काही काळ अंध भक्तांना फसवतात. कारण स्वामींच्या गुप्त कारवाया नजरेआड चालतात. बाहेरच्या सभागृहामध्ये मात्र ढोंगी सत्संग चाललेला असतो. सर्वसामान्य लोकांमध्ये वेगळेच चित्र उभे केले जाते. सर्व धर्मांतील धर्म गुरूमध्ये अशा प्रकारची प्रकरणे उघडकीस आलेली दिसतात. तरीही लोकांना ही श्रद्धा खरीच वाटते!

काही धर्मांमध्ये कामवासना वाढू नये म्हणून स्त्रियांना पुरुषां पासून वेगळे ठेवले जाते. मुलींच्या शाळा वेगळ्या असणे, जोगिनीचे मठ वेगळे असणे व स्त्रियांनी बुरख्यात राहणे सर्व प्रकार पुरुषांना पापापासून वाचवण्यासाठी केले जातात. त्यामुळे लैंगिक भावना अधिकच चेकाळतात. लढाई मध्ये किंवा दंगलीमध्ये स्त्रियांवर अधिकच अत्याचार केले जातात. जिहादमध्ये बलिदान करणाऱ्या युवकांना जन्नत मधील सुंदर युवती समूह दाखवला जातो. पृथ्वीवर उपलब्ध असलेले हे स्वर्गीय सुख युवकांना मिळू न

दिल्यामुळे ते जीवावर उदार होऊन आपल्या जीवाचे बलिदान करायलाही तयार होतात!जर बंधमुक्त कामजीवन शक्य झाले तर जगात मोठ्या प्रमाणात शांतता नांदेल याविषयी शंका नाही.

# आजार व श्रद्धा

मानवी जीवनातील अविवेकी श्रद्धांचे मूळ हे मानवाला जडणाऱ्या विविध आजाराशी देखील निगडित आहे. आजार होण्याची कारणे ठाऊक नव्हती तेव्हा लोक देवीचा, देवाचा कोप किंवा सैतानाची इच्छा यामुळे रोग व आजार होतात असे मानत होते. पुढे रोगांची कारणे कळल्यानंतर त्यावर औषध उपचार करता येऊ लागला. त्यामुळे या श्रद्धा काही प्रमाणात कमी झाल्या. परंतु त्यांच्याबद्दलचे ज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत न पोहोचल्यामुळे आपण औषधाने बरे होतो हे समजून न घेता त्याचे श्रेय देवाला देऊ लागले. काही आजार अजूनही विज्ञानाला बरे करता आले नाहीत तरीही त्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. डॉक्टर रांच्या मानवी चुकी मुळे औषधोपचार चुकला व रोगी दगावला तरीही वैद्यकीय शास्त्राविषयी अविश्वास निर्माण होतो. हळूहळू रोग निदान करण्याची प्रक्रिया कम्प्युटर वर आधारित होईल तसे चुकांचे प्रमाण कमी होऊन अचूक निदान करता येईल. वैद्यकीय उपचारांमध्ये मानवी चुका बरोबरच मानवी भ्रष्टाचाराचाही परिणाम होतो. जास्त पैसे कमावण्यासाठी कमी प्रतीची उपकरणे व औषधे निर्माण केली

जातात व वापरली जातात. त्यामुळे देखील मानवी जीविताला धोका निर्माण होतो व अविवेकी श्रद्धेला खतपाणी घातले जाते.

## संकटे व श्रद्धा

जीवनात येणारी आकस्मिक संकटे ही अविवेकी श्रद्धेचे एक कारण आहे. आर्थिक संकट, शारीरिक अपघात आणि शुभप्रसंगी घडून येणारी विघ्ने ही माणसाला आपल्या आकलना पलीकडची वाटतात. ती येऊ नये म्हणून लोक शुभ मुहूर्त पाहतात आणि विघ्नहर्त्याची पूजा करतात. शरीरावर तावीज बांधणे आणि वाहनात लिंबू मिरची बांधणे हे अविवेकी श्रद्धेने केलेले संरक्षणाचे उपाय होत. अशा घटनांचे विवेकी विश्लेषण करून त्यातून बाहेर पडण्यासाठी उपाय योजना करता येते किंवा अशा घटना टाळता येऊ शकतात.

## चमत्काराच्या कथा आणि श्रद्धा

चमत्कारांच्या कथा आणि अफवा अविवेकी श्रद्धांना खतपाणी घालतात. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, तुकाराम महाराज सदेह स्वर्गात गेले, ख्रिस्त मेल्यानंतर पुन्हा जिवंत झाला अशासारख्या धर्मग्रंथात वर्णन केलेल्या चमत्कारांच्या घटना अविवेकी श्रद्धा बळकट करतात. काही नैसर्गिक घटनातून देवाने दर्शन दिल्याच्या अफवा पसरतात. ढगातून दिसणारी ख्रिस्त माता, भाजीपाला व फळात दिसणारा गणपती, क्रुसातून पाणी ठिबकणे, ख्रिस्ताच्या हातातून रक्त वाहने व देवीच्या मूर्तीच्या डोळयातून अश्रू येणे या सर्व खऱ्या-खोट्या घटना कशा घडल्या याचा शास्त्रीय शोध न घेता त्या खऱ्या मानल्या जातात व अविवेकी श्रद्धेला उधान येते. लोकांच्या झूंडी पूजा-प्रार्थनेसाठी धाव घेतात. अशा घटनांवर मात करण्यासाठी स्वतंत्र चिकित्सक विचारांचीच आवश्यकता आहे.

# मृत्यू आणि श्रद्धा

मृत्यूची अटळता हे अविवेकी श्रद्धा निर्माण होण्याचे मोठे कारण आहे. सर्व सृष्टीमध्ये निर्मिती आणि विनाश यांची चक्र सुरू असते. जीवसृष्टी मध्ये देखील जन्म आणि मृत्यू हे चक्र सुरू असते. मानव सोडून इतर सजीवांना या जीवनाच्या चक्राची काही प्रमाणात जाणीव असली तरी समज नसते. मानवाला त्याच्या बुद्धिमत्ते मुळे भूतकाळ आठवतो व भविष्यकाळाची कल्पना करता येते. आपल्या आकलन शक्तीमुळे तो स्वतःला इतर प्राण्यांपेक्षा वेगळे समजतो. इतर प्राण्यांच्या मृत्यूचे त्याला फारसे काही वाटत नाही. परंतु आपल्या बरोबरीच्या माणसाच्या मृत्यूमुळे आपणही मरणार ही त्याला खात्री असते. त्यासाठी सुरवातीच्या काळात त्याने पूर्वजांच्या अवशेषांचे जतन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तेही कालांतराने नष्ट होतात हे लक्षात आल्यावर माणसाने आपल्या मध्ये काही अमरतत्व असावे अशी कल्पना करायला सुरुवात केली. तीच कल्पना म्हणजे अमर आत्मा होय. माणसाच्या मृत्यूनंतर आत्मा अमर रहात असेल तर त्याचे पुढे काय होते हा प्रश्नच निर्माण होतो. या प्रश्नाच्या उत्तरातूनच पुनर्जन्म, आत्म्याचे पुन्हा जिवंत होणे, स्वर्ग-नर्क व देव-दानव या कल्पना निर्माण

कराव्या लागल्या. मृत्यू नंतरची कर्मकांडे व अविवेकी श्रद्धा यामधून निर्माण झाल्या.

सर्व सजीव सृष्टी मूलतः समान पायावर उभी आहे. वनस्पती व प्राणी या सर्वांमध्ये सभोवतालचे ज्ञान आणि पुनरुत्पादन याबाबतीत एक समानता आढळते. सजीवांच्या शरीरात पेशी आढळतात. केवळ डी एन ए च्या जनुकीय रचनेत फरक झाल्यामुळे जीवसृष्टी मध्ये विविधता आली आहे. त्यामुळे आत्म्याची कल्पना सोडून दिल्यास त्यावर आधारित सर्व अविवेकी श्रद्धा उन्मळून पडतात!

माणसाला आपला मृत्यू म्हणजे शेवट आहे हे पचवणे कठीण वाटते. मृत्यूच्या भीतीवर मात करण्यासाठी सगळे धर्म अमरत्वाची ग्वाही देतात. मृत्यूच्या या भीतीवर मात करण्यासाठी मनाच्या मशागतीची गरज आहे. त्यासाठी अधिक मनोवैज्ञानिक संशोधन व्हावे लागेल.

## धर्माचे ठेकेदार आणि श्रद्धा

श्रद्धा आणि धार्मिक कर्मकांडांना व्यावसायिक रूप देणारे धर्माचे ठेकेदार अविवेकी श्रद्धांना खतपाणी घालण्याचे काम वर्षानुवर्षे करीत आहेत. एखादा क्रांतिकारक धर्मसुधारक निघून गेल्यानंतर त्याच्या नावाने धार्मिक संस्था उभ्या राहतात. या संस्था टिकून राहण्यासाठी मनुष्यबळ आणि आर्थिक बळाची गरज असते. हे बळ मिळवण्यासाठी अविवेकी श्रद्धांची व्यवस्थित मांडणी केली जाते. त्याच्या आधारे धर्म ग्रंथ रचले जातात. धर्मसंस्थापक महापुरुषांनी सांगितलेली शिकवण या ग्रंथांतून समाविष्ट केलेली असते. परंतु त्यात तिचा अन्वयार्थ मात्र अविवेकी श्रद्धेला पोषक कसा होईल हे पाहिले जाते. त्यामुळे धर्मसंस्थापक महात्म्याचा पहिला बळी दिला जातो. त्याला देवपण बहाल करून त्याची पूजाअर्चा व प्रार्थना भक्तिभावाने करायला शिकवली जाते. त्यातून भक्तमंडळी वाढते, दानधर्म केला जातो. संस्थेची अर्थव्यवस्था मजबूत होत जाते आणि संस्थेला सेवा पुरवणारे मनुष्यबळ कामाला लावले जाते. नोकरशाही यंत्रणा तयार होते. ही यंत्रणा संस्था मजबूत पणे टिकून राहावी म्हणून विविध प्रकारची उपाय योजना करते. त्यामध्ये नवीन अविवेकी श्रद्धांची भर घालण्याचे काम केले जाते. त्यामुळेच सर्व धार्मिक संस्थांचे संस्थानिकांमध्ये रुपांतर झाले आहे.

या धार्मिक संस्था त्यांनी ठरवलेल्या धर्म निंदक लोकांना छळण्यासाठी त्यांना धर्म व समाज बहिष्कृत करतात. यामध्ये अनेक विचारवंत व विवेकी लोकांचा बळी जातो. धर्माच्या ठेकेदारांना तीर्थक्षेत्रे, कुंभमेळे व हज यात्रा या पर्वणी सारख्या वाटतात. तेथे त्यांना नवे अनुयायी, मानसन्मान व आर्थिक प्राप्ती होते. राजकारणी लोकांनाही धर्माचा उपयोग करून घेण्याची ही सुवर्णसंधी असते. लोकांची मते वळवण्यासाठी आपणही मोठे देवभक्त आहोत असे ते दाखवतात. यातून राजकारणाची देखील अधोगती होते हे सांगायला नको. काही निवडून आलेले लोकप्रतिनिधी लोकांच्या सुखसोयी कडे लक्ष देण्याऐवजी त्यांना तीर्थक्षेत्री पाठवायला आर्थिक मदत करतात! अशा लोकांच्या भौतिक सुखसोयी सुधारत नाहीत. रस्त्यावरील खड्डे कायमच राहतात. कारण धार्मिकतेचा आव आणणारे राजकारणी कमालीचे भ्रष्ट असतात! त्यांच्या धार्मिक ढोंगीपणा पासून भ्रष्टाचाराला सुरुवात होते आणि लैंगिक व आर्थिक शोषणात शेवट होतो!

## व्यक्तिगत अविवेकी श्रद्धा

माणसाच्या व्यक्तिगत जीवनात स्वतःविषयीच्या ही काही अविवेकी श्रद्धा असतात. आपल्याला एखादा आजार झाला आहे असे मानणे, आपला स्वभाव तापट आहे किंवा प्रेमळ आहे असे मानणे व त्याप्रमाणे वागणे. हा अविवेकी श्रद्धेचाच प्रकार आहे. सर्वसामान्यपणे माणसे जन्मतःच निरोगी व सुस्वभावी असतात. परंतु बालपणीच्या त्यांच्या संगोपनातून त्यांच्यामध्ये ह्या अविवेकी श्रद्धा रुजवल्या जातात. बालपणी सतत झालेल्या आघाताचा परिणाम म्हणून माणसाच्या मनात भीतीची भावना ठाण मांडून बसते. आपले शरीर या भावनेला इतके सरावले जाते की आपल्या नकळत आपण भीतीच्या आहारी जातो. या भीतीपोटीच माणसाला पुढे देवाची तसेच भूत पिशाच्च्याची भीती खरी वाटायला लागते. त्यामुळे त्यांना प्रसन्न करण्यासाठी वेगवेगळी कर्मकांडे करायला तो प्रवृत्त होतो. त्यातूनच पुत्रप्राप्ती, धनप्राप्ती व आरोग्य प्राप्तीसाठी नरबळी वगैरे देण्याचे प्रकार निर्माण होतात.

मानसाच्या मनात बसलेली बालपणातील भीती कायम त्याच्यावर नियंत्रण करते. त्यामुळेच चालू असलेल्या अविवेकी श्रद्धा, चाली-रीती व रूढी परंपरा बदलण्याची हिंमत त्याला होत

नाही. कुणी त्या बदलायचा प्रयत्न केला तर तो त्याला विरोध करतो.

# एकटेपणाची भावना आणि श्रद्धा

माणूस हा केवळ सामाजिक प्राणी नसून त्याच्या जाणिवा जागृत असल्यामुळे एकटेपणाची भावना सतत सतावत असते. त्यावर मात करण्यासाठी तो समुहात राहायचा प्रयत्न करतो. त्यामुळे समूहाच्या अविवेकी श्रद्धा तो कळत नकळत स्वीकारतो. त्या श्रद्धा नाकारल्यास आपण एकटे पडू ही त्याला भीती असते. वटसावित्रीच्या व्रतासारखी काही कर्मकांडे सुशिक्षित स्त्रिया देखील बिनबोभाट पळतात.

आपल्या कुटुंब व्यवस्थेने स्त्रियांना अधिक अविवेकी अंधश्रद्धा पाळण्यास भाग पाडले आहे. स्त्री लग्न होऊन एका कुटुंबातून दुसऱ्या कुटुंबात जाते. काहीवेळा समाज देखील बदलावा लागतो. अशा वेळी तिला नव्या कुटुंबात व नव्या समाजात सामावून घेण्यासाठी व सुरक्षिततेसाठी तेथील श्रद्धा, रीतिरिवाज व कर्मकांडे पाळावी लागतात. त्यामुळेच सुशिक्षित स्त्रिया देखील वेगवेगळी व्रतवैकल्ये करतांना आढळतात. बऱ्याच वेळा त्यांना त्यांतील निरर्थकता समजलेली असते. परंतु मैत्रीचे नाते जोडण्यासाठी त्या या गोष्टी करतात. काही स्त्रिया याबाबत खूपच डोळस असतात. सर्व कर्मकांडात राहून देखील त्या त्यांच्यापासून अलिप्त राहू शकतात. त्यांना विचारले असता त्या असे सांगतात

की हे सर्व समाजात रहाण्यासाठी करावे लागते. त्यामुळे लग्न होऊन त्या कोणत्याही समाजात किंवा धर्मात गेल्या तरीही त्यांना समायोजन करता येते. निसर्गाने दिलेल्या बाळंतपण व बाल संगोपन या जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना आपली सामाजिक सुरक्षितता वाढवणे आवश्यक भासत असावे.

## जातीव्यवस्था आणि श्रद्धा

जातीव्यवस्था ही आधुनिक काळातील आणखी एक अविवेकी श्रद्धा आहे. ज्यावेळी सार्वत्रिक शिक्षणाची सोय नव्हती किंवा परवानगी नव्हती त्या काळात व्यावसायिक कौशल्ये शिकण्यासाठी पालकांची मदत आवश्यक होती. कुंभाराचा मुलगा कुंभार काम तर लोहाराचा मुलगा लोहार काम करीत होता. त्यामुळे पिढ्या न पिढ्या या कौशल्याचे हस्तांतरण होत होते. ती व्यवस्था नसती तर कदाचित या कला नष्ट झाल्या असत्या. जाती व्यवस्थेमुळे त्यांच्या जातीतील लोकांना सामाजिक संरक्षण मिळत होते. आता आधुनिक शिक्षणामुळे व्यवसायिक शिक्षणाची सोय झालेली आहे परंतु जातीचे सामाजिक संरक्षण मात्र कायम राहिलेले आहे. त्यासाठी पर्यायी व्यवस्था निर्माण झाली आणि लोकांना सहजपणे शासकीय यंत्रणेकडून मदत मिळू लागली तर जातीव्यवस्था झपाट्याने नाहीशी होईल!

# घराणेशाही आणि श्रद्धा

कुटुंब व्यवस्थेमुळे घराणेशाही निर्माण होते. त्यातूनच आपल्या घराण्यातील लोक श्रेष्ठ ही अविवेकी श्रद्धा निर्माण होते. त्यामुळे समाजात खालचा आणि वरचा असे वर्ग निर्माण होतात. हे वर्ग जाती-धर्म याबरोबरच आर्थिक परिस्थितीमुळे देखील निर्माण होतात. या वर्गवारी मुळे समाजात तटबंदी होऊन रोटी-बेटी व्यवहार बंद होतात. याचा विस्तार होत पुढे वांशिक भेदभाव सुरू होतात. आर्य-द्रविड, काळे-गोरे हे भेद प्रभावी होत जातात. भिन्न भाषक लोकांमध्येही भेदभाव सुरू होतात. परस्पर संवादा अभावी गैरसमज वाढतात. मानवातील उच्च निचता ही एक मोठी अविवेकी श्रद्धा जगावर अनेक वर्षे राज्य करीत आलेली आहे. त्यातूनच जगाने गुलामगिरी अनुभवली आहे. आपल्याकडील जातीव्यवस्था ही देखील अशाच अविवेकी श्रद्धेचे फळ आहे.

स्त्री-पुरुषांमधील उच्चनीचता ही मानवी संस्कृतीच्या उगमापासून सुरू झाली असावी. या अविवेकी श्रद्धेने अर्धा मानवी समाज दुर्बल करून टाकलेला होता. स्त्रियांच्या सबलीकरणामुळे आता त्यात काही प्रमाणात बदल होत आहे. धर्माने गौन ठरवलेल्या

स्त्रियांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाने पुरुषांच्या बरोबरीस आणून ठेवले आहे.

# छद्मविज्ञान आणि श्रद्धा

काही विज्ञानाशी संबंधित नसलेले लोक छद्म विज्ञानाच्या साह्याने अविवेकी श्रद्धा निर्माण करतात. त्यासाठी ते विज्ञानातील संज्ञा व विज्ञानाची भाषा वापरतात. काही तथाकथित सिद्धपुरुष आपल्या मनाच्या सामर्थ्याने निर्माण केलेल्या लहरी दुसऱ्यांच्या मेंदूत सोडून त्यांचे आजार बरे करतात. सूक्ष्मजीव धारण करुन परग्रहावर जातात. तेथील सर्व सृष्टी स्वतः पाहून पृथ्वीवर येऊन वर्णन करतात. या सर्व गोष्टी ते विज्ञानाची भाषा व उपलब्ध माहितीचा वापर करून पद्धतशीरपणे सांगतात. त्यामुळे सामान्य माणसांची दिशाभूल होते. काही डॉक्टर इंजिनीयर यासारखे व्यवसायिक देखील अशा लोकांना बळी पडतात. त्यांनी घेतलेल्या वैज्ञानिक शिक्षणातून त्यांना वैज्ञानिक दृष्टी मिळालेली नसते आणि त्यांच्या बालपणीच्या संस्कारांत असलेल्या गोष्टी कायम राहतात. काही असाध्य रोगाने ग्रस्त असलेले लोक असाह्यते पोटी अशा लोकांच्या भजनी लागतात. असे हे छद्म वैज्ञानिक स्वामी उच्चशिक्षित व बहुश्रूत असतात. त्यांच्या बोलण्याला भुलून बरेच पांढरपेशे स्त्री-पुरुष त्यांच्याकडे गुरु म्हणून पाहतात. लोकांकडून आलेल्या देणग्या व स्वयंसेवक यांच्या मदतीने हे स्वामी

लोकोपयोगी कामे करण्याचा देखावा ही करतात त्यामुळे त्यांच्यावरील भक्ती अधिकच वाढते!

विज्ञान क्षेत्रात काम करणारे वैज्ञानिक देखील अनेक अविवेकी श्रद्धा निर्माण करतात. हे आश्चर्यकारक असले तरीही सत्य आहे. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी काही शोध आपण लावल्याचे जाहीर करतात. सखोल तपासानंतर ते खोटे असल्याचे सिद्ध होते. तोपर्यंत एक अविवेकी श्रद्धा तयार झालेली असते. अनेक वेळेला अनंत काळ चालणाऱ्या चक्राचा दावा केला जातो. सूर्या सारखा ऊर्जा स्रोत तयार केल्याचे सांगितले जाते. पाण्यापासून पेट्रोल तयार करणे शक्य करून दाखवले जाते. अशा गोष्टी बऱ्याच वेळेला विज्ञान जाणणाऱ्या लोकांकडूनच केल्या जातात. वैज्ञानिक चाचण्यातून त्यांचा फोलपणा सिद्ध होतो. तरीही अविवेकी श्रद्धा समाजात टिकून राहतात. अशा श्रद्धा तयार करून त्या टिकवण्यासाठी प्रसार माध्यमे मोठी मदत करतात.

# अविवेकी श्रद्धा आणि मुले

अविवेकी श्रद्धा मुलांच्या डोक्यात बिंबवण्याचे काम संस्काराच्या नावाखाली केले जाते. सगळ्या धर्म चालवणाऱ्या लोकांना हे ठाऊक असते की जेवढ्या लवकर मुलांच्या डोक्यात या अविवेकी श्रद्धा बसवता येतील तेवढ्या त्या जास्त टिकून राहतात. त्यामुळेच धर्मातील अनेक चमत्काराच्या गोष्टी लोक मोठे झाल्यानंतर देखील खऱ्या मानतात. कृष्णाच्या ख्रिस्ताच्या वगैरे जन्माच्या कथा तसेच त्यांनी केलेले चमत्कार बाल वयात जेव्हा चिकित्सक बुद्धी तयार झालेली नसते तेव्हा बिंबवल्या जातात. त्यामुळेच हिंदू घरात जन्मलेला मुलगा हिंदू तर मुसलमान घरामध्ये जन्मलेला मुलगा मुसलमान होतो. ती त्याची निवड नसते. त्याच्यावर त्याच्या पालकांनी लादलेला धर्म हा त्याच्या अभिमानाचा विषय होतो. त्याला वारंवार सांगितलेली कोणतीही काल्पनिक गोष्ट खरी वाटू लागते. त्यातूनच पुढे कट्टर धर्माभिमानी तयार होतात. अतिरेकी निर्मितीचा पाया घातला जातो. म्हणूनच वयात येईपर्यंत मुलांना कोणत्याही प्रकारच्या धार्मिक संस्कारात अडकवून ठेवू नये. त्यांना सर्व आधुनिक कला कौशल्य व ज्ञान द्यावे आणि वयात आल्यानंतर आपला धर्म निवडण्याची किंवा

धर्माशिवाय राहायची संधी मिळावी. जपानमध्ये बऱ्याच प्रमाणात या पद्धतीने धर्माचा स्वीकार केला जातो त्यामुळे तेथे प्रत्येक कुटुंबामध्ये वेगवेगळे धर्म पाळणारे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये कोणतेही धार्मिक ताण तणाव निर्माण होत नाहीत. एकाच धर्माचे लोक एकत्र राहणे हा गटबाजीचा प्रकार तेथे नाही. त्यामुळे धार्मिक दंगली होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

# अविवेकी श्रद्धा व सरकार

सरकारी नियंत्रणात असलेली प्रसिद्धीमाध्यमे सरकारच्या हितासाठी विविध अविवेकी श्रद्धा निर्माण करून त्या टिकविण्याचे काम करतात. जे हिटलरने गोबेल्स नीतिच्या नावाखाली केले. जर्मनी मधील काही लोक उच्च वर्णाचे असून बाकीच्यांना नष्ट केले पाहिजे हे त्यांनी तेथील लोकांच्या डोक्यात बसवले. यासाठी प्रसारमाध्यमे हीच अविवेकी गोष्ट सांगत राहिली. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ज्यू लोकांचे मोठ्या प्रमाणात हत्त्याकांड झाले. आधुनिक काळात लोकशाही म्हणवणाऱ्या शासन व्यवस्था देखील या पद्धतीचा वापर करताना आढळतात. निवडणुका जिंकण्यासाठी देव-धर्म राष्ट्रभक्ती अशा भावनिक गोष्टी पुढे करून दैनंदिन गरजा व अडचणी यापासून लोकांचे लक्ष विचलित केले जाते. अविवेकी श्रद्धेपायी लोक अशा प्रचाराला सहज बळी पडतात.

# वस्तू, संख्या आणि अविवेकी श्रद्धा

काही अविवेकी श्रद्धा संख्या किंवा वस्तूंशी निगडित असतात. तेरा ही संख्या अशीच अपशकुनी समजली जाते. हॉस्पिटल मधील तेरा नंबरच्या बेडवर जायला लोक तयार नसतात. हॉटेलच्या तेरा नंबरच्या रूम रिकाम्या राहतात म्हणून हॉटेल मालक तो नंबर वगळून पुढचे नंबर देतात. मांजर आडवी जाणे हा त्याचाच प्रकार आहे. काही लोक एखादी वस्तू शकुनाची किंवा लाभदायक म्हणतात. एखाद्या पेनमुळे परीक्षेत चांगले यश मिळणे विशिष्ट पोषाख परिधान केल्याने कार्यक्रम यशस्वी होणे ही सर्व अशीच अविवेकी श्रद्धा आहे. काही लोक काही धार्मिक चिन्हे गळ्यात घालतात किंवा दंडाला बांधतात. अशा चिन्हांमध्ये देवादिकांच्या मूर्ती किंवा एखाद्या स्वामींनी मंत्रवून दिलेल्या वस्तूंचा समावेश असतो. अशा अविवेकी श्रद्धांमधून बाहेर पडण्यासाठी सूक्ष्म निरीक्षण आणि स्वतंत्र विचार हाच उपाय आहे.

## मानवी शरीर आणि श्रद्धा

सर्व मानवाची निर्मिती जरी आफ्रिका खंडातून झालेली आहे असे मानले जाते तरी जगभर पसरलेल्या लोकांमध्ये विविध प्रकारची ठेवण आढळते. उंच ठेंगणे, काळे गोरे व मजबूत नाजूक असे विविध प्रकार भौगोलिक परिस्थिती व वातावरणामुळे निर्माण झाले आहेत. परंतु काही लोक आपल्यापेक्षा वेगळे असलेल्या लोकांना कमी दर्जाचे समजतात. निसर्गाने केलेल्या ह्या भेदा बरोबरच मानव निर्मित भेदही आहेत. सुशिक्षित अशिक्षित, सुसंस्कृत असंस्कृत, श्रीमंत-गरीब आणि स्वच्छ व घाणेरडे हे मानव निर्मित भेद अनेक अविवेकी श्रद्धांना जन्म देतात.

## पूर्वजन्म आणि श्रद्धा

कर्मविपाकाचा सिद्धांत ही अशीच एक अविवेकी श्रद्धा आहे. या जन्मामध्ये भोगावे लागणारे भोग किंवा उपभोगायला मिळणारे सुख हे पूर्व जन्माच्या कर्मावर अवलंबून असते असे हा सिद्धांत सांगतो. एखादा माणूस सुखी श्रीमंत असणे किंवा दुःखी दारिद्री असणे त्यांच्या पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ असते. वरच्या जातीत जन्माला येऊन सुख उपभोगणे व खालच्या जातीत जन्म घेऊन दुःख सहन करणे ही त्याचीच फळे आहेत. एकदा ही अविवेकी श्रद्धा मान्य केली म्हणजे तक्रार करायला जागा उरत नाही. मानवी कर्तृत्वाला वाव राहत नाही. पुनर्जन्माची कल्पना काही समाजात आढळते. नवीन जन्माला येणारे मूल आपल्या आई-वडिलांचे आजी-आजोबांचे काही गुणदोष दाखवते. त्यावरून लोकांचा असा समज होतो की हा त्या माणसाचा पुनर्जन्म आहे. त्यातून कर्म विपाकाच्या सिद्धांताला बळ मिळते. विज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास पुनर्जन्म ही अशक्य गोष्ट आहे! या श्रद्धेतूनच जातिव्यवस्थेची भयानक गुलामगिरी वर्षानुवर्षे टिकून राहिली.

## भूता खेतांवरील श्रद्धा

देवाधर्माच्या अविवेकी श्रद्धा प्रमाणे भुताच्या अविवेकी श्रद्धा मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यांचा संबंध प्रथम मृताच्या आत्म्याशी जोडला जातो. माणसाच्या मृत्यूनंतर त्याचा आत्मा अमर असल्यामुळे त्या माणसाच्या इच्छा अपूर्ण राहिल्यास त्या इच्छा पूर्ण करण्यासाठी तो आत्मा भटकत राहतो. त्यालाच भूत पिशाच्य म्हटले जाते. भूत अंगात येऊन माणसे झपाटत असतात. अशीच झपाटलेली माणसे काही चमत्कारिक गोष्टी करू शकतात अशी अविवेकी श्रद्धा लोकांच्या मनात बसलेली असते. त्यातून येणारे काल्पनिक अनुभव लहान मुलांना सांगितले जातात व ते त्यांच्या मनात कायम बसतात. भुतांच्या भीतीमुळे लोक रात्रीच्या अंधारात स्मशानात किंवा एकाकी जागी जाण्यासाठी घाबरतात. अशा प्रकारची अविवेकी श्रद्धा घालवण्यासाठी प्रत्यक्ष अनुभव लहानपणापासून दिला गेला पाहिजे. ज्या ठिकाणाची भीती वाटते तेथे प्रत्यक्ष जाऊन मुलांना खात्री करण्याची संधी दिली पाहिजे. हे काम प्रथम पालक व नंतर शिक्षक करू शकतात. बऱ्याच वेळा रस्त्यावर होणारे रात्रीचे अपघात देखील भुता मुळे होतात असे मानले जाते. भूत कुत्र्यासारख्या प्राण्यांचे रूप घेऊन आडवे येते

आणि अपघात होतो असे लोक मानतात. प्रत्यक्षात तो खराच प्राणी किंवा त्याचा भास असू शकतो. ज्याला अपघात झालेला आहे अशा लोकांना आपली स्वतःची चूक मान्य करण्या ऐवजी भुताच्या माथी मारणे सोपे असते.

## छंद्मविज्ञान शास्त्रे व श्रद्धा

अनेक अविवेकी श्रद्धा छद्मशास्त्राशी जोडलेल्या आहेत. ज्योतिष शास्त्र हा त्यातलाच एक खूप जुना व लोकप्रिय प्रकार आहे. आकाशातील ग्रह तारे जीवनावर परिणाम करतात आणि त्यांचे भविष्य घडवतात किंवा बिघडवतात असे हे शास्त्र मानते. आपल्या जन्माच्या वेळी ग्रहांची जी स्थिती असते तिचा परिणाम म्हणून आपल्या जीवनातील घटना घडतात. त्यामुळे या ग्रह स्थितीवरून पत्रिका तयार केली जाते आणि तिच्या आधारे पुढील घटनांचे भविष्य वर्तविले जाते. हे भविष्य वर्तविणारे ज्योतिषी अनुभव व व्यवहारज्ञानाच्या आधारे आयुष्याचे जे भविष्य वर्तवितात त्यापैकी काही गोष्टी खऱ्या ठरतात व लोकांची अविवेकी श्रद्धा आणखी घट्ट होते. या शास्त्रात मानलेल्या कोणत्याही गृहीतकाला प्रयोगाचा किंवा निरीक्षणाचा आधार नाही. तरी लोकांची भविष्याविषयी उत्सुकता आणि भीती यामुळे या शास्त्रावरील अविवेकी श्रद्धा टिकून आहे व वाढत आहे!

ज्योतिष शास्त्राचा उगम हा बहुदा खगोलशास्त्राच्या जोडीने झाला असावा. पुरातन काळापासून खगोलशास्त्राच्या मदतीने पृथ्वीवरील ऋतू आणि चंद्र सूर्याची ग्रहणे यांचे अचूक भविष्य

सांगितले जाते. त्यामागे ग्रहांच्या गतीचा अभ्यास व विज्ञान आहे. परंतु त्या विश्वासा मधूनच मानवी जीवनाचे भविष्य वर्तविणारे ज्योतिषशास्त्र तयार होत गेले असावे.

ज्योतिष शास्त्रा खालोखाल हस्तसामुद्रिक शास्त्र लोकप्रिय आहे. आपल्या हातावरील रेषांचाचा अर्थ लावून त्याआधारे आपले भूत भविष्य सांगता येते असा या शास्त्राचा दावा आहे. केवळ हस्त रेषाच नव्हे तर संपूर्ण शरीराच्या ठेवणीवरूनही माणसाची स्वभाव वैशिष्ट्ये व भविष्य वर्तविले जाते. या सर्व गोष्टींना कोणताही वैज्ञानिक आधार नाही.

भविष्य जाणण्याचा आणखीन एक वेगळा प्रकार म्हणजे संख्येच्या आधारे भविष्य सांगणे. आपल्या जन्मतारखेची संख्या, तसेच आपल्या नावावरून अक्षरांच्या उपयोग करून तयार होणाऱ्या संख्या आणि आपल्याला आवडणाऱ्या संख्या यांचा उपयोग करून भविष्य वर्तविले जाते. यामध्ये वापरलेल्या संख्या, अक्षरे व शब्द ही सर्व मानवनिर्मित असल्यामुळे त्यांच्या वरून भविष्य सांगणे ही अगदीच निरर्थक गोष्ट आहे!

रमल खुणांच्या साह्याने भविष्य जाणण्याचा आणखी एक प्रकार आहे. आपल्या आजूबाजूला घरात किंवा निसर्गात काही संकेतिक खुणा शोधून याचा अर्थ लावला जातो आणि त्यांच्या

आधारे भविष्य वर्तविले जाते. आपल्या कल्पनेप्रमाणे कोणतीही चिन्हे शोधून काढणे व त्यांना अर्थ लावणे अशक्य नाही.

सध्या लोकप्रिय असलेला वास्तुशास्त्र हा आणखीन एक प्रकार आहे. आपल्या राहत्या घराची मांडणी कशी असावी ज्यामुळे आपल्याला सौख्य, आरोग्य व धनसंपदा मिळेल याची माहिती या शास्त्रावरून मिळते. त्यासाठी घर बांधताना वास्तुशास्त्रज्ञांचा सल्ला घेतला जातो. तसेच बांधलेल्या घरात राहत असताना काही शारीरिक किंवा आर्थिक संकटे आल्यास या तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. या सल्ल्या प्रमाणे हजारो रुपये खर्च करून घरातील जागांची मोडतोड करून पुनर्बांधणी केली जाते. वास्तुतज्ञांना चांगली फी दिली जाते. त्यातून निष्पन्न मात्र काहीच होत नाही.

# औषधोपचार आणि श्रद्धा

अविवेकी श्रद्धा औषधोपचार क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणात आढळतात. सर्वाधिक वैज्ञानिक व लोकप्रिय औषध उपचार पद्धती म्हणजे ॲलोपॅथी होय. ॲलोपॅथी मध्ये विशिष्ट प्रकारे प्रशिक्षित डॉक्टर वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेली औषधे देतात. त्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने चाचण्या घेतल्या जातात. या पद्धतीमध्ये सतत संशोधन सुरू असते. तरीही काही डॉक्टर बनावट औषधोपचाराचा वापर करतात. डॉक्टरांवरील अविवेकी श्रद्धेमुळे ते सांगतील ते उपचार निमुटपणे केलेजातात. बऱ्याच वेळा पैसे कमावण्याच्या मोहापायी अनेक डॉक्टर व हॉस्पिटल्स अशा अविवेकी गोष्टी करतात. हृदय रोगावरील उपचार करताना औषधाने बऱ्या होऊ शकणाऱ्या रुग्णाला अँजिओप्लास्टी करायला लावली जाते. आहार व व्यायाम यांच्या साह्याने नियंत्रणात राहू शकणारे आजार औषधे देऊन नियंत्रणात ठेवले जातात. आधुनिक उपचार पद्धती ही लोकांच्या निरोगी राहण्यापेक्षा रोगी राहण्यावर जास्त अवलंबून असते. त्यामुळे लोकांना रोगमुक्त होण्यापासून परावृत्त केले जाते.

आयुर्वेदाची भारतीय उपचार पद्धती खूपच जुनी आहे. परंतु पूर्वी इतके लोक आता त्या पद्धतीवर अवलंबून राहत नाहीत.

त्यामुळे आयुर्वेदिक वैद्य देखील ॲलोपॅथी वापरतात. या पद्धतीमध्ये औषध निर्मिती व उपचार पद्धतीत मोठ्या प्रमाणात संशोधन होताना दिसत नाही. तरीही काही वैद्य हे कॅन्सर सारख्या रोगावर प्रभावी औषध देण्याचा दावा करतात. हतबल झालेल्या लोकांसाठी ही अविवेकी श्रद्धा जीवघेणी ठरते तर वैदू लोकांना आर्थिक प्राप्ती मुळे जीवनदान देणारी ठरते.

प्रचारात असणाऱ्या यूनानी व होमिओपॅथी या उपचारपद्धती देखील फारसा प्रभाव दाखवीत नाहीत. कारण त्यांच्याकडे देखील वैज्ञानिक पद्धतीने संशोधन करण्याची कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे काही हतबल लोकांच्या आधाराने या पद्धती टिकून आहेत.

यापलीकडे पूर्णपणे अवैज्ञानिक उपचार पद्धती प्रचारात आहेत. यामध्ये चुंबकीय उपचार पद्धती, पाण्याची उपचार पद्धती व मातीची उपचार पद्धती तसेच निसर्ग उपचार पद्धती आहेत. अनेक लोक ॲक्युप्रेशर व ॲक्युपंचर हे उपचाराचे आणखी दोन प्रकार वापरतात. काही आजारात तात्पुरता आराम देण्याचे काम या उपचाराने करता येते. त्यामुळे त्यांच्यावर अविवेकी श्रद्धा निर्माण होते.

## निरोगी जीवनासाठी आवश्यक श्रद्धा

सामान्यपणे निरोगी राहण्यासाठी योग्य आहार व्यायाम आणि सकारात्मक विचारांची त्रिसूत्री आवश्यक आहे. स्वच्छते सारख्या आरोग्यदायक सवयी आणि जंतू व विषाणूंमुळे होणाऱ्या रोगांसाठी योग्य काळजी घेणे अपेक्षित असते. औषधोपचारतील अविवेकी श्रद्धा नाहीशा करण्यासाठी शिक्षणात आरोग्यदायी जीवनशैलीचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

## संपत्ती आणि श्रद्धा

आर्थिक क्षेत्रातील अविवेकी श्रद्धा या धन संपत्ती व चलनी नोटा यांच्याशी संबंधित असतात. आपल्याकडे भरपूर सोने नाणे असेल तर आपण काहीही करू शकतो असे काही लोकांना वाटते. प्रत्यक्षात संपत्तीचे सामर्थ्य लोकांच्या विश्वासात असते. आजूबाजूला लोक नसतील तर संपत्ती ची किंमत शून्य आहे. भरपूर संपत्ती घेऊन एखाद्या निर्जन ठिकाणी गेल्यास तेथे संपतीचा काहीही उपयोग करता येणार नाही. तसेच लोकांना जर विश्वास वाटत नसेल तरीही संपत्तीचा उपयोग होत नाही. एखाद्या ठिकाणी दुष्काळ पडला आणि अन्नधान्य उपलब्ध नसेल तर सोने-नाणे काही किमतीचे राहत नाही. एक रुपयाला मिळणारा पाव विकत घेण्यासाठी एक हजार रुपये द्यायलाही लोक तयार होतात. असे रशियाचे विघटन झाले तेव्हा घडलेले आहे. याचा अर्थ संपत्तीला किंमत आहे ही अविवेकी श्रद्धा होय. तरीही सामान्य स्थितीमध्ये लोकांना हा विश्वास वापरणे सोयीचे असते. त्यामुळे अनेक मानवी व्यवहार सुलभ होतात. म्हणूनच संपत्ती ही एक साधन म्हणून वापरली पाहिजे. अन्न, पाणी व हवा या संपदांपेक्षा दुसरी कोणतीही संपती मौल्यवान नाही. आपण व आपल्या बरोबर जगणाऱ्या

सर्वांची ती सामायिक संपत्ती आहे. त्यामुळे ज्याच्याकडे ही संपत्ती नाही तो उपाशी राहता कामा नये.

संपत्तीवरील अविवेकी श्रद्धेपायी आणखी काही अविवेकी श्रद्धा निर्माण होतात. संपत्तीच्या देवतेची म्हणजे लक्ष्मीची पूजा करणे, संपत्ती प्राप्त करण्यासाठी नवस करणे आणि बळी देणे अशा प्रकारच्या अविवेकीश्रद्धा वाढीस लागतात. काहीही कष्ट न करता खूप संपत्ती मिळवण्यासाठी लॉटरी सारखे प्रकार प्रचलित होतात. काही लोक या संपत्तीच्या मोहाचा आपल्या स्वार्थासाठी उपयोग करून घेतात. लोकांचे पैसे वाढवून देण्यासाठी किंवा त्यावर खूप जास्त व्याज देण्यासाठी ते घेतात आणि लोकांचा विश्वास निर्माण करतात काही काळानंतर पैसे घेऊन गायब होतात. बरेच लोक घोड्यांच्या रेस वर देखील पैसे लावतात. खेळ म्हणून अशाप्रकारे पैशांचा वापर करणे आनंददायक असले तरीही बरेच लोक पैसे कमावण्याच्या मागे लागतात व कफल्लक होऊन बसतात.

आर्थिक क्षेत्रातील काही श्रद्धा परिस्थितीनुरूप विवेकी किंवा अविवेकी ठरतात. त्यापैकी बचत करणे हा एक प्रकार आहे. आपल्या उत्पन्नातून काही रक्कम बचत करून भविष्यकाळासाठी ठेवावी ही विवेकी श्रद्धा आहे. परंतु आर्थिक बचत करून शिक्षण आरोग्य यासारख्या आवश्यक बाबी वरचा खर्च टाळणे अविवेकी

होईल!त्यासाठी उत्पन्न वाढवण्याचे मार्ग शोधणे हा अधिक विवेकी मार्ग असेल.

बचत करणे याप्रमाणेच गुंतवणूक करणे याबद्दल देखील तसेच म्हणता येईल. सगळ्या क्षेत्रात होणाऱ्या विकासाबरोबर स्थावर जंगम संपत्तिच्या किमती वाढत जातात. त्यामुळे लोक जमीन, ब्लॉक व सोने-नाणे यामध्ये पैसे गुंतवतात. या गोष्टींच्या किमती वाढत जात असल्यामुळे भविष्यकाळात आपल्याला अधिक पैसे मिळू शकतात. अर्थात अशा प्रकारची गुंतवणूक करण्यासाठी आपले उत्पन्न आपल्या गरजा भागवण्यापेक्षा जास्त असले पाहिजे. त्याऐवजी आवश्यक गरजांमध्ये काटछाट करून अशी गुंतवणूक करणे हा अविवेक आहे. काही आर्थिक क्षेत्रातील जाणकार लोक शेअर्समध्ये पैसे गुंतवतात. म्युच्युअल फंडा सारख्या काही कंपन्या सामान्य लोकांना अशा गुंतवणुकीत मदत करण्यासाठी देखील काम करतात. या गुंतवणुकीतून मिळणारा फायदा किंवा तोटा हा शेअर्सच्या किमतीच्या चढ-उतारावर अवलंबून असतो. शेअरचे भाव हे अनपेक्षितपणे बदलत असतात. त्यामुळे काही वेळा फायदा किंवा अचानक तोटा कधी होईल हे सांगता येत नाही त्यामुळे ही गुंतवणूक भरवशाची नसते. अनेक लोक शेअर बाजारात कफल्लक झालेले आढळतात. त्यामुळे सुरक्षित काळजी घेऊन खेळण्याचा हा एक खेळ आहे. परंतू

अविवेकी श्रद्धेने आपली सर्व संपत्ती शेअर्समध्ये गुंतवणे धोक्याचे आहे.

## न्यायव्यवस्था व श्रद्धा

न्याय व्यवस्था लोकशाही शासन पद्धती मध्ये खूपच विकसित झालेली आहे. तरीही आपल्या अनेक अविवेकी श्रद्धा न्यायव्यवस्थशी निगडीत आहेत. एखाद्याने गुन्हा केला तर त्याला कायद्याप्रमाणे शिक्षा होईलच असे आपल्याला वाटते. परंतु कायद्याप्रमाणे शिक्षा होण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्षम व नागरिक जागरूक असावे लागतात. या दोन अटी पूर्ण झाल्या नाहीत तर न्याय मिळेल असे खात्रीने म्हणता येणार नाही. योग्यप्रकारे तपास केला जाणे आणि साक्षीपुरावे असणे कायद्यातील पहिली अट आहे. ती पूर्ण न झाल्यामुळे गंभीर आरोपी देखील निर्दोष मुक्त होतात. काही वेळेला पोलीस यंत्रणा काबूत ठेवण्यासाठी आणि साक्षीदार फिरवण्यासाठी सत्ता व संपत्तीचा दुरुपयोग केला जातो. त्यामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडून जातो. न्याय आपोआप होईल या अविवेकी श्रद्धेपेक्षा प्रत्यक्ष न्यायव्यवस्थेला मदत करण्याची कृती आवश्यक असते.

# शासन व्यवस्था व श्रद्धा

लोकशाहीमध्ये आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींवर आपण अविवेकी श्रद्धा ठेवतो. ते आपली कामे करतील, देशाच्या भल्याचा विचार करतील आणि घटनेप्रमाणे वागतील असे आपल्याला वाटते. तसे प्रत्यक्षात घडताना दिसून येत नाही. याचे कारण निवडून देताना आपण स्वतंत्रपणे विचार करीत नाही. निवडून दिल्यानंतर त्यांच्या प्रत्येक कृतीवर लक्ष ठेवत नाही. त्यांना थोरपुरुष बनवण्याचा प्रयत्न करतो. हे अविवेकी श्रद्धे पायी घडते.

आपल्या प्रशासन व्यवस्थेवरही आपली अविवेकी श्रद्धा असू शकते. देशाची घटना आणि निवडून आलेले प्रतिनिधी यांच्या आधीन ही व्यवस्था असते. प्रशासनातील नोकरशाही लोकप्रतिनिधींना देखील भ्रष्टाचारी बनवते. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगवेगळया अडचणी निर्माण करून बाहेर फेकले जाते. त्यामुळे प्रशासकीय कामे होत नाहीत किंवा निकृष्ट दर्जाची होतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी बरोबरच प्रशासनातील अधिकारी वर्गावर ही लोकांची नजर असणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकाराचा कायदा त्यादृष्टीने उपयुक्त आहे.

कायद्याचे राज्य नीट चालण्यासाठी पोलिस यंत्रणा आहे. कायद्याचे हात खूप दूरवर पोहोचू शकतात अशी आपली अविवेकी श्रद्धा असते. प्रत्यक्षात पोलिस यंत्रणा व नागरिकांचा सहभाग त्याच्यावर कायद्याच्या हाताची ताकद अवलंबून असते. त्यामुळे येथेही नागरिकांच्या विवेकी कृतीची आवश्यकता असते.

## श्रद्धा कालसापेक्षता

विवेकी श्रद्धा काळ बदलला की अविवेकी होऊ शकतात! सार्वजनिक गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू केलेली प्रथा ही अशीच एक श्रद्धा आहे. पारतंत्र्याच्या काळात लोकांना एकत्र आणण्यासाठी तिची आवश्यकता होती म्हणजे त्यावेळी ती विवेकी श्रद्धा होती. परंतु स्वातंत्र्यानंतर परिस्थिती बदलली. लोकांना एकत्र येण्यावरील बंधने नाहीशी झाली. तरीही गणेश उत्सवाची प्रथा सुरूच राहिली. हळु हळू तिचे विकृतीकरण होत गेले आणि आता ती अविवेकी सदरात सामील होत आहे. मोगलांच्या काळात सुरु झालेली बालविवाह प्रथा ही कदाचित त्यावेळी विवेकी असेल परंतु पुढे तिचे अविवेकी श्रद्धेत रूपांतर झाले. नारळाचा शुभ प्रसंगातील उपयोग व वाहनाला लिंबू-मिरची बांधणे हे असेच कालबाह्य झालेल्या श्रद्धांचे अविवेकी रूपांतर होय!

आपल्या अनेक रूढी परंपरा अशा कालबाह्य झालेल्या अविवेकी श्रद्धावर अवलंबून असतात. लग्न प्रसंगातील होमहवन, सप्तपदी आणि माप ओलांडणे हे असेच प्रकार आहेत. केवळ हिंदु धर्मातच नव्हे तर इतर सर्व धर्मातही अशा कालबाह्य श्रद्धा वर आधारित रूढी परंपरा पाळल्या जातात.

# देवधर्माची मालकी आणि श्रद्धा

आपला धर्म आणि दुसऱ्यांचा धर्म तसेच आपला देव आणि दुसऱ्यांचा देव यादेखील अविवेकी श्रद्धा आहेत. कोणत्याही धर्म संस्थापकाने आपण एका विशिष्ट लोकसमुदायासाठी काम करतो असे म्हटले नाही. तसेच सर्व जन म्हणतात की देव एकच आहे तरीही वेगवेगळ्या देवांची पूजा करतात. आपला देव तोच खरा देव बाकीचे खोटे असे प्रत्येक धर्म समजतो. स्वतंत्रपणे विचार केला तर सगळ्या धर्मातील चांगल्या शिकवणीचा उपयोग करून चांगले जीवन जगता येईल. जसे अनेक शास्त्रज्ञांच्या कामांमधून विज्ञान तयार झाले तसेच अनेक धर्म संस्थापकांच्या विचारातून एकच धर्म तयार व्हायला पाहिजे होता. परंतु धर्माचे अनुयायी तयार होण्याऐवजी भक्त तयार झाले आणि त्यांनी धर्म संस्थापकांची आणि देव मूर्तींची पूजा सुरु केली. सर्व धर्माचा एकत्र विचार करण्याचा पहिला प्रयत्न अकबर बादशहाने केला होता. परंतु तो फारसा यशस्वी झाला नाही. कारण त्याने दिन ए इलाही असे आपल्या नव्या धर्माला नाव दिले. म्हणजे

एका नव्या धर्माची भर घालण्याचा प्रयत्न केला. त्यात भक्त मंडळीं नसल्याने तो यशस्वी झाला नाही. त्याऐवजी त्यांनी सर्व

धर्माचे हे व्यासपीठ उभे केले असते तर ते कदाचित यशस्वी झाले असते. आधुनिक काळात मानवता धर्माच्या नावाखाली असे व्यासपीठ विवेकी श्रद्धांच्या आधारे उभे राहू शकते.

# राष्ट्रभक्ती आणि श्रद्धा

राष्ट्र कल्पनेवर आधारित राष्ट्रभक्ती ही देखील एक अविवेकी श्रद्धा आहे. ही श्रद्धा कुटुंब, गाव व राज्य अशा स्तरावरून वाढत जाते. मुळात ही सर्व विभागणी मानवनिर्मित आहे. ज्या भूगोलाच्या अंगावर आपण वर्षांनुवर्षे आणि पिढ्यानपिढ्या रहात असतो. ती भूमी आपल्याला आपल्या मालकीची वाटायला लागते. परंतु हा जमिनीवरील आपला मालकी हक्क आपली एक अविवेकी श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळे काही गोष्टी सुलभ होतात. त्यासाठी जमिनीवरील मालकी सांगणारे कागदपत्र व भूलेख आपण तयार केलेले आहेत. आपली सजीव अवस्था मर्यादित काळा पुरता असून पृथ्वीचे अस्तित्व त्या मनाने खूप मोठे आहे. त्यामुळे तिचा काही भाग आपल्या मालकीचा समजणे हा अविवेक आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे आपण भाग केले तरीही पृथ्वीवरील हवा, पाणी आणि पर्यावरण एकच आहे त्याचे भाग करता येत नाहीत. या जमिनीच्या मालकीसाठी माणसासारखे बुद्धिमान प्राणीच एकमेकांशी लढतात! जमिनीवरील मालकी हक्काची ही अविवेकी श्रद्धा नष्ट झाली तर पृथ्वीवरील सर्व युद्धे संपतील! पृथ्वीच्या पर्यावरणात मानवनिर्मित

संकटामुळे ही जाणीव पृथ्वीवरील लोकांना होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

## भाषा आणि श्रद्धा

आपापल्या भाषा संबंधी देखील आपली अशीच अविवेकी श्रद्धा असते. मातृभूमी प्रमाणे मातृभाषा देखील आपल्याला जन्मतः आपल्या माता पित्याकडून मिळते. मातृभाषा बोलायला आपण बालपणीच निसर्गतः शिकतो. त्यामुळे मातृभाषेविषयीचा आपला जिव्हाळा माते इतकाच नैसर्गिक आहे. आपल्या माते इतकेच दुसऱ्याच्या मातेला तिच्या मुला विषयी प्रेम असते. मातृ भाषेच्या माध्यमातून हे प्रेम व्यक्त झालेले असते म्हणून ती देखील आपल्याला प्रिय वाटते. परंतु आपली भाषा श्रेष्ठ असा अभिमान वाटणे ही अविवेकी श्रद्धा आहे! प्रमाणभाषा, लिहिली जाणारी लेखन भाषा आणि बोलीभाषा लोकांना सारख्याच प्रिय असतात. आपल्या सोयीसाठी भाषा सुधारणा होत गेली तरीही बोलीभाषा हीच आपल्या सर्वात जवळची मातृभाषा असते. त्यामुळे अनेक भाषा बोलायला शिकून आपल्याला अनेक भाषेतील लोकांशी जवळीक साधता येते. मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास अनेक भाषा शिकल्याने मेंदूचा विकास अधिक होतो. आधुनिक काळात तंत्र ज्ञानाच्या विकासामुळे एका भाषेचे रूपांतर दुसऱ्या भाषेत करणे सोपे झाले आहे. कम्प्यूटर मध्ये वापरली जाणारी भाषा जागतिक भाषा होऊ पाहत आहे. नोकरी-व्यवसायानिमित्त होणारे

लोकांचे स्थलांतर हे जागतिकीकरणाला मदत करीत आहे. एकाच कुटुंबात विविध धर्माचे आणि विविध भाषा बोलणारे लोक एकत्र येत आहेत हे मानवतेच्या दृष्टीने सुचिन्ह आहे!

# वैज्ञानिक उपकरणे आणि श्रद्धा

नवीन वैज्ञानिक उपकरणांच्या वापरा मध्येही अविवेकी श्रद्धांचा भरणा भरपूर आहे. वाहन विकत घेताना ते शुभमुहूर्तावर घेतले जाते. ते चालवायला सुरूवात करताना त्याची यथासांग पूजा केली जाते. एवढेच कशाला देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचे शिखर मानल्या जाणाऱ्या इस्त्रो सारख्या संस्थांतून अवकाश यानाच्या प्रक्षेपणासाठी मुहूर्त काढले जातात व पूजा केली जाते. कितीही विज्ञान शिकला तरी मानसाच्या मनात बालपणी रुजवलेला संस्कार नाहीसा होत नाही. अविवेकी श्रद्धेच्या बंदिवासातून मुक्त करण्यासाठी स्वतंत्र विचाराचे हत्यार अतिशय तेज असावे लागते. परंतु तथाकथित संस्कारांनी ते बालपणीच बोथट करून ठेवलेले असते. म्हणूनच शिक्षणाची सुरुवात आधुनिक विज्ञानाच्या विचारापासून व्हायला पाहिजे.

## श्रद्धा: जगण्याचे साधन

होमो सेपियन म्हणजे शहाणा माणूस हा वेगवेगळया श्रद्धा वरच जगतो. त्या श्रद्धांच्या आधारे त्याचे विविध व्यवहार सुरू असतात. परंतु श्रद्धा ही त्याच्या विचार करण्याच्या सामर्थ्यातून येते हे तो विसरून जातो. त्यामुळे आधी विचार करायला शिकवणे आणि नंतर त्याच्या आधारे श्रद्धा जोपासणे महत्त्वाचे आहे. जपानमध्ये म्हणे मुलांना लहानपणीच प्रश्न विचारायला प्रवृत्त केले जाते. त्यासाठी पहिले पुस्तक का कसं कधी हे विचारणारे असते. त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक श्रद्धा तपासून घेण्याची सवय होते. त्यामुळेच जपानमध्ये अविवेकी श्रद्धांचा पगडा नागरिकांच्या डोक्यावर कमी आहे. धार्मिक उन्माद कमी आढळतो. धर्माच्या नावाखाली लोक गटागटाने राहत नाहीत. त्यामुळे त्यांची ऊर्जा विज्ञानाच्या विकासासाठी वापरली जाते. त्याचा परिणाम सार्वत्रिक विकासामध्ये झालेला दिसतोय.

मानवाला सगळ्या दुःखातून मुक्त करण्यासाठी विवेकी श्रद्धेची गरज आहे. ही विवेकी श्रद्धा स्वतंत्र व चिकित्सक विचारातूनच येऊ शकते! या विवेकी श्रद्धेमधील मोठा अडथळा म्हणजे संस्थात्मक धर्म होय. संस्थात्मक धर्म टिकवण्यासाठी

अनुयायाची नव्हे तर भक्तांची गरज लागते. या भक्तांची निर्मिती अविवेकी श्रद्धेतूनच होऊ शकते. श्रद्धा विवेकी झाली की ती अतिरेकी राहू शकत नाही. त्यामुळे अतिरेक्यांचा दहशतवाद समूळ नष्ट करायचा असेल तर समाजात विवेकी श्रद्धा रुजवणे आवश्यक आहे.

# विवेकी श्रद्धांचा प्रसार

समाजात विवेकी श्रद्धा पसवरण्याचे काम पूर्ण नास्तिक होऊन करता येणार नाही. धार्मिक व स्वतःला भाविक समजणारे लोक नास्तिकां पासून दोन हात दूर राहतात. त्यामुळे नास्तिक असणारे लोक त्यांच्यावर परिणाम करू शकत नाहीत. म्हणूनच संत मंडळी देवाचे नाव घेत घेत प्रबोधन करीत असत. तरीही रूढी परंपरा पाळणाऱ्या व कर्मकांड करणाऱ्या लोकांना असे संत-महात्मे धोकादायक वाटतात. म्हणूनच त्यांना संपविण्याचे काम केले जाते.

जगातील वेगवेगळे धर्म मानणाऱ्या लोकांची संख्या विचारात घेतली तर ख्रिस्ती आणि इस्लाम यांच्या खालोखाल कोणताही धर्म न मानणाऱ्यांची संख्या आहे. आणि प्रत्येक वर्षी अशी ही संख्या वाढत चालेली आहे. सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे नजीकच्या काळात ती सर्व धर्मांतील लोकसंख्ये पेक्षाही जास्त होण्याची शक्यता आहे. परंतु धार्मिक कट्टरते शिवाय इतर अविवेकी श्रद्धा देखील त्याच प्रमाणात कमी होत जाणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रद्धांची सातत्याने तपासणी करण्यासाठी यंत्रणेची उभारणी करावी लागेल.

हिंदू धर्मातील काही श्रद्धांचा पाया विवेकी असल्याचे सांगितले जाते. उदाहरणार्थ तुळशी च्या पूजेमध्ये तो एक उपयुक्त औषधी वृक्ष म्हणून सांगितला जातो. तुळशीची जोपासना आपल्या घराजवळ केल्यास लहान-सहान आजारांमध्ये तिचा उपयोग होऊ शकतो. तसेच तुळशीमुळे डास पळतात व जास्त ऑक्सिजन निर्माण केला जातो. अशा गोष्टी सांगितल्या जातात. प्रत्यक्षात हे अविवेकी श्रद्धेचे केलेले समर्थन असते. असेही सांगितले जाते की सर्वसामान्य लोकांना या शास्त्रीय गोष्टी कळणार नाहीत म्हणून त्यांना तुळशीची पूजा करायला सांगितले जाते. त्यानिमित्ताने तुळशीचे रोपटे घराजवळ राहील. सर्वसामान्य लोकांना शिकू न देता अज्ञानात ठेवून नंतर त्यांना शास्त्रीय गोष्टी कळणार नाहीत म्हणून अविवेकी श्रद्धेत ठेवणे हे सगळे षडयंत्र आहे.

# स्वतंत्र विचार व विवेकी श्रद्धा

विवेकी श्रद्धा स्वतंत्र विचाराच्या पायावर उभारण्यासाठी आपल्या मानसिकतेत मूलभूत बदल होणे आवश्यक आहे. हा बदल सामाजिक प्रबोधना द्वारे धर्मग्रंथांचा अभ्यास करून त्यातील त्रुटी समाजापुढे मांडल्या पाहिजेत आणि विवेकला पोषक असा भाग समजावून दिला पाहिजे. हे काम सामाजिक माध्यमांमुळे कुणालाही करता येऊ शकते. अविवेकी श्रद्धा पसरवणारे गट क्रियाशील असतात त्यांना पायबंद घालण्यासाठी विवेकी लोकांनी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. विवेकी लोकांनी एकमेकांच्या संपर्कात राहून ही चळवळ यशस्वी होऊ शकेल.

विवेकी श्रद्धा वाढवण्यासाठी विवेकाच्या मदतीने आपल्याला आपले शारीरिक, मानसिक व भौतिक प्रश्न कसे सोडवता येतात हे लोकांना कळले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक विवेकी माणसाने एक विवेकी सल्ला केंद्र म्हणून काम केले पाहिजे. जेव्हा लोकांना विवेकी मार्गाने आपले प्रश्न सुटत नाहीत असे वाटते तेव्हा हतबल होऊन ते अविवेकी श्रद्धेला बळी पडतात.

लहान-लहान समस्यांमुळे लोक अविवेकी श्रद्धेला बळी पडतात. उदाहरणार्थ मुलगा अभ्यास करीत नाही म्हणून धर्मग्रंथाचे

वाचन करणे किंवा देवाची पूजा करणे या मार्गाचा अवलंब केला जातो. काहीवेळा ज्योतिषाकडे जाऊन ग्रहदशा पाहिली जाते. हा प्रश्न मानसोपचार तज्ञ आणि शिक्षण तज्ञ त्यांच्या मदतीने सहज सोडवता येण्यासारखा असतो परंतु सर्वसामान्य पालकांना याची कल्पनाच नसते किंबहुना आपल्या शाळांतून देखील याची माहिती नसते. अनेक मानसिक आजारावर उपचार उपलब्ध आहेत परंतु ते न करता पुजा प्रार्थना यांचा अवलंब केला जातो. गुरु, भक्त, स्वामी व बाबा यांचे मार्गदर्शन घेतले जाते. अध्यात्मिक गुरु सहज उपलब्ध असतात तर व्यवसायिक मनोविकार तज्ञ भेटणे मुश्किल असते. त्यासाठी अशा तज्ञांची संख्या वाढली पाहिजे. त्याबरोबरच त्यांना मदत करणारे कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्यादृष्टीने मानस मित्र तयार करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. तो स्तुत्य आहे.

# आपत्तीसाठी मानसिकता

कोणतीही आपत्ती ही मानसिक आपत्तीच असते. शेवटी तिला तोंड देण्यासाठी माणसाच्या मनाची तयारी असावी लागते. ज्या लोकांची मनाची तयारी अशा प्रकारची असते की ते आपत्तीतून मार्ग काढण्यासाठी स्वतंत्रपणे विचार करू शकतात त्यांना कोणत्याही आपत्तीची भीती वाटत नाही. परंतु काही लोकांना अशी मानसिक तयारी नसल्यामुळे भीती वाटते. त्या भीतीवर मात करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मानवी आधारगट उपलब्ध नसेल तर लोक अविवेकी श्रद्धेला बळी पडतात. त्यासाठी पुजा, प्रार्थना व नामजप यासारखे उपचार केले जातात. काही दीर्घकालीन आपत्तीसाठी व्रत वैकल्ये केली जातात. त्यामध्ये मन गुंतून राहते आणि भीतीही मोठ्या प्रमाणात कमी होते. मूळ आपत्तीचे निवारण होत नाहीच परंतु तिच्याकडे दुर्लक्ष मात्र होते. काही दुःखद प्रसंगी मन मोकळे करण्यासाठी प्रार्थनेचा आधार मिळतो. काहीवेळा योगायोगाने आपत्तीचे निवारण होते आणि आपोआपच श्रेय या कर्मकांडांना मिळते. अशा अविवेकी कर्मकांडांतून मानवाची मुक्तता करण्यासाठी त्याचे मानसिक बळ वाढवणे आवश्यक असते. तसेच बालपणापासून संस्काराच्या

नावाखाली चाललेले मानसिक खच्चीकरण थांबवणे आवश्यक आहे. मानसशास्त्रातील नवनवे संशोधन याबाबतीत खूपच सहाय्यकारी होऊ शकेल!

# विवेकी श्रद्धा व मानवी सुख

विवेकी श्रद्धाही मानव केन्द्रित असल्यामुळे त्यामध्ये मानवाच्या सुखाचा विचार केंद्रस्थानी असेल. कोणत्याही सगुण मूर्ती किंवा निर्गुण ईश्वर त्यांच्या पेक्षा जीवन प्रमाण मानले जाईल. सर्व सजीव सृष्टी एकसंघ आहे तिचे संवर्धन करण्यातच मानवाचे भले आहे हे विवेकी श्रद्धेतून कळू शकते. सर्व श्रद्धा मानव केंद्रित झाल्या म्हणजे वैज्ञानिक संशोधनाची दिशा देखील मानव केंद्रित होईल. युद्धाच्या तयारीसाठी वापरले जाणारे वैज्ञानिक मनुष्यबळ आणि साधनसंपत्ती मानवाच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी म्हणजेच एकूण कल्याणासाठी वापरली जाईल! त्यामुळे पृथ्वीवर स्वर्ग निर्मितीचे स्वप्न साकार व्हायला मदत होईल. कल्याणकारी राज्याचे प्रयोग जगभर सुरू असले तरीही पायाभूत श्रद्धा मध्ये बदल झाला नाही तर कल्याणकारी कामासाठी आवश्यक असलेली साधने संपत्ती युद्धा सारख्या हानिकारक कामासाठी वापरली जाईल. लोकांना एकमेकांपासून वाटणारी भीती हा भांडणाचा पाया आहे. भितीच्या जागी प्रेमाची भावना निर्माण होणे आवश्यक आहे.

# एकटेपणाची भावना आणि श्रद्धा

माणसे जेव्हा एकमेकांच्या सोबत असतात तेव्हा त्यांना आपल्या एकटेपणाची भीती वाटत नाही आणि मृत्यूचा विचार देखील डोक्यात येत नाही. त्यामुळे लोक एकत्र येण्या साठी विविध कारणे शोधतात. बऱ्याच अविवेकी श्रद्धा त्यामुळे निर्माण होतात. बालकाचा जन्म झाल्यावर केले जाणारे बारशा सारखे कार्यक्रम, लग्नसमारंभात केल्या जाणाऱ्या जेवणावळी आणि मृत्युनंतर देखील केले जाणारे श्राद्ध हे लोकांना एकत्र येण्यासाठी बहाणे असतात. एकत्र येण्यासाठी काही वेगळे कार्यक्रम जर केले तर या अविवेकी श्रद्धा कमी होतील. त्यासाठी संगीत मैफिली, व्याख्यानाचे कार्यक्रम आणि वेगवेगळे परिसंवाद आयोजित करता येतील. तसेच वेगवेगळया कारणासाठी मेळावे भरवता येतील. विद्यार्थी पालकांसाठी शैक्षणिक मिळावे, तरुणासाठी नोकरी-व्यवसाय व विवाह मिळावे, प्रवासासाठी परदेश प्रवास मिळावे, प्रौढांसाठी विचारमंथन मिळावे, स्त्रियांसाठी वृद्धांसाठी असे विविध मेळावे आयोजित करता येतील. अशा मेळाव्यांमुळे लोकांना एकत्र येण्याची संधी मिळेल. त्याचप्रमाणे काही समाज उपयोगी व व्यक्ती विकासाची कामेही होतील. विविध संस्थांच्या होणाऱ्या वार्षिक

सभा ह्या देखील या कामी उपयोगी ठरतील. काही लोकांसाठी केवळ मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करता येतील. ज्यावेळी प्रत्यक्ष एकत्र येता येत नाही त्या वेळी समाज माध्यमाच्या सहाय्याने समविचारी लोकांना विचारांची देवाण-घेवाण करता येईल. मोबाईलशी सतत बोलत राहण्याची लोकांची प्रवृत्ती हेच दाखवते की त्यांना इतरांबरोबर सतत जोडून घ्यावे असे वाटते. विज्ञानांतील प्रगतीबरोबर जोडून घेण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होत जाईल याविषयी शंका नाही. पुढील काळात तर आपले मेंदू एकमेकांशी जोडून विचारांची देवाण-घेवाण देखील करता येईल!

## मनाचा कमकुवतपणा व श्रद्धा

बहुसंख्य लोकांना त्यांच्या मनाच्या कमकुवतपणामुळे किंवा बालपणीच्या संस्कारामुळे देवाची गरज लागते. त्यासाठी त्यांनी देवाची कल्पना केली तर त्यांना बरे वाटते. आपल्याला संकटात मदत करणारा कोणीतरी आपल्या मनातच त्यांना ठेवता येतो. ही श्रद्धा अविवेकी असली तरी उपद्रवकारक नाही. तरीही तो देव स्पिनोझाने म्हटल्याप्रमाणे प्रेम करणारा, स्वतंत्र करणारा, कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप न करणारा व शिक्षा न करणारा असा असायला हवा! अशा देवाची प्रतिमा माणसाने आपल्या मनात बाळगली तर हरकत नाही. त्याच्या मूर्ती बनवून किंवा चित्र काढून पूजाअर्चा करायची गरज नाही. कारण देवाला कोणत्याही स्थितीत त्याची पूजा करायची गरज असेल असे वाटत नाही. तत्त्वज्ञ म्हणतात तसे देव म्हणजे शाश्वतता किंवा देव म्हणजे संपूर्णता! अवघे विश्वचि देवस्वरूप समजायला हरकत नाही! तरीही माणसाचे समाधान होत नसेल तर बुद्धाने सुचवल्याप्रमाणे ध्यानधारणा हा एक उपासनेचा प्रकार होऊ शकतो. त्यामुळे माणसाला वर्तमान काळात जगण्याची प्रेरणा मिळते आणि शाश्वत सुखाचा अनुभव मिळतो. त्यामुळे बुद्ध धर्मातील नियमांचे पालन करून संतुलित जीवन जगणे

हाच या भूतलावरील सौख्य मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे! इतर सर्व धर्मांतील उपासनांचा अर्क बुद्ध धर्मातील उपासनेत आलेला आहे. त्यामुळे शुद्ध स्वरूपातील बौद्धधर्म हा सर्व धर्माच्या अधिक शुद्ध स्वरूपात जाणार आहे. तसेच विवेकी श्रद्धेला जवळचा व विज्ञानाला जोडणारा आहे. अर्थात तो अंतिम आहे असे म्हणता येणार नाही हे बुद्धांनी सांगून ठेवलेले आहे. त्यामुळे विज्ञाना प्रमाने बुद्धधर्म देखील अधिकाधिक संशोधनावर आधारित व विकसित होत जाणारा असा बनवता येईल!

# प्रस्थापित धर्माचा अंत

प्रस्थापित धर्माची संकल्पनाच कालांतराने नाहीशी होईल. जशी आत्ता किल्ल्यांची अवस्था झाली आहे तशी कदाचित काही काळाने प्रार्थना मंदिरांची होईल! लोकांना एकत्र जमण्यासाठी एखाद्या स्थळाची आवश्यकता भासेल. ते काम सार्वजनिक संस्थेची संस्कृतिक सभागृहे, वाचनालये, व्यायाम शाळा व छंद वर्ग अशा माध्यमातून पूर्ण होऊ शकेल. प्रार्थना मंदिरात जाणारे बहुसंख्य लोक हे केवळ भेटीगाठी व सामाजिकरणाच्या उद्देशाने जात असतात. त्यासाठी परिणामकारक उपाययोजना झाल्या तर प्रार्थना मंदिरातील गर्दी आपोआप कमी होईल. आताच आधुनिक पिढी बरीचशी पूजाअर्चा प्रार्थना त्यांच्यापासून दूरच राहताना आढळते. मुलांवर धार्मिक संस्कार करणे हे खूळ लोकांनी डोक्यातून काढून टाकले पाहिजे. धार्मिक संस्काराच्या नावाखाली कालबाह्य गोष्टी करायला लावणे किंवा त्या खऱ्या आहेत असे मानायला लावणे. म्हणजे स्वतंत्र विचारांना बंदिस्त करून बालकांना मानसिक कारागृहात टाकण्यासारखे आहे. त्याउलट मुलांना मुक्त विचार करू देणे, त्यांची जिज्ञासा व निरीक्षणशक्ती वाढवणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी अत्यंत

आवश्यक आहे. अशी मुले मानसिक दृष्ट्या सबल होऊन स्वतःच्या पायावर सुखी होऊ शकतात. एकूण मानवतेच्या विकासासाठी अशाच मुलांची गरज आहे.

# श्रद्धा आणि रूढी-परंपरा

मानसिक श्रद्धे बरोबरच लोकांना काही कृतीयुक्त रुढी-परंपरा हव्या असतात. वेगवेगळे धार्मिक उत्सव त्यातूनच निर्माण झालेले आहेत. त्याला पर्याय म्हणून स्वातंत्र्य दिना सारखे काही राष्ट्रीय पर्याय वाढीस लावले पाहिजेत. बरेच मानव केंद्रित दिवस पाश्चात्त्य लोकात पाळले जात आहेत. उदाहरणार्थ मदर्स डे, फादर्स डे, थँक्स गिविंग डे इत्यादी. हे दिवस बरेच धर्मनिरपेक्ष व कर्मकांड रहित असतात तेथे लोकांना एकमेकांशी जवळीक साधण्याची संधी मिळते. विवेकी लोकांनी पुढाकार घेऊन अशा प्रकारचे दिवस सार्वजनिक स्वरूपात कसे वाढवता येतील हे पाहिले पाहिजे.

अनेक लोकांना नियमित प्रार्थना पूजा-अर्चा करण्याची सवय असते. बऱ्याच वेळा ही सवय त्यांना लहानपणापासूनच त्यांच्या कुटुंबात लावली जाते. काहीवेळा एखाद्या दुर्धर प्रसंगात मनाच्या कमकुवतपणा मुळे त्यांना आधारासाठी अशी सवय लावून घ्यावी लागते. हा अविवेकी श्रद्धेचाच एक प्रकार आहे. जर कुटुंब व्यवस्था मजबूत असेल, मित्र व नातेवाईक यांचा आधार गट मजबूत असेल आणि त्यांच्या मध्ये सुसंवाद असेल तर अशा प्रकारच्या कर्मकांडाला माणसे बळी पडत नाहीत. अनेक वेळा माणसे

आर्थिक सुबत्ता आल्यावर आपल्या जवळच्या माणसांनाही तोडून टाकतात. त्यामुळे त्यांच्यातील एकटेपणा हळू हळू वाढत जातो. संवादासाठी जवळची माणसे नसतील तर मग काल्पनिक देवाचा आधार घ्यावा लागतो. काही माणसे अनेक देवाच्या तस्वीरी व मूर्ती घरात ठेवून त्यांची पूजा प्रार्थना करतात. त्यांना एकच देव पुरेसा वाटत नाही. बालपणातील संस्कार, मनाचा कमकुवतपणा आणि स्वतंत्र विचाराचा अभाव यामुळे अशा अविवेकी श्रद्धा बळावतात!

# कर्मकांडांतून बाहेर पडण्याचा मार्ग

पूजा, प्रार्थना व नामजप यासारख्या अविवेकी श्रद्धांतून बाहेर पडण्यासाठी लोकांचे आधार गट तयार करणे आवश्यक असते. वेगवेगळ्या विषयात आवड असणारे तसेच समान आपत्तीला तोंड देणारे असे लोकांचे गट तयार झाल्यास त्यांचा आपसात सुसंवाद होऊन त्यांना आपल्या अडचणीवर मात करता येते. अशा आधार गटात असलेल्या लोकांना मग दुसऱ्या काही कर्मकांडांची गरजच लागत नाही.

माहित असलेल्या रस्त्याने आपण निश्चिंतपणे प्रवास करू शकतो. तो रस्ता सुरक्षित आहे हे आपल्याला माहीत असते. मधल्या काळात तो रस्ता असुरक्षित देखील होऊ शकतो. परंतु ही श्रद्धा विवेकी असते. ज्यावेळी आपल्याला एखाद्या ठिकाणी जाण्यासाठी रस्त्याची माहिती नसते. त्यावेळी आपण कल्पनेने एखादा रस्ता अस्तित्वात आहे असे समजून तो सुरक्षितही आहे असे समजून प्रवास करणे म्हणजे अविवेकी श्रद्धा होय. अशा अविवेकी श्रद्धे पायी आपण योग्य ठिकाणी तर पोहोचणार नाहीच परंतु भलत्याच ठिकाणी जाऊ! हाच विवेकी आणि अविवेकी श्रद्धेमधील मूलभूत फरक आहे. आपण कल्पनेने निवडलेला रस्ता

खरोखरच अस्तित्वात आहे का याची खात्री करण्यासाठी उपाय योजना करणे म्हणजेच श्रद्धेची चिकित्सा होय. श्रद्धा ही विवेकी किंवा अविवेकी कोणतीही असो तिची चिकित्सा करणे आवश्यक असते. कारण विवेकी श्रद्धा देखील चिकित्सा न करता वापरत राहिल्यास ती अविवेकी होण्याची शक्यता असते. पूजेच्या वेळेला उंदरामुळे अडथळा येऊ नये म्हणून मांजराला बांधून ठेवणारे गुरु मरण पावल्यानंतर तीच प्रथा सुरू राहते. त्यानंतर मांजर मरण पावले तर पूजेसाठी म्हणून बांधून ठेवायला दुसरे मांजर विकत आणणारे शिष्य हे विवेकी कृतीचे अविवेकी श्रद्धेत रूपांतर करतात. असे अनेक वेळा व्यक्ती महात्म्या मुळे घडून येते.

## व्यक्ती महात्म्य व अविवेकी श्रद्धा

अनेक अविवेकी श्रद्धांचे मूळ व्यक्ती महात्म्या मध्ये असते. लोक एखाद्या थोर पुरुषाला देवाचा अवतार समजू लागतात. त्याच्या हातून कोणतीही चूक होणार नाही अशी त्यांची खात्री होते. त्यामुळे त्यांनी केलेली कोणतीही कृती, कोणताही प्रश्न न विचारता तशीच करण्याकडे लोकांची प्रवृत्ती होते. त्यातूनच अविवेकी श्रद्धेचा उदय होतो. थोर महात्म्याने किंवा आपल्या गुरुने सांगितलेला एकेक शब्द प्रमाण मानला जातो. काहीवेळा हे शब्द देवा कडूनच आपल्या गुरूच्या मुखातून आलेले आहेत असे भक्तमंडळी मानते. धर्माचे ठेकेदार मंडळी या गोष्टी नाकारत तर नाहीच परंतु स्वार्थासाठी त्याला पुष्टी देतात!यासाठी कोणत्याहीही थोर संत महात्म्याची चिकित्सा करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. अर्थात भक्त मंडळीच्या भावना त्यामुळे दुखावण्याची शक्यता असते. तरीही सतत प्रश्न विचारीत राहिल्यास त्यांना विचार करायला भाग पाडता येते.

# धर्मग्रंथ आणि धर्माचे ठेकेदार

अविवेकी श्रद्धांचे मूळ व्यक्ती महात्म्या प्रमाणेच त्यांनी लिहून ठेवलेल्या ग्रंथांच्या प्रमाण मानण्यामध्ये असते. त्यासाठी हे ग्रंथ बऱ्याच वेळा अपौरुषेय मानले जातात. म्हणजे ते माणसाने लिहिलेले नसून दैवी प्रेरणेने किंवा सरळ देवाकडून आलेले समजले जातात. त्यांची चिकित्सा करणे तर दूरच परंतु त्यातील एका शब्दाचाही फरक केलेला भक्तांना मान्य नसतो. त्यासाठी धर्माचे ठेकेदार असे ग्रंथ वेगळ्या भाषेत लिहीत असत. ती भाषा शिकण्याची परवानगी सर्वसामान्य लोकांना नसे. त्यामुळे अशा ग्रंथांमध्ये काय लिहिले आहे ते मूठभर लोकांनाच माहीत असे. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार देखील त्यांनी स्वतःच स्वतःला बहाल केलेला असे. त्यामुळे असे ग्रंथ हे मूठभर धर्ममार्तंडांना व राज्यकर्त्यांना सोयीचे होतील अशाप्रकारे लिहिले गेले आहेत. धर्म साचेबंद पद्धतीने टिकवून ठेवण्यासाठी या ग्रंथांची मोठी मदत झाली आहे. स्वतंत्र विचाराला आणि विज्ञानाला या ग्रंथांच्या आधारे आव्हान दिले जाते. बायबलच्या आधारे गॅलिलिओ सारख्या शास्त्रज्ञाला कारागृहात रहावे लागते. विज्ञानातील सर्व शोध कुराणात किंवा पुराणात आहेत असे

सांगणारे भक्त भेटतात! त्यांच्या मताने ज्याने हे सर्व व विश्व निर्माण केले त्याला सर्व विज्ञान माहीत असले पाहिजे. त्यामुळे त्याने दिलेल्या धर्मग्रंथात ते असणे स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी सर्व धर्माचे ग्रंथ सगळ्या भाषांत अनुवादित होऊन सर्व लोकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. तसेच त्यांच्यावर उलट-सुलट चर्चा झाली पाहिजे. आपल्या स्वतःच्या धर्मातील अविवेकी श्रद्धा आपल्याला दिसत नाहीत. म्हणून दुसऱ्याने दाखवलेल्या अशा गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत. यातून बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र विचाराची कास धरणे हाच पर्याय उपलब्ध राहतो.

## मनोविकार आणि अविवेकी श्रद्धा

अविवेकी श्रद्धेचा आणखीन एक प्रकार म्हणजे एखाद्या व्यक्तीची दृष्ट लागणे किंवा एखाद्या व्यक्तीच्या अंगात देव देवी येणे. एखाद्या व्यक्तीने लहान मुलावर रोखून पाहिले तर त्या व्यक्तीची त्या बालकाला दृष्ट लागतेआणि त्यामुळे त्याचे आरोग्य बिघडते. दृष्ट जिच्यामुळे लागते अशी व्यक्ती साधारणपणे स्त्री असते. स्त्रियांचा लहान मुलांशी अधिक संबंध येत असल्यामुळे त्यांच्यामध्ये अविवेकी श्रद्धा सहज पसरते. त्यातूनच एखाद्या स्त्रीला चेटकीण ठरवले जाते. आणि तिचा सामूहिक बळी घेतला जातो. ज्या सासुरवाशीण स्त्रियांना व्यक्त होता येत नाही किंवा छळ सहन करावा लागतो त्या स्त्रिया अंगात येऊन घुमू लागतात. अंगात देवी आल्यामुळे अर्थातच त्या काळात त्यांचा मानसन्मान वाढतो. हे सर्व सहजासहजी घडत असल्यामुळे अंगात येण्याची प्रवृत्ती नकळत वाढत जाते. प्रत्यक्षात हा एक मनोविकार आहे हे अनेकांना ठाऊक नसते. त्यामुळे ते दैवी काम समजून पूजा अर्चा केली जाते. मनोवैज्ञानिक ज्ञान सर्व लोकापर्यंत कसे पोहोचेल हे पाहिले पाहिजे. अज्ञान हा अविवेकी श्रद्धेचा पाया असतो.

## श्रद्धेचे सामर्थ्य

श्रद्धेमुळे जग बदलते. कारण श्रद्धा आपल्या भावनांचे नियंत्रण करतात. आणि भावना कृतीसाठी प्रवृत्त करतात. एखादी गोष्ट कृती केल्याशिवाय घडून येत नाही. त्यामुळे श्रद्धेनेच जग बदलते ही खरी गोष्ट आहे. परंतु ती श्रद्धा विवेकावर आधारित असेल तरच बदल चांगल्या प्रकारे होऊ शकेल. विमानाचा शोध लावणाऱ्या राइट बंधूची श्रद्धा होती की माणसाला हवेत उडता येईल. त्यासाठी त्यांनी विविध प्रयोग केले आणि शेवटी ते यशस्वी झाले. (त्यांचे वडील धर्मगुरू होते. त्यांना ही श्रद्धा मान्य नव्हती. त्यांच्यामते फक्त देवदूतच आकाशात उडू शकतात. ) गांधीजींची श्रद्धा होती की अहिंसे ने स्वातंत्र्य मिळवता येईल. त्यासाठी त्यांनी विविध उपक्रम केले. लोकांना एकत्र आणले आणि सत्याग्रह नावाचे नवे शस्त्र शोधून काढले. त्याचा उपयोग करून स्वातंत्र्य मिळवले. विवेकी श्रद्धा मोठे परिवर्तन घडवून आणू शकतात. परंतु श्रद्धा जर अविवेकी असतील तर मात्र भुताटकी करणाऱ्या चेटकिनीला मारणे. बायबल विरूद्ध बोलणाऱ्या शास्त्रज्ञांना जाळून टाकणे असे प्रकार घडतात!

# विवेकी श्रद्धेतून विवेकी कृती

लोकांना विवेकीकृतीसाठी प्रवृत्त करायचे असेल तर भक्कम विवेकी श्रद्धा निर्माण केल्या पाहिजेत. विवेकी श्रद्धा निर्माण करण्याचे काम स्वतंत्र विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवूनच शक्य आहे. विवेकी श्रद्धा ही स्वतंत्र विचार आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांना जोडणारा दुवा आहे. जे लोक अशा विवेकी श्रद्धेच्या आधारे जगतात त्यांचे जगणे अधिक सुसह्य होते. जे समाज विवेकी श्रद्धा पाळतात त्यांचा सतत विकास होत राहतो. अविवेकी श्रद्धेच्या कच्छपी लागलेल्या लोकांचा मात्र विनाश अटळ असतो. युरोपात नव जागृती झाल्यावर ज्या सुधारणा सुरू झाल्या व त्यातून वैज्ञानिक क्रांती घडून आली त्यावरून विवेकी श्रद्धेचा समाजावर होणारा परिणाम स्पष्ट दिसतो. त्या उलट आपल्या देशात अविवेकी श्रद्धांमुळे लोक अज्ञान, दारिद्र्य, दुष्काळ आणि रोगराई यांना बळी पडत राहिले.

## स्वतःविषयीच्या अविवेकी श्रद्धा

काही अविवेकी श्रद्धा वैयक्तिक आणि राष्ट्रीय पातळीवर स्वतःविषयीच्या अहमगंडा वर आधारित असतात. मी अशा प्रकारचा आहे किंवा माझे राष्ट्र किंवा समाज अशा प्रकारचा आहे असे मानून त्या प्रमाने वागण्याचा प्रयत्न करणे. मी बुद्धिमान आहे, मी तापट आहे, मी भोळा आहे अशा प्रकारच्या स्वतःविषयीच्या अविवेकी श्रद्धा तसेच आमची संस्कृती श्रेष्ठ आहे, आमचा समाज संघटित आहे, आमचे राष्ट्र सर्वश्रेष्ठ आहे अशाप्रकारच्या सामूहिक अविवेकी श्रद्धा बऱ्याच वेळा व्यक्तिगत आणि सामूहिक विनाशाला कारणीभूत ठरतात. स्वतःला रागीट समजणारा माणूस कारण नसताना रागावून आपल्यावर संकट ओढवून घेतो. आपल्याला बुद्धिमान समजणारा माणूस आपल्याला येत नसते ही गोष्ट अंगावर घेऊन, करायचा प्रयत्न करतो व फसतो. एखादे राष्ट्र स्वतःला श्रेष्ठ समजते आणि हिटलरच्या जर्मनी सारखे विनाश ओढवून घेते. आपली संस्कृती श्रेष्ठ आहे असा समजणारा भारतीय समाज स्वतःला बंदिस्त करून घेतो. त्यामुळे वर्षानुवर्षे बाहेरील जगापासून अलिप्त राहतो. त्यामुळे अप्रगत राहतो. आपल्या सर्व वैयक्तिक आणि सामूहिक श्रद्धा योग्यप्रकारे तपासून घेतल्या गेल्या

पाहिजेत. स्वतःला किंवा आपल्या राष्ट्राला श्रेष्ठ समजणाऱ्या किंवा कनिष्ठ समजणाऱ्या श्रद्धा या अविवेकीच होत.

## विवेकी श्रद्धा ही व्यक्तिगत निवड

विवेकी श्रद्धा ही व्यक्तिगत निवड आहे. प्रत्येक माणसाने आपल्या श्रद्धा चिकित्सकपणे तपासून पाहिल्या तरच त्याला विवेकी श्रद्धा वापरता येतील. सर्वसामान्य माणसाला हे शक्य होईल का हा प्रश्न आहे. जोपर्यंत स्वतंत्र विचार करण्याची सवय लागणार नाही तोपर्यंत ते शक्य होणार नाही हे खरे आहे. परंतु सर्वसामान्य माणूस जेव्हा स्वतंत्र विचार करीत नाही तेव्हा तो समाजातील दुसऱ्या उच्चभ्रू लोकांचे अनुकरण करीत असतो. त्यांच्या श्रद्धा ह्या आपल्या श्रद्धा समजतो. त्यामुळे समाजातील वरच्या वर्गातील लोक जे समाज माध्यमातून वावरतात त्यांना जरी चिकित्सकपणे विचार करण्याची सवय लागली तरी त्याचा परिणाम सर्वसामान्य लोकांवर होऊ शकतो. त्यामुळे स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय बालपणापासूनच कशी रुजवता येईल हे पाहायला हवे. कुटुंब, शाळा, कॉलेजे आणि विविध संस्था या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. समाज माध्यमातून त्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार होणे गरजेचे आहे.

## स्वत:विषयीची श्रद्धा: माईंड सेट

स्वतःविषयीच्या अविवेकी श्रद्धा व्यक्तिगत पातळीवर फार मोठे नुकसान करू शकतात. सुखी जीवन जगणारे व स्वतःचा विकास घडवून आणणारे लोक निश्चितपणे विवेकी श्रद्धा जगत असतात. तर दुःख व दारिद्र्यात खितपत पडलेले लोक अविवेकी श्रद्धेने जगत असतात. आपली स्वतःची कुवत एक ठराविकच आहे त्याच्या पलीकडे आपण जाऊ शकत नाही असा समज असेल तर तो माणूस पुढे जाऊ शकत नाही. याउलट प्रत्येक गोष्टीमध्ये शिकत राहणारा माणूस पुढे पुढे जात राहतो. Dr. Carol Dweck यांच्या माईंड सेट या पुस्तकात यावर चर्चा केलेली आहे. फिक्स माइंड सेट असलेल्या लोकांची स्वतःच्या कुवतीवरची श्रद्धा पक्की ठरलेली असते. ती त्याला ठरावीक मर्यादेच्या पुढे जाऊ देत नाही. ग्रोथ माइंड सेट असणा-या लोकांची श्रद्धा आपण पुढे जाऊ शकतो अशी असते. त्यामुळे ते नवनव्या गोष्टी शिकत राहतात व पुढे जातात. फिक्स माइंड सेट असणारे लोक नव्या गोष्टी शिकण्याचे टाळतात. नव्या समस्यांना तोंड देण्याचे टाळतात. त्यांना अपयशाची भीती वाटते. त्यामुळे अपयश आल्यावर ते निराश होतात. त्याउलट ग्रोथ माइंड सेट असणारे लोक कोणत्याही नव्या समस्येला सहज

भिडतात. यश आले तरी हरखून जात नाहीत आणि अपयश आले तरी निराश होत नाहीत. त्यामुळे त्यांची प्रगती सतत सुरू राहते. आपल्या कुटुंब व्यवस्थेत समाजात आणि शिक्षण व्यवस्थेत फिक्स माईंड सेट तयार करण्यावर भर दिला जातो. एखाद्या कामातील अंतिम यशालाच महत्त्व देणे, स्पर्धेमध्ये पहिला येणाऱ्यालाच बक्षीस देणे, खेळाच्या सामन्यात जिंकणाऱ्यालाच महत्त्व देणे. या सर्व गोष्टी कष्टाला व प्रयत्नाला कमी लेखतात त्यामुळे लोकांच्या मनात स्वतः विषयीची एक निश्चित भूमिका तयार होते. त्याएवजी कोणत्याही कामात केलेल्या कष्टाला महत्व दिले आणि त्याचे कौतुक केले तर ग्रोथ माइंड सेट तयार व्हायला मदत होते.

## अविवेकी श्रद्धा आणि रुढी परंपरा

अनेक अविवेकी श्रद्धा संस्कृती, रुढी व परंपरा यांच्या नावावर खपवल्या जातात. त्या पाळण्या मागील कारण परंपरा संपलेली असते. तरीही आपल्या संस्कृतीचा भाग म्हणून त्या आचरणात आणल्या जातात. आपल्या वाहनामध्ये लिंबू-मिरची बांधणे, देवाची मूर्ती ठेवणे यामुळे आपल्या वाहनाला अपघात होणार नाही; अशी बहुसंख्य वाहनचालकांची श्रद्धा असते. ही अविवेकी श्रद्धा आहे. आपल्या गाडीची देखभाल नियमितपणे केली आणि गाडी सावधपणे चालवली तर अपघाताचा धोका कमी होतो. ही विवेकी श्रद्धा आहे. सर्व प्रकारची काळजी घेऊनही अपघात होण्याची शक्यता असते त्यामुळे त्यासाठीही पूर्वनियोजन करणे हीदेखील विवेकी श्रद्धा आहे. परंतु अविवेकी श्रद्धा लोकांना आवडतात कारण त्यांच्यासाठी स्वतंत्र विचाराची आणि सतत सावध राहण्याची आवश्यकता नसते. अविवेकी श्रद्धा आपल्याला अज्ञानात आनंद मानायला शिकवतात. तो आनंद किती धोकादायक असतो हे संकटात सापडल्या नंतरच कळते. अनेक वेळा तीर्थयात्रेला जाणाऱ्या लोकांचे होणारे अपघात आणि तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होणारी चेंगराचेंगरी ही अविवेकी श्रद्धेची

फळे असतात. अशा ठिकाणी सरकारी यंत्रणा जर पुरेशा सतर्क आणि विवेकी असतील तर अपघात मोठ्याप्रमाणात टाळले जातात. परंतु शासन यंत्रणा देखील अशी अविवेकी श्रद्धा बाळगणारी असेल तर विनाश अटळ असतो.

# विदेशी अविवेकी श्रद्धा

देशी अविवेकी श्रद्धांबरोबर विदेशी अविवेकी श्रद्धा देखील लोक वापरतात. वास्तुशास्त्र देशी तर फेंगशुई विदेशी. कधीकाळी चीनमध्ये हवा आणि पाणी याच्या उपलब्धतेवर घर बांधण्याच्या जागेचे महत्त्व ठरत असे. त्यावरून हे शास्त्र तयार झाले असावे. आपल्या देशात त्याला फारसा संदर्भ नसला तरी जागा निवडण्यासाठी त्या शास्त्राचा उपयोग केला जातो. अशाप्रकारची फेक शास्त्रे लोकांना आपल्या समस्या वर सोपे तोडगे देत असतात. त्यामुळे ती लोकप्रिय होतात. त्यांच्यावरील श्रद्धा वाढवण्यासाठी त्या शास्त्राची तज्ञ मंडळी अनेक गुंतागुंतीची कर्मकांडे आणि आकडेमोड वापरते. सामान्य लोकांना न समजणाऱ्या भाषेत काही गोष्टी केल्यावर त्यांना ते शास्त्र जास्त गुढ, गहण व खरे वाटते. प्रत्यक्षात या कर्मकांडांना प्रयोगाचा किंवा गणिताचा काहीच आधार नसतो.

# अविवेकी श्रद्धा आणि शास्त्र निर्मिती

काही अविवेकी श्रद्धा मधून विविध शास्त्रे निर्माण झाली आहेत. विज्ञानाच्या सुरुवातीच्या काळात अल्केमी नावाचे एक शास्त्र होते. त्या शास्त्रांतील लोकांची अशी श्रद्धा होती की काही रसांच्या प्रक्रिया करून लोखंडा सारख्या कमी प्रतीच्या धातूचे रूपांतर सोन्यासारख्या उच्च धातूमध्ये करता येईल. त्यासाठी त्यांनी विविध प्रयोग केले. अनेक रसायने शोधली आणि त्यातूनच पुढे केमिस्ट्री म्हणजे रसायनशास्त्र उदयास आले. स्वतंत्र व चिकित्सक विचारांमुळेच ते शक्य झाले. परंतु दुसऱ्या बाजूला खगोलशास्त्रातून ज्योतिष शास्त्र हे फेक शास्त्र निर्माण होऊन ते टिकून राहिले. ज्योतिषशास्त्र टिकवण्याचे आणि वाढवण्याचे काम धार्मिक श्रद्धांशी जोडल्या गेलेल्या प्रश्न न विचारणाऱ्या मंडळींनी केले. म्हणजे स्वतंत्र विचारामुळे फेक शास्त्रातून देखील खरी शास्त्रे निर्माण होऊ शकतात. आणि विचार करायचे थांबवले तर खऱ्या शास्त्रांमधून फेक शास्त्रे निर्माण होतात!

## मानसिक आधार

अविवेकी श्रद्धा या अनेक वेळा मानसिक आधार देण्यासाठी उपयोगी ठरतात. एखाद्या दुःखात सापडलेल्या माणसाला धार्मिक कर्मकांड पूजाअर्चा करीत असताना आपल्या दुःखाचा विसर पडतो. कालांतराने दुःख कमी होत जाते त्याप्रमाणे त्याचमुळे त्या कर्मकांडांतून तो हळूहळू बाहेर पडतो. परंतु अशा प्रकारच्या पर्यायांमध्ये त्या माणसाचा फारसा फायदा होत नाही. तर मानसिक कमकुवतपणा वाढत जातो. त्याऐवजी अशा दुखी माणसाला काही सर्जनशील, समाजोपयोगी किंवा स्वतःच्या विकासासाठी असे काही करता आले तर ते जास्त विवेकी होईल. आपला मुलगा एखाद्या दुर्धर रोगाने मरण पावतो तेव्हा ते आई-वडील अशा दुर्धर रोगाने ग्रस्त असलेल्या मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी मदतीचा हात पुढे करतात व त्या कामात स्वतःला गुंतवून घेत आपल्या दुःखावर मात करतात तेव्हा ती खरी विवेकी श्रद्धा होय.

## सर्जनशील श्रद्धा

आपल्याला जे काही चांगले करता येत असेल ते दुसऱ्यासाठी मनःपूर्वक निरपेक्षपणे करणे यातच आपले समाधान व समाजाचे हित दडलेले आहे ही विवेकी श्रद्धा अनेक कलावंत, विचारवंत व समाजसुधारकांच्या अंतरंगात असते. त्यामुळे अशा लोकांना निराशा येत नाही किंवा लोकांनी अपमान केल्यामुळे ते आपले काम सोडत नाहीत. अशा लोकांना आपण काय करतो आणि त्याचा काय फायदा होणार आहे हे निश्चित ठाऊक असते.

# विवेकी श्रद्धा आणि कृती

केवळ विवेकी श्रद्धांची निर्मिती पुरेशी नाही त्यासाठी कृतीची गरज आहे असे म्हटले जाते. यामध्ये स्वतंत्र विचाराने विवेकी श्रद्धेची निर्मिती ही कृती समजली जात नाही ही चूक आहे. विवेकी श्रद्धेची निर्मिती सर्वोत्कृष्ट सर्जनशील कृती आहे. कारण श्रद्धेमुळे कृती घडून येते. विवेकी किंवा अविवेकी कोणत्याही श्रद्धा लोकांना कृतीसाठी प्रवृत्त करतातच. त्यामुळे कृतीची काळजी करण्याची गरज नाही. श्रद्धा त्यांचे अन्वयार्थ बदलून विवेकी करणे जेवढे शक्य होईल तेवढी लोकांची कृती विवेकी होत जाईल!

अविवेकी श्रद्धा आचरणात आणण्यासाठी विचार करण्याची गरज लागत नाही. त्यामुळे ज्यांचा जीवनमरणाचा झगडा तीव्र असतो अशा लोकांना या श्रद्धा आधार देतात. विज्ञान युग अवतरण्यापूर्वी आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसामान्य लोकांना खूप परिश्रम करावे लागत होते. त्यामुळे श्रद्धांची चिकित्सा करायला त्यांच्याजवळ वेळच नव्हता. समाजातील जे लोक शिकलेले विचार करणारे असतील त्यांनी दिलेल्या श्रद्धानुसार ते जगत होते. भ्रूणहत्या, सतीची चाल किंवा देवदासी अशा प्रकारच्या क्रूर श्रद्धा देखील सर्वसामान्य जनता

कोणताही विचार न करता बिनबोभाटपणे पाळत होती. वैज्ञानिक क्रांतीमुळे सर्वसामान्य लोकांना देखील नवी दृष्टी, नवा आधार आणि मोकळा वेळ मिळाला. त्यामुळे स्वतंत्र विचाराचे चक्र सुरू झाले. परंतु वर्षानुवर्षे पाळत असलेल्या अविवेकी श्रद्धा विचार न करता पाळण्याची सवय लोकांमधून नाहीशी झाली नाही. अजूनही लोकांना या श्रद्धांचा आधार वाटतो. त्यामुळे त्या पूर्णपणे बाजूला सारणे सर्वांसाठी शक्य होणार नाही. मात्र हळूहळू नव्या विवेकी श्रद्धा स्थापन करणे शक्य होईल. आणि प्रत्येक माणसाला जरी स्वतंत्रपणे विचार करता आला नाही; तरीही विचार करणाऱ्या गटाचे ते ऐकायला लागतील. ज्याप्रमाणे लोक आधुनिक औषधोपचारावर श्रध्दा ठेवायला लागले आहेत. वैद्यकीय ज्ञान कसे कार्य करते हे त्यांना माहीत नसले तरीही डॉक्टर आजारावर परिणामकारक उपचार करतात याचा अनुभव आल्याने त्याला मान्यता मिळत आहे. तसेच विवेकी श्रद्धा पाळल्याने त्याचे चांगले परिणाम दिसायला लागले म्हणजे लोकही त्या पाळू लागतील.

# संस्थाचालक आणि अविवेकी श्रद्धा

मोठ्या संस्था चालवणारे लोक आणि सरकारी संस्थांचे संचालक अनेक वेळा अविवेकी श्रद्धा पाळतांना आढळतात. वैज्ञानिक संस्थांचे प्रमुख उच्चविद्याविभूषित असूनही या गोष्टींना का बळी पडतात असा आपल्याला प्रश्न पडतो. त्यांना विचारले असता ते असे सांगतात की त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या सर्व लोकांची ती श्रद्धा असते. वैयक्तिक रित्या ते पूर्णपणे विवेकी असले तरीही सर्व लोकांनी चांगल्या प्रकारे सहकार्य करावे म्हणून ते या श्रद्धांचा उपयोग करतात. अवकाशयान पाठवताना अशा प्रकारची धार्मिक कर्मकांडे करणे किंवा आपल्या संरक्षण दलासाठी विमाने खरेदी करताना त्याची पूजा करणे हे लोकांना खुश करण्यासाठी केले जाते. प्रत्यक्षात संस्था प्रमुखांना किंवा पुढाऱ्यांना ही एक संधी असते ज्यावेळी ते लोकांना अधिक विवेकी बनवू शकतात. माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी कधीही कर्मकांडाचा आधार घेतला नाही तरीही ते सर्वाधिक लोकप्रिय पंतप्रधान होते. बाबा आमटे या प्रख्यात समाजसेवकाच्या आनंदवन प्रकल्पावर कोणत्याही प्रकारच्या मूर्ती, मंदिरे किंवा पुतळे दिसत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या कर्मकांडाला वाव दिला जात नाही. तेथील

कुष्ठरोगी स्वतःच्या पायावर उभे आहेत. त्यांनी बनवलेल्या वस्तू बाहेरच्या जगात विकल्या जातात; त्यांनी पिकवलेले अन्नधान्य खुल्या बाजारात विकले जाते. लोकांना स्वतःच्या प्रयत्नांवर जगण्याची सवय लागली आहे. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. गांधीजी सुद्धा देवभोळे नव्हते. ते आपल्या प्रार्थना सभांचा उपयोग लोकांच्या प्रबोधनासाठी करीत असत. विज्ञान संस्थांच्या प्रमुखांनाही हे करता येणे शक्य आहे. एखाद्या विज्ञान संस्थेत सत्यनारायणाची पूजा ठेवण्याऐवजी विज्ञानावर आधारित मनोरंजनाचा कार्यक्रम किंवा सहभोजन आयोजित करता येऊ शकते.

## दुसऱ्या बद्दलची अविवेकी श्रद्धा

माणसे आपल्याप्रमाणेच दुसऱ्या बद्दल अविवेकी श्रद्धा बाळगतात. दुसरा माणूस आपल्याविषयी वाईट विचार करतो, आपल्याला कमी समजतो, आपले नुकसान करण्याचा प्रयत्न करतो इत्यादी श्रद्धा आपल्या मनात आपण निर्माण करतो. माणसे आपापल्या स्वभावा प्रमाणे वागत असतात. आपण त्यांच्याविषयी बाळगलेली श्रद्धा अविवेकी असण्याची शक्यता जास्त असते. खरोखरच एखादा माणूस आपल्या विरुद्ध वाईट वागत असेल तरीही आपण कल्पना करतो तेवढा तो वाईट नसतो. याउलट वाईट वागणारा माणुसही चांगला आहे असे मानले तर आपल्या त्याच्याविषयीच्या प्रतिक्रिया चांगल्या होतात. त्यामुळे त्याचे वागणेही बदलू शकते. म्हणून आपल्या आजूबाजूची सर्व माणसे चांगली आहेत अशी श्रद्धा विवेकी होईल. त्यामुळे आपला मनस्ताप होण्याचे टळते. अशी श्रद्धा बाळगण्यामुळे आपण आनंदात राहू शकतो. आय ॲम ओके यू आर ओके या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे मी चांगला आहे आणि तू देखील चांगला आहेस असे समजल्यामुळे दोघांनाही मनशांती मिळू शकते. अनेक लोक स्वतःला चांगला समजतात परंतु दुसऱ्याला वाईट समजतात. असे

लोक दुसऱ्याबरोबर तुच्छतेने वागतात. तर दुसऱ्या प्रकारचे लोक स्वतःला वाईट समजतात व दुसऱ्याला चांगले समजतात. त्यांच्यामध्ये न्यूनगंड असतो. त्यांना सतत वाटत असते की दुसऱ्याचे चांगले चाललेले आहे आणि आपण मात्र कमनशिबी आहोत. म्हणूनच आपल्यासह सर्व जग चांगले आहे अशी श्रद्धा बाळगणे हे विवेकी आहे.

## सत्ता आणि अविवेकी श्रद्धा

एक केंद्रीय सत्ता राजाच्या स्वरूपात कधीपासून लोकांना परिचित आहे. राजा हा लोकांना एकत्र ठेवू शकतो आणि त्यामुळे आपल्या लोकांचे रक्षण होते ही श्रद्धा अनेक वर्षे लोकांवर राज्य करीत होती. लोकांचे कल्याण करण्या ऐवजी आपली सत्ता टिकवण्यासाठी हे राजे लोकांवर अत्याचार करीत व आपसात भांडत होते. परंतु लोकांना यावर काही पर्याय सापडत नव्हता. त्यांना वाटे राजा नसेल तर आपले संरक्षण कोण करील? हळूहळू राजांना देवाचा दर्जा प्राप्त झाला. परंतु त्याला पर्याय म्हणून लोकांनी एकत्र येऊन आपला नेता निवडणे ही प्रक्रिया सुरू झाली. गणराज्या पासून सुरू झालेली ही पद्धती विकसित होत आज लोकशाही म्हणून ती वापरली जात आहे. तरीपण लोकशाहीमध्ये देखील निवडून दिलेले नेते हे आपले शासक आहेत असे लोक म्हणतात. प्रत्यक्षात हा राजेशाहीतील अविवेकी श्रद्धेचा परिणाम आहे. लोकशाहीचा प्रसार वाढत जाईल. ती विकेंद्रित होत जाईल. तशी शासन व्यवस्था मोडीत निघेल. प्रत्येक माणूस स्वतंत्रपणे स्वतंत्र विचाराने जगायला लागेल तेव्हाच खरी विवेकी शासन व्यवस्था निर्माण होईल. आजच्या लोकशाहीमध्ये लोक निवडून गेलेल्या

नेत्यांना आपल्यावर शासन करण्याचा अधिकार देतात प्रत्यक्षात त्यांना सेवा करण्यासाठी निवडलेले असते हे लोक विसरून जातात. त्यामुळे अशा लोकांचे महत्त्व अमर्याद वाढते. त्यामुळेच सत्ता मिळवण्यासाठी विविध भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला जातो. त्यामुळे निवडून दिलेला प्रतिनिधी पूर्णपणे आपल्या मतदारांना जबाबदार राहील आणि त्यांची सेवा करण्यासाठीच निवडून दिलेले आहे हे प्रत्यक्षात येईल तेव्हाच खरी लोकशाही सुरू होईल.

## श्रद्धा आणि संस्कृती

अविवेकी श्रद्धा हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. लोकांना एकत्र राहण्यासाठी आणि एकमेकांशी सहकार्य करण्यासाठी श्रद्धा हा आवश्यक घटक आहे. मग ती धार्मिक श्रद्धा असो किंवा शासन व्यवस्थेवरील श्रद्धा असो. परंतु या श्रद्धांची चिकित्सा केली गेली नाही तर त्या कालबाह्य व अविवेकी होत असतात.

## श्रद्धा आणि वर्तमान काळातील जीवन

कोणत्याही श्रद्धा आपल्याला वर्तमान काळात जगू देत नाहीत. श्रद्धेमुळे भविष्यकाळात काय घडेल याची कल्पना आपण करीत असतो. देवाच्या कृपेने आजार बरा होईल. वास्तुशांती केल्यामुळे घरात सुख नांदेल. पुजा प्रार्थना केल्यामुळे देव प्रसन्न होईल. श्रद्धा आपल्याला भविष्यकाळात नेऊन ठेवतात. त्यांचा उपयोग करून आपण भविष्याविषयीच्या चिंता कमी करण्याचा प्रयत्न करतो. प्रत्यक्षात काय घडणार आहे हे आपल्याला ठाऊक नसते. त्यामुळे प्रथम चिंता आणि नंतर त्यावरील उपाय म्हणून श्रद्धा असे चक्र सुरू होते. जर माणसाने वर्तमानकाळातच जगायचे ठरवले तर भविष्याची चिंता नाहीशी होते आणि श्रद्धेची गरज उरत नाही. त्यामुळे अशाप्रकारचे जगणे हे सर्वात अधिक आनंददायी असते. वर्तमान काळात जगण्यासाठी आपल्यासमोर घडणाऱ्या किंवा आपण करीत असलेल्या गोष्टीमध्ये आपले पूर्ण लक्ष पाहिजे त्यालाच ध्यान म्हटले जाते. इंग्रजीमध्ये त्याला माईंड फुल मेडिटेशन म्हणतात. बौद्ध धर्मामध्ये ह्या ध्यानधारणावर भर दिलेला आहे. आधुनिक मानसशास्त्रात देखील या माइंड फुल मेडिटेशन वर संशोधन सुरू आहे.

# श्रद्धांशिवाय जगणे

श्रद्धां... शिवाय जगणे म्हणजे पूर्ण जागृतावस्थेत असणे. तर श्रद्धांसह जगणे म्हणजे पूर्ण डोळे मिटून जगणे होय. या दोन्ही स्थिती मधला मार्ग म्हणजे वैज्ञानिक पद्धतीने जगणे होय. वैज्ञानिक पद्धतीमध्ये श्रद्धा आणि चिकित्सा यांचे संतुलन साधलेले असते. जोपर्यंत एखादा सिद्धांत किंवा थिअरी प्रयोगाच्या आधारे खरी ठरते तोपर्यंत ती खरी मानली जाते. परंतु प्रयोगाचे निष्कर्ष तिच्याविरुद्ध जात असतील तर मात्र चिकित्सा सुरू होते. त्या चिकित्से मुळे नवी थिअरी तयार होते. त्यामुळे विज्ञानाचा विकास होत राहतो. हीच पद्धत नेहमीच्या जगण्यासाठी देखील वापरता येऊ शकते. जी श्रद्धा प्रत्यक्ष प्रयोग आणि निरीक्षण त्यांच्यापुढे खरी ठरत नसेल ती सोडून द्यायला पाहिजे. त्यामुळे आपोआपच विवेकी श्रद्धा टिकून राहतील व अविवेकी नाहीशा होतील.

## श्रद्धांची चिकित्सा व भावना

धर्मामध्ये श्रद्धा या भावनांशी जोडल्या जातात. त्यामुळे श्रद्धांची चिकित्सा करणे म्हणजे भावना दुखावणे हा प्रकार वाढीस लागतो. ज्या संत महात्म्यांनी धर्मातील श्रद्धांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला त्यांना आपल्या हयातीत छळ सहन करावा लागला. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र त्यांना देवत्व दिले गेले व तेच श्रद्धा स्थान झाले. सर्वसामान्य माणसेच नव्हे तर उच्चशिक्षित देखील या भावनिक श्रद्धेच्या सापळ्यात सापडतात याचे कारण स्वतंत्र विचार करण्याच्या सवयीचा अभाव होय!त्यासाठी बालपणापासूनच श्रद्धेचे संस्कार करण्या ऐवजी स्वतंत्र विचार करायचे संस्कार होणे आवश्यक आहे.

## सण उत्सव आणि श्रद्धा

आपले सण उत्सव हे केवळ आनंदासाठी पाळायला हरकत नाही. दिवाळी, नाताळ, ईद, नवरोज यासारखे सण लोक उत्साहाने साजरे करतात. परंतु त्यामध्ये धार्मिक श्रद्धेचा अतिरेक न आणता केवळ आनंद मिळवण्यासाठी त्यांचा उपयोग केल्यास ते अविवेकी ठरणार नाहीत. बारसे, मुंज आणि लग्न यासारखे कार्यक्रम कौटुंबिक आनंदासाठी करायला हरकत नाही परंतु ते करीत असताना एका ठराविक पद्धतीने त्याला कर्मकांडाचे स्वरूप देऊ नये. कर्ज काढून लोकांना दाखवण्यासाठी कार्यक्रम करण्याची प्रवृत्ती असते ही मात्र निश्चितच अविवेकी होईल. आपण जे जे कार्यक्रम करतोय ते सर्व आपल्या व आपल्या कुटुंबाच्या, नातेवाईकांच्या मित्रांच्या आनंदासाठी आहेत. त्यामधील धार्मिक श्रद्धा या निमित्तमात्र आहेत हे लक्षात घेऊन कार्यक्रम केल्यास आनंद द्विगुणित होईल व अविवेकी श्रद्धेवर देखील मात करता येईल. असे कार्यक्रम करीत असताना कोणत्याही प्रकारचे आर्थिक-सामाजिक पर्यावरण विषयक नुकसान होणार नाही हे पाहणे विवेकाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. गणेशोत्सव व दही हंडी सारखे कार्यक्रम अधिकाधिक अविवेकी होत चालले आहेत. आपली श्रद्धा

जोपासण्याच्या नावाखाली ध्वनि पाणी पर्यावरण यांचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. दहीहंडीच्या कार्यक्रमात अनेक तरुण आणि मुले जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात हे सर्व टाळता येईल असे या कार्यक्रमाचे स्वरूप बदलायला हवे. त्याचप्रमाणे सर्वांना सामावून घेणारे स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिना सारखे राष्ट्रीय कार्यक्रम तसेच फादर्स डे, मदर्स डे, व्हॅलेंटाईन डे आणि थँक्स गिविंग डे सारखे सामाजिक दिवस अधिक चांगल्या तऱ्हेने साजरे करून समाजातील आनंद वाढवता येईल.

# श्रद्धा, कल्पकता आणि स्वतंत्र विचार

आपल्या कल्पकतेचा पाया श्रद्धा असते. आपल्या श्रद्धा विवेकी असतील तर त्यातून जी कल्पना आपण करतो ती प्रत्यक्षात कल्याणकारी स्वरूपात अवतरते. कलाकार, शास्त्रज्ञ व विचारवंत यांच्या श्रद्धा विवेकी असतात त्यांच्या कल्पनेतूनच सुंदर कलाकृती, नवे शोध व नवे विचार जन्म घेतात. अविवेकी श्रद्धा घातक कल्पनांना जन्म देतात. मूर्तीमध्ये देव मानणारा माणूस आपला वेळ मूर्तिपूजेत घालवतो. मूर्तीचा कोणी अपमान केल्यास घातपात घडवून आणतो. आपलाच धर्म खरा मानणारा भक्त दुसऱ्या धर्माच्या लोकांना कमी समजतो व त्यांना मारण्यासाठी तयार होतो. श्रद्धांच्या आधारे कल्पकता काम करते म्हणून श्रद्धा तपासून घेणे ही प्राथमिक गरज आहे. यज्ञ केल्याने पाऊस पडेल, नरबळी दिल्याने पुत्रप्राप्ती किंवा धनप्राप्ती होईल अशाप्रकारच्या अविवेकी श्रद्धा अविवेकी कल्पना करायला प्रवृत्त करतात. त्यातूनच असे मूर्खपणाचे व पाशवी प्रकार प्रत्यक्षात घडून येतात! कायद्याचा उपयोग करून हे प्रकार तात्पुरते थांबवता येऊ शकतील. परंतु मूळ अविवेकी श्रद्धा कायम राहतील. त्यासाठी स्वतंत्र विचारांच्या हत्याराने सर्व प्रकारच्या श्रद्धांची तपासणी करण्याची

सवय बालपणापासूनच लावायला हवी. मुले जन्मतःच चिकित्सक असतात. प्रत्येक नवीन गोष्ट समजून घेण्यासाठी ती प्रश्न विचारतात. मोठी माणसे या प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळतात. काही वेळा मोठ्या माणसांनाच उत्तरे ठाऊक नसतात किंवा खरे सांगण्याची त्यांना भीती वाटते. बऱ्याच वेळा मोठ्या माणसाच्या अविवेकी श्रद्धा त्यांना मुलाशी विवेकी वर्तन करू देत नाहीत. मुलांनी आपल्या जन्माविषयी पालकांना विचारले तर त्यांची तोंड गप्प होते. मुलांना उत्तरे तर दिली जात नाहीतच परंतु त्यांना प्रश्न विचारण्यावरही बंदी घातली जाते. त्यातूनच बंदिस्त विचाराची अविवेकी श्रद्धेची पिढी उदयास येते!

## विज्ञानावरील श्रद्धा एक विरोधाभास?

विज्ञानावरील श्रद्धा हादेखील एक विरोधाभास आहे का? ज्या विज्ञानाचा विकास शंका घेण्याच्या व प्रश्न विचारण्याच्या पद्धतीतून होतो तिच्याविषयी श्रद्धा बाळगणे कितपत योग्य आहे?श्रद्धा विवेकी असण्यासाठी स्वतंत्र विचारांची आवश्यकता आहे. त्यामुळे विज्ञानाविषयी देखील विवेकी श्रद्धाच बाळगणे योग्य होईल. विज्ञानात कोणतीही गोष्ट अंतिम मानली जात नाही. सतत चिकित्सा करत राहणे हा विज्ञानाचा गुणधर्म आहे. त्यामुळे विज्ञान हे एक चांगले हत्यार आहे. परंतु ते परिपूर्ण नाही. ही विवेकी श्रद्धा होय. विज्ञानाच्या पलीकडे अध्यात्म आहे असे समजले जाते. परंतु विज्ञानाच्या पलीकडे अधिक प्रगत विज्ञान असते. कदाचित ते अध्यात्म असू शकेल. परंतु आज जे काल्पनिक अध्यात्म सांगितले जाते ते विज्ञानाच्या पुढचे असू शकत नाही. पुढे येणारे प्रगत विज्ञान हे अध्यात्मा सारखेच कदाचित असेल. सापेक्षतावादाच्या सिद्धांता संबंधी बर्ट्रांड रसेल या तत्वज्ञाने असे म्हटले होते की, "सापेक्षतावादाने भौतिक विज्ञानाचा पायाच कमकुवत केला आहे आणि त्याला अध्यात्माच्या जवळ नेले आहे. " बहुतेक शास्त्रज्ञांची अशी श्रद्धा होती की अवकाश, काळ व वस्तुमान ह्या निरपेक्ष गोष्टी

आहेत. विश्वात कुठेही गेले असता त्यांचे मोजमाप बदलत नाही. परंतु सापेक्षतावाद हे सांगतो की, अवकाश, काळ व वस्तुमान हे देखील निरपेक्ष नसून सापेक्ष आहे. ते बदलू शकतात! जसा अवकाश यानाचा वेग वाढत जातो तसा अवकाश यात्रींचा वेळ सावकाश होतो. हा वेग प्रकाश वेगाच्या जितका जवळ जाईल तितका काळाचा वेग कमी कमी होत जाईल. प्रकाश वेगाने प्रवास करणाऱ्या अवकाश यात्रीं साठी काळ थांबलेला असेल. अर्थात प्रकाश वेगाने कोणतेही यान जाऊ शकणार नाही असे सापेक्षतावादच सांगतो. परंतु वेळामध्ये होणारा हा बदल प्रयोगाच्या साह्याने खरा ठरलेला आहे. अचूक वेळ दाखवणारी आण्विक घड्याळे वापरून पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहात ठेवलेले घड्याळ पृथ्वीवरील घड्याळाच्या तुलनेने मागे पडते असे दिसून आलेले आहे.

## श्रद्धा आणि ज्ञानाची पातळी

अनेक वेळा आपल्या श्रद्धा आपल्या त्यावेळच्या ज्ञानाच्या आधारे तयार झालेल्या असतात. ज्ञानाची पातळी वाढली की त्याच श्रद्धा कालबाह्य किंवा अविवेकी ठरू शकतात. विश्वातील सर्व गोष्टींची निर्मिती पंचमहाभूतांतून झाली आहे ही श्रद्धा व मृत्यूनंतर त्या पंचमहाभूतांमध्ये आपण विलीन होतो असे मानणे हे आजच्या काळात अविवेकी म्हणावे लागेल. आज आपल्याला विज्ञानाने दाखवून दिले आहे की सर्व विश्वाची निर्मिती अणुरेणू पासून व त्यामधील इलेक्ट्रॉन प्रोटॉन न्यूट्रॉन या घटकांपासून झालेली आहे. त्याच प्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीने आपल्याला आयुर्वेदातील कफ वात पित्त या त्रिदोषांच्या पलीकडे नेले आहे. आता आपल्याला ठाऊक आहे की काही रोग जंतूंमुळे, तर काही विषाणूंमुळे होतात. तर काही आजार आपल्या जीवनशैलीमुळे होतात. म्हणजे विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपल्या श्रद्धा देखील बदलत गेलेल्या आहेत. पृथ्वी सपाट आहे ही बायबल कालीन श्रद्धा आता कोणी मानत नाही. पृथ्वी गोल असून ती स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरते हे त्या काळात समजण्याच्या पलीकडे होते. आज मात्र आपल्याला त्याबाबतीत काही अनाकलनीय वाटत

नाही. हा श्रद्धेचा एक प्रकारे अधिकाधिक विवेकी होत जाण्याचा प्रवास आहे. म्हणजे श्रद्धेचा विवेकीपणा हा कायमस्वरूपी नसून तो उत्क्रांत होत जाणारा आहे. विज्ञानाच्या आणि मानवाच्या विचारांच्या प्रगती सह ज्या श्रद्धा पुढे जात राहतात त्यांनाच विवेकी म्हणता येईल.

# संपत्ती आणि श्रद्धा

माणसाने तयार केलेली एक विवेकी श्रद्धा म्हणजे पैसे होय. वस्तूच्या बदल्यात वस्तू देण्याघेण्याची बार्टर सिस्टीम वापरण्यापासून सुरुवात करून सतत उत्क्रांत होत जाणारी चलनी नाण्याची श्रद्धा विकसित होत गेली आहे. शंख शिंपल्यांपासून मौल्यवान धातूची नाणे आणि शेवटी कागदी नोटा इथपर्यंतचा प्रवास हा विवेकी श्रद्धेचा आहे. त्याच्याही पुढे प्लास्टिक कार्ड आणि कोणतेही कार्ड न वापरता मोबाईल वरून पैशांची देवाण-घेवाण की कोणत्याही वस्तूची चलन म्हणून गरजच नाही या अवस्थेत आपण पोहोचलो आहोत. ही खरी विवेकी श्रद्धा आहे. धार्मिक श्रद्धांबाबत हे घडून आलेले नाही. ज्याप्रमाणे चलनी नोटा बदलता येतात तसे धार्मिक श्रद्धा देखील बदलत ठेवल्या असत्या तर त्यातून मानसशास्त्राचा उदय झाला असता. कारण धार्मिक श्रद्धा ह्या मनाशी संबंधित आहेत. मनाच्या संगोपनासाठी प्रत्येक धर्माने वेगवेगळ्या गोष्टी सुचवलेल्या आहेत परंतु त्यांची संगती लावली गेली नाही. भक्त मंडळींनी आपलेच तेवढे खरे म्हणून त्याची भक्ती सुरू केली. जशा प्रत्येक देशाच्या नोटा वेगळ्या असल्या तरी एका देशातून दुसऱ्या देशात पैशांची देवाणघेवाण करण्याची सोय आहे

त्याचप्रमाणे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात विचारांची आणि श्रद्धांची देवाणघेवाण करण्याची सोय निर्माण व्हायला पाहिजे. तरच धार्मिक श्रद्धा विवेकी होत जातील. म्हणूनच सर्वांनी सर्व धर्म समजून घेऊन त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. सर्व धर्मातील संत महात्मे यांचे अनुयायी झाले पाहिजे. होते मात्र उलटेच, काही लोक सर्व संत महात्म्यांचे भक्त होतात!

# विवेकावर आधारित धर्म

विवेकी श्रद्धेवर आधारलेला धर्म हा मानवतावादच असू शकतो. या धर्मातील प्रत्येक अनुयायी धर्मप्रसारक असतो. तेथे कोणीही धर्माचा ठेकेदार नसतो की पुरोहित नसतो. त्या धर्माच्या प्रार्थनेसाठी धर्मस्थळ नसते आणि धर्म ग्रंथही नसतात. कवी प्रवीण दवणे यांच्या विचारा प्रमाणे 'ज्यांना मानवाच्या ठाई देव सापडला त्यांच्यासाठी अवघे विश्व हे देवाचे मंदिर आणि अवघा निसर्ग हा धर्मग्रंथ!' विज्ञान म्हणजे देवाचा शब्द आणि वैज्ञानिक म्हणजे देवाची माणसे! विज्ञानाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी करणे ही देवपूजा आणि विज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे प्रार्थना!

# मानवता धर्म व प्रेमभावना

मानवता धर्माचा पाया विवेकी श्रद्धा असतील तरीही प्रेम भावना सर्वांना जोडून ठेवण्यासाठी आवश्यक असेल. श्रद्धा जर विवेकी असतील तर प्रेम अपेक्षा रहित असू शकेल. असे अपेक्षा रहित प्रेम सर्व सृष्टीला जोडून ठेवू शकते. सगळी जीवसृष्टी ही आपलीच रुपे आहेत अशी अढळ श्रद्धा असणे म्हणजेच निरपेक्ष प्रेम होय. विज्ञानाने हे दाखवून दिले आहे की सर्व जीवसृष्टीच्या रचनेमध्ये एकाच प्रकारचे घटक म्हणजे डीएनए आहेत. सर्व सृष्टी अणुरेणू पासून तयार झाली आहे म्हणजे केवळ सजीवच नव्हे, तर अचेतन सृष्टी देखील आपल्याशी एकरूप आहे.

## विवेकी श्रद्धा आणि शासन

विवेकी श्रद्धेच्या वापराने शासनात मानवता आणता येईल का? आजची आपली शासन व्यवस्था लोकशाही मार्गाने तयार होत असली तरीही तिच्या पायाशी अनेक अविवेकी श्रद्धा आहेत. सत्ता मिळवण्यासाठी लोक धडपडतात कारण सत्तेमुळे आपल्याला लोकांवर अधिकार गाजवता येतो, संपत्ती व सुख मिळवता येते ही अविवेकी श्रद्धा आहे. लोकांवर अधिकार गाजवल्या ने सुख मिळत नसून लोकांचे प्रेम मिळवल्याने सुख मिळते ही विवेकी श्रद्धा होय. विवेकी श्रद्धांवर आधारित शासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रथम सर्व समान आहेत ही विवेकी श्रद्धा निर्माण करावी लागेल. त्यामुळे सत्तेचा मोह नाहीसा होऊन प्रेमाची भावना वाढीस लागेल. कोणत्याही प्रकारची उच्चनीचता आणि भेदाभेद नाहीसे झाले तरच समानतेची भावना वाढीस लागेल. अशाच शासन व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिक, अधिकारी व नेता सतत दुसऱ्यांच्या भल्याचा विचार करील. अशा शासन व्यवस्थेमध्ये जास्त कायदेकानून अथवा नियमांची गरज लागणार नाही. कोणत्याही प्रकारच्या कर्मकांडाचे प्रस्थ माजणार नाही. प्रत्येक जन आपल्या आवडीचे काम मन लावून करील, सर्व जोखमीची कामे यंत्रे करतील. सर्व

लोक आरोग्यसंपन्न, सुखसंपन्न व ज्ञानसंपन्न होतील. अर्थातच अशा प्रकारची रचना एकदम सर्वत्र निर्माण होणार नाही. परंतु सुरुवात करता येणे शक्य आहे. ही सुरुवात कोणत्याही आर्थिक स्थितीत असलेल्या लोकांपासून होऊ शकते. गरज आहे ती श्रद्धा मध्ये बदल करण्याची. लोकांच्या श्रद्धा अधिक विवेकी करण्यासाठी मनोवैज्ञानिक संशोधनाची गरज आहे. सर्व जगभर अशा प्रकारच्या संशोधनासाठी जागरुकता तयार झाली पाहिजे. जुने धर्म व पंथ याबाबत फारसे उपयोगाचे नाहीत.

# जागृत मन आणि श्रद्धा

सर्व श्रद्धांचे मूळ आपल्या जागृत(कॉन्शस) मनामध्ये आहे. आपल्या जागृत मनामुळे आपल्याला वर्तमान काळा पलीकडे कल्पना करता येते. मृत्यूची भीती त्यामुळेच जाणवते. आपले सुप्त मन प्राण्यांच्या मनासारखेच वर्तमान काळात असते त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारची श्रद्धा आवश्यक नसते. तसेच पुढे येणाऱ्या काळात काय घडेल याची भीती नसते. प्राण्यांना जशी मृत्यूची भीती नसते तशी जागृत मन ज्यांचे बिघडले आहे त्यांनाही मृत्यूची भीती वाटत नाही. माणसे जेव्हा समाधी अवस्थेत असतात किंवा उन्मादी अवस्थेत असतात तेव्हा त्यांचे जागृत मन काम करीत नाही अशावेळी ते वर्तमान काळात असतात. जोराच्या भांडणांमध्ये, दंगलीमध्ये किंवा युद्धामध्ये लोक उन्मादी अवस्थेत असल्यामुळे त्यांना मृत्यूचे भय वाटत नाही. ही प्रक्रिया समूहामध्ये वेगाने घडून येते म्हणूनच दंगलग्रस्त भागात एकत्र येण्यावर बंदी घातली जाते. माणूस एकटा असताना त्याचे जागृत मन क्रियाशील असते. त्यामुळे त्याला विविध प्रकारच्या भीतीने पछाडलेले असते. त्यावर मात करण्यासाठी तो श्रद्धांचा आधार घेतो. माणसे सण उत्सव साजरे करतात त्यामध्ये देखील एकत्र येऊन जागृत मनाचे कार्य

थांबवण्याची क्रिया केली जाते. परंतु एकांता शिवाय चांगल्या विचारांची निर्मिती होऊ शकत नाही. त्यामुळे काही काळ एकांतात राहण्यासाठी आपल्याजवळ विवेकी श्रद्धा असणे अतिशय गरजेचे आहे.

# जीवन आणि विवेकी श्रद्धा

मृत्यूच्या भीतीवर मात करण्यासाठी माणसे आत्म्याच्या अमरत्वाची श्रद्धा वापरतात. परंतु ही श्रद्धा अविवेकी आहे हे जागृत मनाला माहीत असते. त्यामुळे मृत्यू हा जीवनाचा अंत आहे हे स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. जर बालपणापासूनच हा विवेक बिंबवण्यात आला तर जीवन हीच विवेकी श्रद्धा होईल. त्यामुळे आपले आणि दुसऱ्यांचे जीवन अधिकाधिक सुखी व संपन्न करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू.

बुद्धिमान व जाणीव जागृत असलेल्या मानवाला जगण्यासाठी श्रद्धा निर्माण कराव्या लागल्या आहेत. कागदाला नोटेचे स्वरूप देऊन तिची किंमत खरी मानने ही एक श्रद्धा आहे. या श्रद्धेचा उपयोग करून मोठे व्यवहार केले जातात त्यामुळे या श्रद्धेची उपयुक्तता निर्विवाद आहे. दगडाची किंवा लाकडाची मूर्ती तयार करून तिला देवत्व दिल्याने देवता तयार होते ती माणसाला मानसिक आधार देते म्हणूनच टिकून राहिलेली आहे. ही श्रद्धा माणसाच्या मनाशी निगडित असल्याने तो भावनेचा विषय होतो. जर मूर्तीपूजन केल्याने मनाला आधार मिळत असेल तर ती करायला हरकत नाही. परंतु ती श्रद्धा भावनेत अडकल्यामुळे

विवेकी वागण्याला पायबंद घालते. कागदाची नोट आपले काम करते परंतु विवेकी वागण्याला एवढा मोठा अडथळा निर्माण करत नाही. नोट खोटी आहे हे सिद्ध करता येते. ती रद्द करून तिच्या जागी दुसरी नोट आणता येते. देवाच्या बाबतीत तसे सहजपणे करता येत नाही. वर्षानुवर्षे एकाच प्रकारची मूर्ती माणूस कवटाळून ठेवतो. मूर्ती पूजेतून मिळणारा आधार जर निरपेक्ष मानव प्रेम व सेवा यातून मिळत असेल तर मूर्तीच्या जागी मानवाची स्थापना करता येईल. केवळ मानव सेवाच नव्हे तर सर्व संजीव सृष्टी मध्ये देवत्व भरून राहिले आहे. जे जे भेटे भूत ते मानिजे भगवंत असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनी हीच श्रद्धा मांडली आहे.

# मानवी प्रज्ञा आणि श्रद्धा

अक्षर असलेली मानवी प्रज्ञा नश्वर मानवी देहात वास करते. हा एक मोठा विरोधाभास मानवाला आकलन होत नाही. त्यामुळेच त्याला टिकाऊ वाटणाऱ्या श्रद्धा निर्माण कराव्या लागतात. बाह्य भौतिक जगदेखील नश्वर आहे. कागदाची नोट वस्तू पेक्षा जास्त टिकाऊ आहे. दगडाची मूर्ती जिवंत मानवापेक्षा जास्त काळ सुस्थितीत राहते. त्यामुळे आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी माणसाने श्रद्धांची निर्मिती केली आहे.

# ध्यान आणि वर्तमान काळातील जीवन

मानवी बुद्धिमत्ते मुळे तयार झालेले जागृत मन हे श्रद्धेचा पाया आहे. सुप्त मन म्हणजे सबकॉन्शस माइंड हे सर्व प्राण्यां प्रमाणे मानवालाही आहे. त्यामुळे आपल्या सर्व शरीरावरील नियंत्रण आणि बाह्य गोष्टी मधील कार्य स्वयंचलितपणे चालू असते. जागृत मन म्हणजेच कॉन्शस माईंड हे मानवा मध्येच अधिक प्रगत झालेले आहे. इतर प्राणी आणि मानव यामधील तो मुख्य फरक आहे. इतर प्राण्यांच्या कृतीचे नियंत्रण त्यांचे सुप्त मनच करीत असते. मानव मात्र आपल्या कृतीसाठी जागृत मनाचा वापर करतो त्यामुळेच त्याला निवड करण्याचे आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. जागृत मन नसल्यामुळे प्राणी आपल्या स्वतःसाठी किंवा दुसऱ्यासाठी कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे त्यांची राहणी, खाणे पिणे सहज प्रवृत्तीने ठरत आलेले आहे. पक्षाने घरटे बांधणे हजार वर्षात थोडेसे बदलले असेल, परंतु मानवाने घरबांधणी शंभर वर्षात कितीतरी बदलली आहे. याचे कारण जागृत मनाचा वापर करून मानव आपल्या कल्पकते प्रमाणे निसर्गातील घटक निवडून त्याचा उपयोग करू शकतो. या जागृत मना बरोबरच कल्पकता येते. भूतकाळाची आठवण आणि भविष्यकाळाची

कल्पना करता येते. जेव्हा मानवी जागृत मन भूतकाळ आणि भविष्यकाळ या मध्ये मुक्त संचार करू लागते तेव्हा त्याला श्रद्धेची गरज निर्माण होते. खरोखर अस्तित्वात असलेला काळ वर्तमान काळ असून भूतकाळ आणि भविष्यकाळ हे मानवाच्या जागृत मनातील कल्पनेत असतात. जेव्हा माणूस वर्तमान काळात जगतो तेव्हा तो निश्चिंत असतो. कारण चिंता ह्या भूत आणि भविष्य काळाशी निगडित आहेत. प्राण्यांना चिंता नसते कारण त्यांना जागृत मनच नाही. त्यामुळे शारीरिक वेदनेशिवाय त्यांना इतर कोणतेही काल्पनिक दुःख असू शकत नाही. म्हणूनच मानवाला आनंदाने जगायचे असेल तर वर्तमान काळातच जगले पाहिजे. त्यासाठीच ध्यानधारणेचा म्हणजेच माईंड फुल मेडिटेशनचा मार्ग सुचवला जातो. ज्यावेळी आपण करीत असलेल्या कामात पूर्ण ध्यान देतो तेव्हा देखील आपण वर्तमान काळात जगत असतो. त्यामुळेच पूर्ण ध्यान देऊन केलेले काम हे आनंददायी असते. आपली निरीक्षणशक्ती जर सक्षम ठेवायची असेल तरीदेखील आपले आपल्यासमोर असलेल्या गोष्टींवर पूर्ण ध्यान पाहिजे. म्हणजे आपले काम आपण पूर्ण मन लावून केले तर कोणतेही कर्मकांड किंवा पूजाअर्चा करण्याची गरज नाही. Work is worship असे म्हटले जाते ते त्याच अर्थाने, त्यासाठी आपण जे काम करतो ते आपल्या आवडीचे असायला हवे. प्रत्यक्षात आपण

पोटासाठी किंवा पैसे कमावण्यासाठी आपल्याला आवडत नसते ते काम करतो. त्या कामात आपले पूर्ण लक्ष नसते. आपण भूतकाळाच्या व भविष्यकाळाच्या कल्पनेत व्यग्र असतो. अशा कामात आपली निरीक्षणशक्ती काम करीत नाही तसेच कोणत्याही प्रकारचा आनंद मिळत नाही. म्हणूनच आवडीचे काम निवडून आपले काम मन लावून करणे यातच खरा धर्म आहे.

## जागृत मन आणि काळाचे ज्ञान

भूतकाळ आणि भविष्यकाळ या देखील अविवेकी श्रद्धा आहेत. आपले जागृत मन स्मरणशक्तीचा उपयोग करून भूतकाळ उभा करते आणि कल्पनाशक्तीचा उपयोग करून भविष्यकाळ निर्माण करते. जर जागृत मन नसेल तर भूतकाळ आणि भविष्यकाळाला काहीच अर्थ नाही. ज्यांची स्मरणशक्ती नाहीशी झाली आहे असे रोगी वर्तमान काळातच जगतात. स्मरणशक्तीच्या पूर्ण अभावामुळे अशा रोग्यांना जगणे अशक्य होते. कारण त्यांना भूतकाळातीलच नव्हे तर वर्तमान काळातील गोष्टीही आठवत नाहीत. परंतु स्मरणशक्ती शाबूत असताना वर्तमान काळात जगणे निश्चितच आनंददायक असते. अशाप्रकारच्या जगण्यासाठी घडून गेलेल्या सर्व भावनिक घटना विसरायला हव्यात तसेच भविष्यात आपण काही घडवून आणणार आहोत या भ्रमातून बाहेर पडायला हवे. आपल्या हातात असलेला वर्तमानकाळ आपल्या आवडीचे काम मन लावून करण्यासाठी वापरला तर भविष्य काळासाठी वेगळी योजना करण्याची गरज नाही. मानव सोडून इतर कोणताही प्राणी भूतकाळाची आठवण आणि भविष्यकाळाची चिंता करीत नाही. आपले जागृत मन अधिकाधिक वर्तमान काळासाठी वापरले

तर जीवनात अधिक आनंद आणि सर्जनशीलता निर्माण होऊ शकेल. जगातील अति उच्च दर्जाची कला-साहित्य संगीत आणि विज्ञान या सर्वांची निर्मिती वर्तमान काळात एकाग्र होऊन काम करण्यातून झालेली आहे. आपल्या जागृत मनाची सर्व क्षमता, स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती मध्ये सामावलेली आहे. या दोन्ही शक्ती वर्तमान काळातच वापरल्या तर त्या अतिशय प्रभावीपणे कार्य करू शकतात.

# भविष्यकाळाची कल्पना आणि मृत्यू

भविष्यकाळाच्या कल्पनेत इतर चिंता बरोबर मृत्यूची मोठी चिंता सतत मानवाच्या जागृत मनात वसत असते. जगण्याची सहजप्रवृत्ती सर्व प्राण्यांमध्ये असते परंतु त्यांना मृत्यूची कल्पना करता येत नसल्यामुळे ती चिंता नसते. मानवाला या सहजप्रवृत्ती पलीकडे मृत्यू कल्पनेने समजू शकतो. त्यातून सुटका नाही हे कळल्यानंतर तो अनेक अविवेकी श्रद्धा निर्माण करतो. आत्म्याचे अमरत्व आणि पुनर्जन्म या श्रद्धा त्याला मृत्युच्या भीतीवर मात करण्यासाठी मदत करतात. परंतु जागृत मनातील चिकित्सक बुद्धी वापरली गेल्यास त्या श्रद्धांमधील फोलपणा उघडा पडतो. हळूहळू मानवी देहाची वयोमर्यादा वाढत चाललेली आहे. विज्ञानाने निर्माण केलेल्या आरोग्य सुविधांमुळे माणसाला अकाली मृत्यू पासून काही प्रमाणात मुक्ती मिळाली आहे. वृद्धावस्थेपर्यंत क्रियाशील राहिल्यामुळे समाधानाने मृत्यू पत्करण्याची मनाची तयारी होऊ शकते. त्यामुळे अमरत्व किंवा पुनर्जन्माची इच्छा फारशी राहत नाही. सेवा निवृत्तीचे जीवन जगत असताना अनेकांना आणखीन का जगावे हा प्रश्न पडतो. त्यामुळे जगण्याची इच्छा संपलेली असते. अशावेळी आत्म्याचे अमरत्व किंवा पुनर्जन्म या अविवेकी श्रद्धांची

आवश्यकता वाटत नाही. ज्यांना जगण्याची आवश्यकता आहे त्यांना विज्ञानाच्या मदतीने अधिक काळ जगता येऊ शकेल. कालांतराने मृत्यूही ऐच्छिक गोष्ट होईल! आजारामुळे आणि अपघातामुळे होणारे मृत्यू पूर्णपणे टाळता आल्यास त्याची भीती नाहीशी होईल आणि या अविवेकी श्रद्धा देखील नाहीशा होतील. बहुतेक सर्व धर्मांचे मूळ हे मृत्यूच्या भीतीमध्ये असल्यामुळे ही भीती नाहीशी झाल्यास धर्मांचा अवतारही संपेल! राजवाडे आणि किल्ले आज-काल प्रेक्षणीय स्थळे झाली आहेत तशीच कालांतराने मंदिरे व तीर्थस्थाने यांची अवस्था होईल याविषयी शंका नसावी!

## जागृत मन आणि स्वातंत्र्य

मानवाला त्याच्या जागृत मनामुळे स्वतंत्र अस्तित्व आले आहे. परंतु प्राणी म्हणून तो जीवसृष्टीचा एक भाग आहे. जसे प्राण्यांच्या जाती मध्ये एखाद्या प्राण्याचे जीवन हा त्या जातिसंस्थेचा भाग असतो. या प्राण्यांच्या जीवन-मरणातून त्याच्या जाती संस्थेमध्ये अनुवंशिक बदल होत राहतात ते त्या जातीला टिकवण्यासाठी मदत करतात. मानव मात्र त्याच्या जागृत मनामुळे निसर्ग नियमाने होणाऱ्या जाती संरक्षणापेक्षा वैयक्तिक जीव संरक्षणावर भर देतो. त्यामुळेच जाती संस्थेच्या मुळावर येणाऱ्या अनेक समस्या उद्भवतात. वैयक्तिक आयुर्मर्यादा वाढवल्यामुळे लोकसंख्यावाढीचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. त्यावर उपाय म्हणून संतती नियोजन करणे भाग पडत आहे. जेव्हा मानवी आयुर्मान कमी होते तेव्हा जन्ममरणाचे चक्र जेवढे जलद फिरत होते तेवढे ते आता फिरत नाही. त्यामुळे पर्यावरणातील बदलाला तोंड देण्याची क्षमता मानवाच्या जातीची कमी होत गेलेली आहे. कीटक जातीतील प्राणी ह्या पृथ्वीवर सर्वात अधिक काळ टिकून आहेत. याचे कारण त्यांचे जीवन चक्र खूप जलद फिरते. पर्यावरणातील बदल व विषारी पदार्थ अशा गोष्टींना तोंड देण्यासाठी त्यांच्यामध्ये

जनुकीय बदल वेगाने होतात. याचा अर्थ आपण मानवाची आयुर्मर्यादा जेवढी वाढवू तेवढी मानव जातीची पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता कमी होत जाईल. आणि संपूर्ण जातीचे आयुष्य घटेल. विज्ञाना मुळेच निर्माण झालेल्या या नवनवीन समस्या आहेत. अर्थातच विज्ञानाच्या मदतीने या समस्यावर मानव मात करील!

## जीवन आणि जागृतीचा काळ

मानवाच्या दृष्टीने जीवन म्हणजे जागृतीचा काळ होईल. हा आपल्या जागृत मनाचा चमत्कार आहे. तो निसर्गाच्या कोणत्या नियमाने घडून आलेला आहे ते अजून आपल्याला कळलेले नाही. जीवना नंतरच्या जीवनावर विचार करणे हा अविवेक आहे. माझ्या असण्याचा संबंध माझ्या विचार करण्याशी आहे. डेकार्टने म्हटल्याप्रमाणे 'मी आहे कारण मी विचार करतो. ' विचारांची क्षमता संपली म्हणजे माणसाचा अंत झाला. मग शरीर जिवंत असेल तरीही ही त्याला अर्थ नाही. त्यामुळे जागृत अवस्था म्हणजेच ज्योतीचे ज्वलन होय. एका ज्योतीने दुसरी ज्योत पेटवता येते तसे आपले विचार करणारे मन दुसऱ्याला विचार देते आणि ते मानवजातीच्या अंतापर्यंत टिकून राहतील. म्हणजे विचार मरत नाही. मर्त्य आहे ते शरीर, जागृत मनाची ज्योत अमर आहे! मानवी जीवनावरील श्रद्धा ही विवेकी श्रद्धा होईल. माझे असणे हेच माझ्या दृष्टीने अंतिम सत्य आहे. माझ्या शरीराचे नसणे हे सत्य असू शकत नाही. शरीर हे प्राणीरूप आहे. अनेक प्राणी जन्माला येतात व मरतात. प्राण्यांच्या दृष्टीने एका प्राण्याला काहीही मिळत नसून जात टिकून राहणे निसर्गाच्या दृष्टीने महत्त्वाचे समजले जाते. कमी

आयुर्मर्यादा असलेल्या जलद मृत्यू होणाऱ्या प्राणी जाती जास्त टिकून राहतात. दीर्घायुष्य असणाऱ्या प्राणी प्रजाती लवकर नाहीशा होतात. त्यांना पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी आपल्या जनुकांमध्ये बदल करायला वेळ मिळत नाही. अनेक महाकाय व दीर्घायु प्राणी नष्ट झाले. परंतु लहान कीटक अल्पायुषी असूनही टिकून आहेत.

मानवाला लाभलेली ही जागृत मनाची देणगी हेच मानवांतले दैवत्व आहे. जागृत मनाचे सामर्थ्य अफाट आहे. जागृत मनानेच शोधून काढलेली यंत्रे आणि उपकरणे आपल्याला चमत्काराच्या पलीकडे घेऊन जातात. जागृत मनाने आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियांच्या पलीकडचे ज्ञान प्राप्त करून दिले आहे. डोळ्याला सपाट दिसणारी पृथ्वी गोलाकार आहे हे जागृत मनाला समजू शकते. अचल वाटणारा हा पृथ्वीचा गोल अनंत अवकाशात स्वतःभोवती आणि सूर्याभोवती सतत भ्रमण करीत आहे हे आपल्याला ह्या जागृत मनानेच कळते. आता तर आपण कोट्यावधी प्रकाशवर्षे दूर असलेल्या ताऱ्यांचा आणि कृष्णविवरांचा शोध घेऊ शकतो. आणि या सर्व गोष्टी आपल्याला चमत्कार वाटत नाहीत. धर्मात सांगितलेल्या काल्पनिक चमत्काराच्या गोष्टी खऱ्या मानून आपण त्यांची पूजा करत असतो. खरी विवेकी श्रद्धा ही आहे की आपले जागृत मन आणि विचार

करण्याची क्षमता हाच खरा देव व खरा आत्मा आहे. त्यांचे अस्तित्व मानव जाती च्या सोबतच कायम राहणार आहे. साक्रेटीस, पायथॅगोरस व आर्किमिडीज शरीराने मरण पावले आहेत परंतु त्यांचे विचार जिवंत आहेत आणि मानवजातीच्या अंतापर्यंत जिवंत राहणार आहेत. कदाचित त्यांच्या सारख्यांच्या विचारांमुळेच मानव जातीला अमरत्व प्राप्त होणार आहे.

# मानवी जागृती आणि मृत्यू

मानवाला जागृतावस्था आल्यापासून मृत्यूचे गूढ जाणवायला लागले आहे. लहान मुलांना समज आली की पहिली जाणीव मृत्यूची होते. जन्माला येणे व जीवन जगणे यात माणसाला काहीच अद्भुत वाटत नाही. मृत्यू आणि त्यानंतर होणारी शरीराची अवस्था माणसाला असह्य वाटते. आपल्या विचार करण्याची व समजण्याची क्षमता मृत्यूच्या पलीकडे जाऊ शकत नाही हे माणसाला चांगले समजले आहे. त्यामुळे मृत्यू नंतरच्या अवस्थेची तो कल्पना करतो व त्यातून वेगवेगळी तत्वज्ञाने आणि धर्मकल्पना निर्माण होतात. आधुनिक विज्ञाना प्रमाणे सर्व सजीव सृष्टी जिवंत असण्यात काही रासायनिक क्रिया काम करतात. जसे एखादे यंत्र चालण्यासाठी त्यामध्ये काही भौतिक क्रिया कार्य करीत असतात. त्या क्रिया बंद पडल्या की, यंत्र बंद पडते व त्याचे कार्य थांबते. त्याचप्रमाणे मानवाच्या शरीरातील रासायनिक क्रिया थांबल्या आणि त्यापासून निर्माण होणारी विद्युत ऊर्जा नाहीशी झाली की त्याची सजीव अवस्था आणि त्याच्या मनाची जागृत अवस्था दोन्ही नष्ट होतात. यंत्रा मधील सर्व घटक निर्जीव असतात. सजीवांमधील सर्व घटक देखील सजीव पेशींपासून तयार झालेले

असतात. त्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे शक्य होते. परंतु सजीवांचे त्यांच्या मृत्यूनंतर पुन्हा जिवंत होणे अशक्य असते. या सर्व गोष्टी विज्ञानाने समजल्या तरीही मानवी जागृत मन आपल्या अस्तित्वाचा अंत समजू शकत नाही. अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आपल्या मनाला सहज समजत नाहीत. उदाहरणार्थ पृथ्वी गोल आहे ती स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरते हे आपल्याला सहज पटू शकत नाही कारण आपल्या अनुभवातून पृथ्वीचा सपाटपणा आणि स्थीर अवस्था परिचित झालेली असते. आपले जागृत मन अनुभवाच्या आधारे जगत असते. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभवाच्या पलीकडे असलेल्या विज्ञानाच्या आधारे प्रयोगाने सिद्ध झालेल्या गोष्टी मानाव्याच लागतात. तशीच मृत्यू ही गोष्ट देखील मानवाला मान्य करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. मृत्यू हाच अंत मान्य केला आणि आत्मा व पुनर्जन्म नाकारला तर माणूस या जन्मातच जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे वागून आपले व दुसऱ्यांचे जीवन सुखी करू शकेल. अनेक प्रकारच्या स्वार्थी मोहापासून तो अलिप्त राहील.

## सत्य काय? जीवन की मृत्यू?

जीवन हे सत्य आहे असे मानने ही विवेकी श्रद्धा आहे. जसे प्रकाश हे सत्य असून अंधार हा त्याचा अभाव आहे. त्याचप्रमाणे मृत्यू हा जीवनाचा अभाव आहे. जीवनाची सत्यता वर्तमान काळातच आहे. भूतकाळ आणि भविष्यकाळाला अस्तित्व नाही. म्हणून वर्तमान काळात जगणे आणि आणि त्यालाच जीवन मानणे हे विवेकी आहे. अर्थात वर्तमानकाळात जगण्यासाठी आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या सर्व घटना आणि अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तू यावर आपले पूर्ण ध्यान पाहिजे. आपल्या आवडीचे काम आपण मन लावून करीत असतो तेव्हाही आपण वर्तमानकाळातच जगत असतो त्यामुळे ते आपल्याला आनंददायी वाटते. अशाप्रकारे वर्तमान काळात जगणे आपल्याला आपल्या जागृत मनाच्या पूर्व संस्कारामुळे शक्य होत नाही. म्हणूनच मुलांना वाढवताना त्यांना भूतकाळातील आणि भविष्यकाळातील गोष्टीत न रमवता वर्तमान काळातच जगायला शिकवले पाहिजे. भीती व चिंता या भूतकाळ भविष्य काळाच्या कल्पनेशी जोडलेल्या आहेत. मुलांना सतत आनंददायी म्हणजे त्यांना आवडणाऱ्या कृतिशी जोडून ठेवल्यास त्यांना वर्तमान काळात जगायची सवय लागेल. वर्तमान काळात

जगणाऱ्यांसाठी मृत्यूचे अस्तित्व नाहीसे होते. जागृत मनाचा उपयोग अधिक सर्जनशील पणे करता येईल. ज्यावेळी जागृत मन वर्तमान काळात वापरले जाते तेव्हा ते सुप्त मनाशी जोडून कार्य करते. त्यालाच आपण उस्फुर्तता म्हणतो!कवीच्या मुखातून बाहेर पडणारे काव्य, वक्त्याच्या मुखातून बाहेर पडणारे विचार आणि चित्रकाराच्या कुंचल्यातून प्रकटन आहे चित्र हे उस्फुर्त असेल तरच उत्तम असते!

## आशावाद: मनाची एक अवस्था

प आशावादी आणि निराशावादी या देखील मानवी मनाच्या अवस्था आहेत. मानवी जीवन आणि सर्व जग आनंदी आहे अशी श्रद्धा असेल तर आपण आशावादी असतो आणि सर्वत्र दुःख आहे अशी श्रद्धा असेल तर माणूस निराशावादी असतो. आशावादी असणे ही विवेकी श्रद्धा आहे. कारण त्या श्रद्धेमुळे आपल्याला जीवन जगण्या मधला आनंद उपभोगता येतो आणि चांगली कामे करता येतात. निराशावादी असणे ही अविवेकी श्रद्धा आहे. कारण तिच्यामुळे जीवन दु:खमय होऊन जाते. कोणतेही चांगले काम करावेसे वाटत नाही कारण ते निरर्थक आहे असे वाटते. आशावादी असण्याचा आणखीन एक फायदा म्हणजे आपण आरोग्यसंपन्न राहतो. जग अधिक सुखी व समृद्ध व्हावे म्हणून प्रयत्न करतो.

# संग्रह प्रवृत्ती आणि मुबलकता

विश्वामध्ये मुबलक साधनसंपत्ती व सौख्य भरून राहिले आहे. कितीही वापरले तरी ते संपणार नाही. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा साठा करून ठेवण्याची गरज नाही. साठा केलेल्या गोष्टी वापरल्या जात नाहीत. त्यांचा उपयोग होत नाही तर त्या नष्ट होतात. म्हणून विश्वाच्या विपुलतेवर असणारी श्रद्धा ही विवेकी होईल! विपुलतेवर श्रद्धा असणे म्हणजे साधन संपत्तीची नासधूस करणे नव्हे किंवा उधळपट्टी करणे नव्हे. जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी हवा, पाणी, अन्न आणि निवारा यांनाच खरे संपत्ती मूल्य आहे. बाकीची संपत्ती ही प्रतीकात्मक आहे. खरी संपत्ती नसेल तर बाकीच्या संपत्तीची किंमत शून्य आहे. सर्वांना सहज उपलब्ध होईल असे शुद्ध हवा, पाणी, अन्न आणि आरोग्यपूर्ण निवारा उपलब्ध करून देणे ही विवेकी कृती ठरेल. सर्वांना आरोग्य व शिक्षण विनामूल्य उपलब्ध झाले तर जगातील बहुतेक सर्व दुःखे नष्ट होतील.

# विवेकी श्रद्धांचा अविवेकी वापर

काही श्रद्धा विवेकी असूनही त्या विवेकाने वापरल्या जातातच असे नाही. पैसा अशी एक श्रद्धा आहे. कागदाच्या नोटा मधील सामर्थ्य त्यांच्यावरील श्रद्धेमुळे निर्माण होते. मानवी व्यवहारासाठी ती श्रद्धा अतिशय उपयुक्त ठरलेली आहे. परंतु काही लोक या सामर्थ्याचा उपयोग अविवेकी कामासाठी करतात. भ्रष्टाचार हा या श्रद्धेचा अविवेकी उपयोग आहे. दुसऱ्या लोकांना लुटणे किंवा लोकांची आर्थिक पिळवणूक करणे हा देखील असाच एक प्रकार आहे. हाताशी पैसे नसल्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण, आरोग्य उपलब्ध न होणे हा देखील पैशाचा अविवेकी परिणाम आहे. म्हणूनच शासनाने ही आर्थिक सत्ता कोणत्या प्रकारे विवेकी करता येईल ते पाहिले पाहिजे. अर्थशास्त्राचा व्यवस्थित अभ्यास केला जातो आणि संशोधनही केले जाते. आर्थिक व्यवहार सांभाळणाऱ्या बँकेसारख्या संस्थाही कार्यरत आहेत. असे असूनही ही अत्यंत उपयुक्त श्रद्धा अविवेकी पद्धतीने वापरली जाते. याचा आपल्याला अनुभव येतो. धार्मिक श्रद्धा मात्र कोणत्याही अभ्यासाला संशोधनाला आणि चिकित्सेला सामोऱ्या जात नाहीत. त्यामुळे त्या विवेकशील होण्याची शक्यता

नाहीशी होते. त्याउलट विज्ञानातील श्रद्धा प्रत्येक पायरीला तपासून पाहिल्या जातात आणि त्यांच्यात बदल केला जातो त्यामुळेच विज्ञान हे अधिकाधिक विकसित होत गेलेले आहे.

## श्रद्धा आणि वैज्ञानिक पद्धती

आपल्या इतर श्रद्धाही विज्ञाना प्रमाणेच विकसित होत राहाव्यात असे वाटत असेल, तर त्यांच्यासाठी वैज्ञानिक पद्धतच वापरली पाहिजे. हळूहळू सगळ्या विषयाच्या अभ्यासात वैज्ञानिक पद्धतीने प्रवेश केलेला आहे. इतिहास, भूगोल, भाषा व कला या सारख्या विषयात वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास व संशोधनावर भर दिला जात आहे. मागे राहिलेला आहे तो फक्त धर्म! सगळ्या धर्मांचा एकत्र अभ्यास करून त्याला वैज्ञानिक पद्धतीची दिशा दिली गेली तर त्याचा मानवतेसाठी फार मोठा उपयोग होऊ शकतो.

# श्रद्धा आणि संमोहन

संमोहन हा श्रद्धेचा एक प्रकार आहे. तो विवेकी किंवा अविवेकी दोन्ही दोन्ही पद्धतीने वापरला जाऊ शकतो. काही लोक आपल्या बोलण्याने दुसऱ्याला सम्मोहित करू शकतात. अशाप्रकारे संमोहित करून दुसऱ्यांची दुःखे कमी करणे हे विवेकी आहे. परंतु त्याच संमोहनाचा उपयोग करून दुसऱ्याला फसवता येते किंवा संकटातही टाकता येते. हे अविवेकी आहे. वैद्यकशास्त्रात देखील वेदना कमी करण्यासाठी तसेच आजाराच्या भीतीवर मात करण्यासाठी संमोहनाचा उपयोग केला जातो. स्वयम् संमोहन वापरून आपण आपल्या स्वभावातील दोषावर मात करू शकतो. संमोहित करण्याचे कार्य आपल्या सुप्त मनाच्या पातळीवर चालते. जागृत मनाचा उपयोग करून सुप्त मनाला काही सूचना दिल्या जातात आणि त्याप्रमाणे आपले सुप्त मन त्या सूचना अमलात आणते. सुप्त मनाचे कार्य स्वयंचलित असून ते आपल्या संपूर्ण शरीरावर आणि मनावर नियंत्रण करते. त्यामुळे संमोहनाचा उपयोग करून अनेक वाईट सवयीतून सुटका करून घेता येते. अनेक लोकांना धूम्रपान मद्यपान यासारख्या सवयी पासून मुक्ती मिळाली आहे.

संमोहना मध्ये देखील श्रद्धा कार्य करते. परसंमोहन आणि स्वयं संमोहन दोन्हीमध्ये ज्या लोकांना संमोहना बद्दल मनामध्ये श्रद्धा असते त्यांच्याच सुप्त मनाचे कार्य त्यासाठी उपयोगी पडते. येथे पुन्हा विवेकी आणि अविवेकी श्रद्धा दिसून येतात. आपल्या शरीर आणि मनावर चांगल्या गोष्टी घडवून आणणारे संमोहन हे विवेकी श्रद्धेमुळे येते तर विघातक परिणाम घडवून आणणारे संमोहन हे अविवेकी श्रद्धेमुळे येते. अनेक प्रकारच्या पूजा, प्रार्थना आणि कर्मकांडे या मधून देखील संमोहन घडून येते आणि आपले सुप्त मन त्यादिशेने कार्य करते. सुप्त मनाचे सामर्थ्य ओळखून सकारात्मक सूचनांचा उपयोग केल्यास संमोहनाच्या सहाय्याने अनेक आजार व वाईट सवयी नष्ट करता येतील. त्यामुळे औपचारिक औषधोपचार कमी प्रमाणात वापरावा लागेल.

# श्रद्धा आणि जीवन

माणसाचे जीवन आनंदी उत्साही आहे ही दुःखी निरुत्साही आहे हे त्याच्या श्रद्धांवर अवलंबून असते. सर्व जग व सर्व माणसे चांगली आहेत आपण एकमेकांच्या मदतीने सुखाने जगू शकतो ही विवेकी श्रद्धा आहे. त्यामुळेच आपण सुखाने जगू शकतो. परंतु सगळे जग वाईट आहे आणि सगळे आपल्या वाईटावर असून आपल्याला त्रास देत आहेत ही अविवेकी श्रद्धा आहे. अशी श्रद्धा असलेले लोक स्वतः सुखाने जगत नाहीत व दुसऱ्यांनाही जगू देत नाहीत. अशा अनेक अविवेकी श्रद्धा आपल्या सहवासात येणाऱ्या पालकांमुळे आणि जवळपासच्या लोकांमुळे निर्माण होतात. सतत मुलांचे दोष दाखवीत राहिल्याने, तसेच त्यांना उपदेशाचे डोस देत राहिल्याने अशा श्रद्धा तयार व्हायला मदत होते. मुलांना सतत कौतुकाने वाढवले तर त्यांच्या श्रद्धा सकारात्मक व विवेकी होऊ शकतात.

बहुसंख्य देवभोळ्या लोकांची अशी श्रद्धा असते की ज्या काही चांगल्या गोष्टी आपल्या जीवनात घडतात त्या देव घडवून आणतो आणि वाईट गोष्टी सैतान घडवून आणतो. आपला जन्म देवाच्या कृपेने होतो. तर मृत्यू सैताना मुळे होतो. निरोगी आयुष्य

देवाच्या कृपेने लाभते तर सैताना मुळे आपण आजारी पडतो. अशा प्रकारच्या सोप्या श्रद्धा मुळे फारसा विचार करावा लागत नाही. त्याचप्रमाणे चांगले जगणे किंवा वाईट टाळणे यासाठी काही प्रयत्न करायची गरज लागत नाही. वाईट गोष्ट घडल्यावर फक्त देवाची प्रार्थना किंवा पूजाअर्चा करावी म्हणजे तो त्यातून सुटका करील. काही लोक देवाची पूजा करण्याएवजी सरळ सैतानाची देखील पूजा करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना वाटते देव जर प्रसन्न होऊ शकतो तर सैतान देखील प्रसन्न होऊ शकेल. या श्रद्धा खूपच बालिश असल्या तरी त्या खऱ्या मानणारे लोक पुष्कळ आहेत. असे लोक सांभाळणे धार्मिक पुढाऱ्यांना आणि राजकारणी लोकांनाही सोपे वाटते. त्यामुळे अशाप्रकारची कर्मकांडे पढवण्याचे काम धार्मिक पुढारी करतात व त्यांचा उपयोग करून घेण्याचे काम राजकीय पुढारी करतात. नागसर्प बळीसारखे पूजा प्रकार पुरोहित शोधून काढतात. राजकीय पुढारी लोकांना तीर्थयात्रेसाठी जायला मदत करतात. अशा श्रद्धांमुळे लोकांना खूश करणे सोपे होते. परंतु त्या अविवेकी श्रद्धा लोकशाहीच्या मुळावर येतात! कोणतेही चांगले लोकोपयोगी काम न करता केवळ धार्मिक भावना जोपासून पुढारी निवडून येतात. आपल्या स्वार्थासाठी सत्ता राबवतात. रस्त्यावरील खड्डे, शिक्षणाची अनास्था, महागाई, भ्रष्टाचार, आरोग्याची दुरावस्था या पेक्षा मंदिर मस्जिद वादातच निवडणुका जिंकल्या

जातात. लोकशाहीमध्ये भावनिक विषय निवडणुका साठी वापरले जाऊ नयेत हा संकेत राजकारणी लोकच पायदळी तुडवतात हे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे. भावनिक आवाहना मधूनच हिटलर सारखी हुकूमशाही व्यक्ती सर्वाधिकारी होऊ शकते. यासाठी गरज आहे स्वतंत्रपणे विचार करू शकणाऱ्या नागरिकांची आणि त्यांना तसे शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची!

## श्रद्धांसाठी संशोधन

श्रद्धा च्या आधाराने सर्व मानवी जीवन काम करीत असेल तर त्यांच्यावर विशेष संशोधन होणे आवश्यक आहे. सगळी मानवी संस्कृतीची उत्क्रांती वेगवेगळया श्रद्धांचा आधाराने झालेली आहे. या सर्व श्रद्धा वेगवेगळया विचारवंतांनी आणि धर्म संस्थापकांनी वेगवेगळया हेतूने तयार केलेल्या आहेत. त्यामध्ये सुसूत्रता नाही. एका देशातील आणि एका विशिष्ट समाजातील श्रद्धा जगभर तशाच प्रकारे वापरण्याचे दुष्परिणाम आपल्याला दिसत आहेत. म्हणजे एखाद्या संस्कृतीत असलेली विवेकी श्रद्धा दुसऱ्या संस्कृतीत अविवेकी ठरू शकते. म्हणजे श्रद्धेच्या बाबतीत देखील सापेक्षता असते. गरम देशात दररोज अंघोळ करावी लागते. कारण तिथे खूप घाम येतो. परंतु दररोज अंघोळ करणे ही श्रद्धा झाली तर थंड प्रदेशात गेल्या नंतर देखील लोक तसेच वागतात. तेथे घाम येत नाही म्हणून रोज आंघोळ करण्याची गरज नसते. म्हणजे गरम देशामध्ये जी श्रद्धा विवेकी असते ती थंड देशात अविवेकी होते. श्रद्धा ही विवेकी की अविवेकी आहे ते तिच्यामुळे समाजावर व व्यक्तीवर होणाऱ्या परिणामावरून ठरते. लोकांना दुःखी, निरुत्साही

आणि अवनत करणाऱ्या श्रद्धा या अविवेकी तर आनंदी, उत्साही आणि उन्नत करणाऱ्या श्रद्धा या विवेकी होत.

# मानवी बुद्धिमत्ता आणि श्रद्धा

मानवी बुद्धिमत्ता श्रद्धांचे उगमस्थान आहे किंबहुना मानवी बुद्धिमत्तेचे श्रद्धा हे पाय आहेत. कोणतीही गोष्ट समजून घेण्यासाठी आपली बुद्धिमत्ता श्रद्धेचा उपयोग करत असते. अगदी आपल्या ज्ञानेंद्रिया द्वारे मिळणारी माहिती देखील श्रद्धांचा आधारेच तपासून साठवली जाते. त्यामुळे एकच गोष्ट वेगवेगळया लोकांना वेगवेगळी दिसते, ऐकू येते व जाणवते. एखादे सुंदर दृश्य सगळयांनाच सारखे मनमोहक वाटत नाही. एखादे चित्र किंवा शिल्प या कलेची जाण असलेल्या कलाकाराला जेवढे सुंदर वाटते एवढे सर्वसामान्य माणसांना वाटेल असे नाही. आपल्या डोळयासमोर असलेल्या वस्तूची प्रतिमा आपल्या मेंदूमध्ये पोहोचल्यानंतर मेंदू तिला जो अर्थ देतो तो आपल्या पूर्वानुभवाशी निगडित असतो. त्यामुळे समोर असते ती वस्तू आपल्याला दिसत नसून आपला मेंदू ठरवतो ती वस्तु आपण पाहत असतो. याचे चांगले उदाहरण म्हणजे ढगांमध्ये होणारे देवाचे दर्शन. काही वेळा असे देवाची दर्शन भाजीपाल्याच्या आकारातून आणि रस्त्यावर पावसाळयात पडणाऱ्या खड्ड्यातून देखील होऊ शकते! एखाद्या इंग्रजी न येणाऱ्या माणसाला देर वॉज बँकर असे सांगितले तर त्याला

दरवाजा बंद कर असे ऐकू येते. कारण त्याच्या मनातील प्रतिमा ह्या सर्व मराठी शब्दांच्या आवाजावर आधारलेल्या असतात. यावरून असे दिसते की आपली बुद्धिमत्ता पूर्वानुभव आणि त्यावरून तयार झालेल्या श्रद्धा यांच्या आधारे काम करते. म्हणूनच बुद्धिमत्तेचे सामर्थ्य वाढवण्यासाठी आपले पूर्वानुभव आणि त्या आधारित तयार होणाऱ्या श्रद्धा अधिक विवेकी कशा करता येतील हे पाहिले पाहिजे आणि त्यासाठी स्वतंत्र चिकित्सक विचार वाढवले पाहिजेत. जिज्ञासेला वाव देऊन प्रश्न विचारण्यासाठी स्वातंत्र्य असेल तेथेच स्वतंत्र विचार वाढू शकतात!

# श्रद्धा आणि प्रतीके

आपण आपल्या श्रद्धे प्रमाणे प्रतीके तयार करतो. सरस्वती विद्येचे आणि लक्ष्मी हे संपत्तीचे प्रतीक मानून श्रद्धेने त्यांची पूजा करतो. सरस्वतीची पूजा केल्यामुळे आपल्याला विद्या प्राप्त होईल आणि लक्ष्मीच्या पूजनाने लक्ष्मी प्राप्त होईल ही आपली श्रद्धा असते. त्यामुळे विद्या प्राप्त करण्यासाठी उपासना करावी लागते म्हणजे अभ्यास करावा लागतो त्याऐवजी फक्त पुजा प्रार्थना केली जाते. संपत्ती प्राप्त करण्यासाठी कष्ट आणि उद्योग करावा लागतो, तसे न करता केवळ लक्ष्मीपूजन केले जाते. अशाप्रकारच्या अविवेकी श्रद्धा आपल्याला तात्पुरते समाधान देतात. खरोखरीची विद्या प्राप्त करण्यासाठी किंवा संपत्ती मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी करण्यावर असलेली श्रद्धा ही विवेकी श्रद्धा होय. विद्या, बल, कौशल्य, ज्ञान व संपत्ती यांच्या प्राप्तीसाठी योग्य मार्गाचा अवलंब करण्यावरची श्रद्धा हीच विवेकी श्रद्धा आहे. अशी श्रद्धा निर्माण करण्यासाठी प्रतीकात्मक देवतांच्या मूर्ती तयार करण्याऐवजी त्या त्या क्षेत्रातील अभ्यासाची केंद्रे तयार करायला हवी. जसे विद्येच्या अभ्यासासाठी शाळा, वाचनालये. बळाच्या अभ्यासासाठी व्यायाम शाळा, क्रीडांगणे आणि संपत्तीच्या

अभ्यासासाठी उद्योगकेंद्रे निर्माण व्हायला पाहिजेत. अशा क्षेत्रात ज्यांनी उत्तुंग यश मिळवलेले आहे त्यांचे कौतुक करणे व त्यांनी स्थापन केलेल्या मानदंडाच्या पुढे जाण्याचे ध्येय ठेवणे ही विवेकी श्रद्धा होय.

## आपले जन्मजात गुण आणि श्रद्धा

आपण आपल्या मध्ये असलेल्या जन्मजात गुणांवर श्रद्धा ठेवून काम करीत राहिल्यास यशाची शिखरे गाठू शकतो. आपल्या कानाला संगीताची गोडी वाटत असेल तर संगीत क्षेत्रामध्ये आपण यश मिळवू शकतो. आपली जीभ आणि नाक अन्नाची चव आणि वास यात रस घेत असेल तर आपण पाककलेमध्ये पारंगत होऊ शकतो. स्वतःमधील या गुणावर श्रद्धा ठेवणारा आपल्या क्षेत्रामध्ये अत्युच्च पातळी गाठतो. परंतु आपल्यामध्ये असलेल्या गुणांकडे दुर्लक्ष करून केवळ प्रसिद्धी किंवा संपत्ती मिळवण्यासाठी दुसऱ्याच गोष्टींच्या मागे लागून आयुष्य वाया घालवणारे सत्ता, संपत्ती व प्रसिद्धी या अविवेकी श्रद्धेला बळी पडतात. म्हणूनच द एलेमेंट या पुस्तकात केन रोबिन्सन यांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या मध्ये असलेल्या चांगल्या गुणाचा घटक(एलेमेंट) शोधून त्यावरच काम करणे हे यशाचे गमक आहे. आपल्या शालेय शिक्षणात नेमके याच गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांच्या आवडीचा घटक विचारात न घेता भाराभर विषय शिकवले जातात जे त्याच्या आकलनाच्या पलीकडे असतात. सॅडबॅरी व्हॅलीमध्ये केलेल्या प्रयोगा प्रमाणे शाळेमध्ये मुलांना शिकवण्या ऐवजी शिकण्यासाठी आवश्यक

असलेल्या सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यांना आवडेल ते काम त्यांनी करावे व त्यातूनच शिकावे असे वातावरण शाळेत पाहिजे. जेव्हा त्यांना गरज वाटेल तेव्हा त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक उपलब्ध असले पाहिजेत. तसेच सर्व विषयावरची ची माहिती देऊ शकतील अशी पुस्तके व इंटरनेटचे माध्यम उपलब्ध असले पाहिजे. जेव्हा मुलांना स्वतः शिकण्याची गरज वाटते त्यावेळी ती अतिशय जलद शिकतात. वाचणे लिहिणे शिकण्यासाठी जेव्हा गरज वाटते तेव्हा ती फार कमी वेळात शिकतात. गणितासारख्या विषयाचा वर्षभराचा अभ्यास एक दोन महिन्यात पूर्ण करतात.

श्रद्धा ही मानवी मनाला स्थैर्य देते. भोवतालचे सर्व जग अस्थीर आहे. पृथ्वीचे वातावरण बदलते आहे. कधीही वादळी वारे वाहू शकतात. पृथ्वीचा पृष्ठभाग देखील अचल नाही. कधीही भूकंप होऊ शकतो. मानवी जीवन देखील सुरक्षित नाही. कधीही अपघात होऊ शकतो. त्यातही एकटेपणाची भावना भूत भविष्याच्या जाणिवेने निर्माण होते. या सर्वांतून सुटका करण्यासाठी माणूस श्रद्धेचा आधार घेतो. आपला जीवनाचा छोटासा काळ तो अधिकाधिक सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी त्याला आधार हवा असतो. तो श्रद्धा पुरवते. भूत भविष्याच्या जाणिवेमुळे माणसाला श्रद्धेच्या मानसिक आधाराची गरज भासते. प्राण्यांना

भूत भविष्याची जाणीव नाही. त्यामुळे त्यांना श्रद्धेची गरज नाही. ज्या माणसाची स्मरणशक्ती नाहीशी झालेली आहे अशा माणसांना देखील श्रद्धेची गरज लागत नाही. म्हणूनच भूत भविष्याची जाणीव टाळून जगता आले तर श्रद्धेची गरज लागणार नाही. त्यासाठी वर्तमान काळात जगायला हवे. आपल्या ज्ञानेंद्रियांतून वर्तमान काळात येणाऱ्या संवेदनांवरच लक्ष केंद्रित केले तर आपण वर्तमान काळात जगत असतो. त्यालाच ध्यान असे म्हटले जाते. ध्यानही थोडावेळ करून सोडून देण्याची गोष्ट नव्हे. कायम ध्यानात राहणे म्हणजे आपल्या आवडीची गोष्ट मनःपूर्वक करत राहणे होय. अशाप्रकारे जगणारे लोक आनंदी व यशस्वी होत असतात. भूत भविष्याचा विचार करणारे लोक सतत चिंताग्रस्त असतात. सर्वसामान्य लोक भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या चिंतेच्या कैदेत जगत असतात आणि त्यामुळे ते आपले वर्तमान काळातील स्वातंत्र्य गमावून बसतात.

# मृत्यूची भीती आणि श्रद्धा

मानवाला शाश्वत जीवनाची आस आहे. मृत्यूमुळे आपल्या जीवनाचा व जाणीवेचा अंत होतो हे त्याला सहन होत नाही. या सत्यघटनेवर मात करण्यासाठी तो आत्मा नावाचा अमर घटक निर्माण करतो. परंतु त्याची ही श्रद्धा कोणत्याही विश्वासातून निर्माण होत नसल्यामुळे त्याचे समाधान होत नाही. मुळात मृत्यूची भीती ही भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या जाणिवेतून आणि चिंतेततूनच निर्माण होते. जर भूत आणि भविष्याची चिंता नाहीशी झाली तर मृत्यूची भीती देखील नाहीशी होऊ शकते. त्यासाठी वर्तमान काळात जगणे हाच एक उपाय आहे. वर्तमान काळात जगण्यासाठी जाणीवपूर्वक ध्यानाच्या स्थितीची सवय केली पाहिजे. मृत्यूचे दुःख हे आपण जोडलेल्या सर्व गोष्टी सोडून जाण्याच्या जाणिवेतून होते. जिवंत असताना अनेक नाती, अनेक प्रकारची संपत्ती, अनेक प्रकारचे ज्ञान, अनेक प्रकारची कौशल्ये आणि त्यातून मिळणारी कीर्ती यासारख्या गोष्टी प्रयत्नपूर्वक मिळवलेल्या असतात. त्या आपल्या आहेत ही आपली भावना असते. मृत्यूमुळे त्या सर्व गोष्टी सोडून जाण्याची वेळ येते. त्याचबरोबर आपले अस्तित्व नसणे ही जाणीव देखील दुःखद

असते. त्यासाठी जिवंत असतानाच इदम् न मम आपले काहीच नाही. अशा प्रकारची निर्लोभ वृत्ती जोपासली आणि मृत्यूनंतर आपल्या जाणीवेचा अंत म्हणजेच सर्व सृष्टीचा देखील आपल्या दृष्टीने अंत आहे. हे समजून घेतले तर मृत्यूचे दुःख नाहीसे होऊ शकते. मृत्यूची भीती आणि दुःख नाहीसे होणे म्हणजेच शाश्वत जीवन होईल!

सर्वसामान्य माणसाला जोपर्यंत वर्तमान काळात जगता येत नाही तोपर्यंत त्याला श्रद्धेची गरज लागणारच आहे. वर्तमान काळात जगणे ही सार्वकालिक आनंदी जीवन देणारी पद्धत असली तरीही तिच्यासाठी बालपणापासून आवश्यक असलेले प्रशिक्षण जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत श्रद्धेच्या आधाराने जगण्या शिवाय पर्याय नाही. त्यामुळे श्रद्धा विवेकी करणे हा पहिला उपाय आहे. जशी श्रद्धेची पातळी अधिकाधिक विवेकी होत जाईल तशी वर्तमान काळात जगण्याची प्रवृत्ती वाढत जाईल. प्रत्येक माणसाला आपल्या आवडीचे काम मनापासून करता आले तर तो वर्तमान काळात जगायला लागेल.

# मोहमुक्ती आणि आनंदी जीवन

मानव जेवढा सत्ता, संपत्ती आणि कीर्ती यांच्या मोहातून मुक्त होत जाईल तेवढा तो अधिक आनंदी होईल. त्यासाठी शासन यंत्रणा सत्तेशिवाय चालायला लागली पाहिजे. लोकांच्या प्रतिनिधींनी केवळ धोरणात्मक निर्णय घेणे आणि सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करणे एवढीच कामे केली तर सत्तेचा मोह खूप कमी होईल. संपत्तीच्या वाटणीतील विषमता कमी झाली आणि प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या गोष्टी विनासायास मिळायला लागल्या तर संपत्तीचा मोह देखील कमी होईल. आपल्या आवडीच्या कामात प्राविण्य मिळवल्याने सहजपणे लोकप्रियता निर्माण झाली तर कीर्तीचा मोह देखील कमी होईल. सर्वत्र समता, बंधुता व शांतता नांदेल.

# डी. एन. ए. आणि श्रद्धा

एपीजेनेटिक्स नावाचे नवीन शास्त्र तयार होत आहे. आपल्या डीएनएमध्ये आपल्याला पुढे होणारे आजार, आपल्या शरीराची रचना, आपली आयुर्मर्यादा आणि कोणत्या रोगांना आपण बळी पडू शकतो यांची नोंद असते. त्यामुळे आपले भवितव्य जन्मताच निश्चित असते असे समजले जात होते. परंतु आता नवीन संशोधन असे सांगते की डी एन ए ची अभिव्यक्ती होण्यासाठी बाह्य प्रेरकाची गरज असते. पेशींना प्रेरक म्हणून बाहेरचे वातावरण तसेच शरीराच्या अंतर्गत परिस्थिती काम करते. आपल्या मनात निर्माण होणाऱ्या भावना शरीराच्या आतमधली पेशींना प्रेरणा देणारी परिस्थिती निर्माण करतात. भावना निर्माण होण्यासाठी आपल्या मनातील श्रद्धा काम करत असतात. त्यामुळे आपल्या डीएनए मधील कोणत्या गोष्टी व्यक्त होणार हे आपल्या श्रद्धा ठरवीत असतात. निरोगी राहण्यासाठी आपल्या भावना अनाठायी उद्दीपित होणार नाहीत अशा प्रकारच्या आपल्या श्रद्धा असल्या पाहिजेत. आनंद, प्रेम आणि सुख यांच्या अनुभूती देणाऱ्या भावना माणसाला निरायम जीवन देऊ शकतात. ज्या श्रद्धा मुळे आपल्याला मानसिक व शारीरिक त्रास होतो त्या सर्व अविवेकी श्रद्धा समजून त्यांना

बदलण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी अल्बर्ट एलिस यांची आर इ बी टी वापरता येईल.

# आपले आदर्श आणि श्रद्धा

जीवनाच्या विविध क्षेत्रातील घडणाऱ्या घडामोडीचे मूल्यमापन आपण आपल्या श्रद्धांचा आधारे करीत असतो. आपल्या शासनव्यवस्थेत निवडून दिलेले प्रतिनिधी योग्य प्रकारे काम करीत नाहीत असे आपल्याला वाटते. त्यावेळी आपण त्या प्रतिनिधींमध्ये एक आदर्श व्यक्ती पाहत असतो ही आदर्श व्यक्ती आपल्या श्रद्धेनुसार ठरत असते. लोकप्रतिनिधींनी खोटे बोलू नये अशी आपली श्रद्धा असेल तर त्यांनी खोटे बोलल्यावर आपल्याला धक्का बसतो. न्यायव्यवस्थेत गुन्हेगाराला शासन झालेच पाहिजे अशी आपली श्रद्धा असेल तर एखादा गुन्हेगार निर्दोष सुटल्यास आपल्याला धक्का बसतो. शासन व्यवस्था काय किंवा न्याय व्यवस्था काय ह्या मानवनिर्मित संस्था असून आपल्या श्रद्धांच्या आधारे काम करतात. परंतु त्यांना आपण आदर्श समजू शकत नाही. त्या अधिकाधिक चांगल्या प्रकारे कार्यक्षम व्हाव्या म्हणून आणि त्यांच्यातली पारदर्शकता वाढावी यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे वातावरण आपण निर्माण केले पाहिजे.

# विवेकावरील विश्वास

आपली श्रद्धा ही कोणत्याही संस्थेवर असून उपयोगाचे नाही. संस्था ज्या विवेकाच्या पायावर उभ्या आहेत त्या विवेकावर श्रद्धा असणे गरजेचे आहे. विवेका वरील श्रद्धा म्हणजे वदतो व्याघात होतो! म्हणून विवेका वरील श्रद्धा म्हणण्यापेक्षा विवेका वरील विश्वास म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. कारण विवेकाच्या सामर्थ्याची अनुभूती सर्वांना आलेली आहे. मानवी विचाराच्या सामर्थ्याने तयार केलेले हे एक प्रभावी असे हत्यार आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव सर्वत्र वाढत चाललेला दिसत आहे.


# विवेकी श्रद्धा वापर

मानवाच्या सर्व सामर्थ्याचा उगम त्याची विचार करण्याची क्षमता आहे. ही क्षमता सतत वापरली जाणे आवश्यक आहे. अविवेकी श्रद्धेमुळे या क्षमतेचा वापर न करता माणूस आंधळेपणाने वागायला लागतो आणि त्यामुळेच त्याचा आणि त्यांच्या समाजाचा अंत होतो.

विवेकी श्रद्धा आणि वैज्ञानिक पद्धती या दोन गोष्टी मानवाला सुख समृध्दी कडे घेऊन जाणाऱ्या आहेत. आज त्यांचा वापर फारच कमी प्रमाणात केला जात असला तरी त्याचा प्रभाव इतका मोठा आहे की हळूहळू सर्व समाजात सर्व प्रकारच्या लोकांमध्ये त्याचा प्रसार होणे अपरिहार्य आहे. आज पाच टक्के जरी हा वापर असला तरी त्याचा प्रभाव पाचपट म्हणजे २५ टक्के आहे. म्हणजे वापर २५% झाला तर प्रभाव शंभर टक्के पेक्षा जास्त लोकांवर होईल!सर्व राज्यकर्ते अधिकारी आणि मोक्याच्या ठिकाणचे लोक विवेकी श्रद्धा बाळगायला लागले आणि वैज्ञानिक पद्धतीने काम करू लागले तर संपूर्ण समाजांमध्ये परिवर्तन व्हायला वेळ लागणार नाही.

फ्रान्सिस आल्मेडा यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक

कव्हरवर एक क्लिक करताच उघडेल



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**
**फ्रान्सिस आल्मेडा यांचे ईसाहित्यवरचे हे दुसरे पुस्तक.**

फ्रान्सिस आल्मेडा हे हाडाचे शिक्षव व चिंतनशील वृत्तीचे लेखक. वसईच्या वातावरणात फ़ा. दिब्रिटोसारख्या विचारशील लेखकाच्या सान्निध्यात जी मराटी साहित्याची जोमदार चळवळ चालते त्याचे एक महत्वाचे पाईक ते आहेत. वैज्ञानिक वृत्ती

फ्रान्सिस आल्मेडा यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(३ पुस्तके), शंभू गणपुले (९ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१९ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके), डॉ. स्मिता दामले (८ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२९ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४ ), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी

जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ(भगवद्गीता), अरुण वि. देशपांडे(४)  असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी व लोकप्रिय लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।